[illegible] य, ठाणे.
नाटक
दा. क्र. २०७१२
IRBK-0120712

वाचनालय
नाटक
२०७९२
१५।१।८५

# उघडले स्वर्गाचे दार

बाळ कोल्हटकर

किंमत बारा रुपये

IRBK-0120712

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ००२.

उघडले स्वर्गाचे दार
प्रथमावृत्ती : १९८३
गुढीपाडवा १९०५
प्रकाशक :
केशव वामन जोशी
२५ बुधवार पेठ
अप्पा बळवंत चौक
पुणे २
© बाळ कोल्हटकर
मुखपृष्ठ :
अनंत सालकर
मुद्रक :
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ३०

जगातील सर्व विध्वंसक अस्त्रांना
आवर घालू शकणाऱ्या
भारतातील वसिष्ठाच्या

**ब्रह्मदंडास**

ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीयमामृतात् ॥

**बाळ कोल्हटकर**

मारलेला टोमणा किती यथार्थ आहे ते पटते. आपली शस्त्रास्त्रे खपावीत म्हणून जगातील हेव्यादाव्यांना फूस देणाऱ्या प्रबळ राष्ट्रांना तोच टोमणा लागू पडतो.

पुरातन काळी भारत देश विज्ञान आणि तंत्रज्ञान ह्या दोनही विषयांत अतिप्रगत होता असे विधान केले जाते. त्या विधानाला माझ्या मते शास्त्रीय पुरावा अजून मिळाला नाही. परंतु आधुनिक परिस्थितीला लागू पडतील अशी सूचक विधाने आपल्या पुराणांतून पुष्कळ सापडतात. त्यांचा आपण या नाटकात कौशल्याने उपयोग केला आहे. ‘ विद्यया अमृतमश्नुते ’ ह्या पुरातन वचनाप्रमाणे आजही विज्ञान पचवायला ज्ञानाची आवश्यकता भासत आहे. पुराणकाळी विश्वामित्र आणि वसिष्ठ यांचे मतभेद दूर झाल्यावर स्वर्गाचे दार उघडले; तसेच आज पुन्हा घडून यावे असे आपले नाटक पाहून वाटते.

जागतिक संदेश असलेले, आपले हे नाटक भारतात सर्वत्र तसेच भारता-बाहेरही दाखवायची संधी आपणास मिळेल अशी आशा मी करतो.

कळावे,

आपला

**जयंत नारळीकर**

## जयदेवी श्रीसरस्वती

प्रस्तावना लिहायची म्हटली की माझ्या अंगावर काटा उभा राहतो ! एक वेळ नाटक लिहिणं परवडलं, पण प्रस्तावना नको, असं होऊन जातं ! प्रस्तावना लिहायची म्हणजे लिहायची तरी काय ? हेच ना ? की मला हे कसं सुचलं, मला कशी बुद्धी झाली, बघा, मी किती थोर लेखक आहे. असंच ना ? म्हणजे स्वप्रशस्ती ! स्वतःच्या हातानं स्वतःच्या पाठीवर शाबासकी थाप मारून घेणं ! नाटकात कामं करत असताना रोजच ( जवळ जवळ ) इतक्या प्रेक्षकांच्या शाबासकीच्या थापा पाठीवर पडत असतात की पाठ हुळहुळी व्हावी. त्यात आणखी ही भर कशाला ? आधीच मला लिहिण्याचा कंटाळा, ( आणि मी म्हणे लेखक !) नीरांजनाला पूजेचा कंटाळा असावा तसा ! तरीसुद्धा नाटकं लिहितो, ती पोटासाठी. नाटक लिहिले नाही तर मला कामं कोण देणार ? आणि काम मिळालं नाही तर पोटाला काय खाणार ? तरी साधारण तीन वर्षांनी एक नाटक लिहितो ! तेसुद्धा माझे भागीदार श्री. मुकुंद निमकर, साधारण एक नाटक चालायला लागून दीडएक वर्ष झालं की " बाळासाहेब, आता नवीन नाटक पाहिजे हं. जुन्या जुन्या नाटकांवर किती धंदा करायचा ? तुम्हाला काय, बसलांत की होतं लिहून ! आणि तुमचा एक प्रेक्षकवर्ग आहे; त्याला अशाच प्रकारची नाटकं लागतात. आणि तुमच्याशिवाय आहे कोण दुसरं ? इ. इ. ! " झालं. आम्ही चढतो हरभऱ्याच्या झाडावर, आणि स्वतःला बृहस्पती समजून, समाज सुधारण्याची, किंवा राष्ट्र-उद्धाराची सर्व जबाबदारी आपल्याच टाळक्यावर आहे, अशा अभिनिवेषानं, स्वतःमध्ये असलेले सगळे दोष आठवून

ते नसलेली पात्रं रंगवून, काही आदर्श समाजापुढं ठेवायचं नाटक करायचं म्हणून नाटक लिहू लागतो; आणि लिहायला सुरुवात केल्यापासून ते रंगभूमी-वर येईपर्यंत ते किती उत्तम आहे हे सांगण्याचा माझा अट्टाहास आणि ते किती निकृष्ट आहे हे सांगण्याचा आमच्या भागीदाराचा संशयी दुराग्रह, (कारण ते नक्की चालणार नाही असं पहिल्या प्रयोगापर्यंत निमकरांना वाटत असतं. पुढं ते मत बदलतं ती गोष्ट अलाहिदा) असं एक भांडण चालू होतं ! अर्थात निर्मितीतलं साहाय्य मोलाचं असतं ! ते संपून नाटक सुरू होऊन जरा कुठं आता तीन वर्षं आराम म्हणून मी सुस्कारा सोडतो न सोडतो, तो पुस्तक छापून पूर्ण होऊन प्रस्तावना लिहिण्याची वेळ आली की माझ्या पोटात धसका बसतो. तो नेहमीप्रमाणं बसला, म्हणून मी माझ्या अंगावर आलेला काटा पहिल्या वाक्यात विशद केला ! असो !

लहानपणापासून घरी झालेल्या, व शाळेत स्वातंत्र्यपूर्व काळातल्या झालेल्या त्या संस्कारांमुळं मी मूळात राष्ट्रीय वृत्तीचा बनलेलो आहे ! आपलं राष्ट्र मोठं, आपली संस्कृती श्रेष्ठ, हा माझा दृढ विश्वास असतो. आणि त्याच एका दृष्टि-कोणातून माझं एकूण एक लिखाण लिहिलं जातं ! त्यामुळं चरितार्थासाठी असलं तरी माझ्या लिखाणाला अशी वाचा वा अमंगलाचा कधी स्पर्श होत नाही ! वर म्हटल्याप्रमाणं लिहिलं जातं हे महत्त्वाचं, मी लिहीत नाही, हा विनय नाही. हे एक सत्य आहे. Some foreign cunrrent comes in your right hand get something written and then I start saying I have written it ! फाल्तु ! स्वतः लिहिलं असं म्हणणं म्हणजे दुसरं काही नाही, अहंकार ! असं मला मनापासून वाटत असतं. म्हणूनच मी लिहिलं जातं असं म्हणतो ! तसंच हे लिहिलं गेलं ! लहानपणापासून चांदण्या-विषयी मला एक चमत्कारिक कुतूहल आहे. श्रीरामानं चंद्राचाच हट्ट का घेतला ? विश्वामित्र—वसिष्ठांच्या गोष्टीत चांदण्याचाच उल्लेख प्रामुख्यानं का, हे आणि अशासारखे प्रश्न माझ्या डोक्यात नेहमी घोळत असतात. तशात यंतरी माझ्या वाचनात (हो, मी वाचतो. खूप पुस्तकं वाचतो ! नाटकात मिळत असल्यानं पुस्तकं विकत घेऊन वाचतो. बॉम्बे बुकडेपोचे श्री. कुमठा त्यांच्या दुकानात गेलो की " अरे, यांना काही तरी खायला द्या ! " असं गतात. इतका मी अधाशासारखा वाचत असतो ! अगदीच काही

मिळालं नाही तर रेल्वे बुकस्टॉलवर मिळणारी तीन रुपये–पाच रुपयेवाली रहस्य-पुस्तकंही वाचतो. तर ) एक कादंबरी आली. मला खूप आवडली. ‘ जितेंद्रिय ’ हे तिचं नाव ! लेखक ठाण्याचे आहेत ! त्यांचं नाव आहे श्री. दिवाकर बापट ! अजून त्यांची–माझी ओळख झालेली नाही. होईल तेव्हा आधी त्यांचं अभिनंदन करीन, मग आभार मानीन ! वेळ कुठं आहे ? नाटक जोरात चाललंय. त्यात पुन्हा काम करतो. त्यातून थोडा कुठं वेळ मिळतो तो प्रस्तावना लिहिण्याची वेळ येते. ती कादंबरी वाचल्यापासून मी प्रभाकर मुजुमदार, श्री. मालक पोंक्षे हे आमचं मित्रमंडळ पाच-सहा महिने धुंदीत तरंगत होतो. तर ती कादंबरी वाचल्यापासून माझ्या मूळच्या चांदण्याच्या विचाराला चालना मिळाली ! नाटकाचा शेवट मला नेहमी धक्कादायक सापडावा लागतो. तो विश्वामित्र–वसिष्ठ या गोष्टीत लहानपणापासूनच जाणवलेला होता. तो म्हणजे वसिष्ठाच्या डोक्यात धोंडा घालण्यासाठी झाडावर बसलेल्या विश्वामित्राच्या कानावर वसिष्ठाच्या तोंडून विश्वामित्राच्या स्तुतीचेच आलेले बोल ऐकून त्याला बसलेला आश्चर्याचा धक्का ! त्यातून पश्चात्ताप– त्याओघे आलेली नम्रता– मग क्षमायाचना– आणि मिळणारं ब्रह्मर्षिपद ! या सर्वच गोष्टी मला अत्यंत नाट्यपूर्ण वाटत होत्या ! इतकं सामान मिळाल्यावर चांगला स्वयंपाक करता येत नसेल तर तो आचारी कसला ? आणि नाटकाच्या बाबतीत सुगरण नसलो तरी मी स्वयंपाकी नक्कीच आहे ! असो ! तर आधी चांदण्याचा विषय ! तशात आकाशात हल्ली बसवल्या जाणाऱ्या ग्रह–उपग्रहांच्या बातम्या या कथेतल्या त्रिशंकूच्या निमित्तानं आलेलं चांदणं या दोन गोष्टींचा मेळ जमून माझ्या मनात एक राष्ट्रीय वृत्तीचं कथानक साकारलं ! अशा( पौराणिक नाटकात विनोदासाठी नेहमी नारद हे पात्र वापरलं जातं. आणि ते आणायचं नाही हा माझा अट्टाहास होता ! (जे नेहमीच येतं ते करायचं नाही हे एक कारण, आणि दुसरं, ते काम मलाच करावं लागलं असतं ! कारण पूर्वी मी तें केलेलं होतं ! नाटकात काम करत असल्यामुळं मला काम करावंच लागतं. इच्छा नसली तरीही ! कारण पुन्हा पोट– ऊर्फ चरितार्थ ! असो ! म्हणून( विनोदी पात्रासाठी मी ज्ञान–विज्ञान या दोन पात्रांची योजना केली ! खरं तर ही दोन पात्रं मला बुशशर्ट पॅन्टमध्ये उत्खननासाठी हिमालयात आलेले दोन विद्यार्थी दाखवून त्यांना या पौराणिक कथेचा शोध

लागला असं दाखवायची इच्छा होती ! म्हणजे बाकी सगळी पात्रं पौराणिक आणि हे दोघे सामाजिक ! पण ते फारच प्रायोगिक झालं असतं ! आमचा दिलीप त्यालाही तयार होता; पण श्री. निमकरांनी तालमीत किती वेळा नाराजी व्यक्त केली असती कोण जाणे ! आणि कलाकारांना असा विरोध झाला म्हणजे काय यातना होतात हे जावे त्याच्या वंशा. . . असो ! तर शेवटी तीही पात्रं पौराणिकच राहिली ! पण तसा विनोदाचा सूर काही व्यवस्थित जमत नव्हता ! तशात दिग्दर्शक ( चि. दिलीप अतिशय हुषार असून माझा पुतण्या आहे. किंवा माझा पुतण्या असून अतिशय हुषार आहे ). मला चर्चेच्या ओघात सहज म्हणाला, "बाळकाका, तुम्ही मागं एकदा एकच हिरॉइन वेगवेगळ्या रूपांत विश्वामित्राबरोबर आयुष्यभर फिरते असं काही तरी बोलला होता, तिचं काय झालं ?" असं म्हणाला, आणि "नंदिनी" आली !– दुसऱ्या अंकापासून; आणि ती जी आली ती माझ्या सगळ्या गरजा भागवण्यासाठीच आली ! कामधेनूचीच कन्या ! ती आली कागदावर ती कविता बोलतच आली ! शपथ सांगतो, तिच्या तोंडून जी काही शब्दरचना झाली ती तिनंच केली असावी अशी सहज झाली ! प्रतिभेच्या परीसाचा स्पर्श झाल्यानंतर शब्दांचं सोनं कसं होतं त्याची प्रचीती म्हणजे ही नंदिनी ! विनोदाचं काम झालं. विनोदनाचं काम झालं. राजकारणाचं हत्यार वापरता आलं. कथानक पुढं नेणं जमलं. इतकं कशाला, विश्वामित्राला ब्रह्मर्षिपदसुद्धा तिनंच मिळवून दिलं ! हे पात्र म्हणजे खरोखरीच एक दैवी अनुभव होता ! नाटक पाहतानाच ते जाणवतं !

राजकारणात जागतिक शस्त्रस्पर्धेच्या जीवघेण्या चढाओढीत भारत हे राष्ट्र सर्व जगावर मात करण्याइतकं श्रेष्ठ आहे. हे सांगण्याची मला मिळालेली संधी माझ्या राष्ट्रीय वृत्तीमुळं या नाटकात मला मांडता आली, हे मी माझं भाग्य समजतो ! "ब्रह्मदंड" या शब्दाचा अर्थ मला अजूनही तितकासा समजलेला नाही ! 'Neutralization of electricity' विजेचा लोळ पचवण्याची शक्ती असलेला दंड म्हणजे ब्रह्मदंड असावा ! जो एका काळी भारतातल्या वसिष्ठाजवळ असावा असं काहीसं मला सुचलं, आणि अशी शक्ती हाती आल्यावर, हायड्रोजन वा तत्सम इतर संहारक शक्तींचा नाश करण्याचे सामर्थ्य भारताजवळ असावं हा माझा राष्ट्राभिमान आहे ! शोध घेणं शास्त्रज्ञांचं काम ! आणि सद्‌विचारांना नेहमीच पुष्टी मिळत असते, तद्‌वत माझ्यासारख्या

अज्ञानी माणसाला लिहीत असताना विश्वविख्यात शास्त्रज्ञ श्री. जयंत नारळीकर यांचं साहाय्य तर मिळालंच, पण पहिल्या वाचनाच्या वेळी ' अविद्यया मृत्यु–' आदिसारखा एक श्लोक माझ्याकडे पाठवून त्यांच्या तीर्थरूपांनीही मला आशीर्वाद दिले !

शास्त्रज्ञ हा प्रतिभावान असावाच लागतो, पण प्रतिभावान हा शास्त्रज्ञ असतोच असं नाही ! उदाहरण म्हणून हे नाटक लिहिण्याच्या सुरुवातीच्या काळात माझी आणि श्री. जयंतरावांची एक मुलाखत झाली तो प्रसंग आठवतो. T. V.–वर त्यांची मुलाखत होती आणि चर्चेसाठी त्यांनी मला टी. व्ही. स्टुडिओतच बोलावलं होतं ! मुलाखत आत चालू होती. बाहेरच्या ऑफिसमध्ये मी ती पाहात व ऐकत होतो ! त्यांना कुणी तरी एक प्रश्न विचारला होता, " सूर्याला उष्णता कोठून मिळते ? " त्यांनी उत्तर दिलं, " अजून उत्तर सापडलेलं नाही " त्यांची मुलाखत संपली ! ते बाहेर आले. आम्ही दोघे एकाच टॅक्सीनं दादरला आलो ! येतांना मी त्यांना सांगितलं, माझ्या या नाटकात विश्वामित्राचं एक वाक्य मी लिहीत आहे :

चंद्राच्या चाकाचा समुद्राच्या लाटांशी संघर्ष करून मी प्रतिसृष्टीत माझ्या सूर्याला उष्णता दिली ! ' कशावरून ? ' ' कुठल्याही समुद्रावरच्या वाळूत जाऊन पाहा, तिथं तुम्हाला चंद्राचा किंवा चांदीचा चुरा बघायला मिळेल ! ' हे ऐकून मला श्री. नारळीकर म्हणाले, ' हे तुम्ही कुठं वाचलं ? ' मी म्हणालो, ' वाचलं नाही, हे मला सुचलं.' यावर त्यांचं उत्तर...मी लिहीत नाही !

(शास्त्रज्ञांना न पटणाऱ्या गोष्टीसुद्धा आम्हाला वाटत असतात ! वाटणं हे प्रतिभेचं काम, पटणं हे शास्त्रज्ञांचं काम ! ' विष्णु ' नावाचा एक शास्त्रज्ञ होता आणि त्यानं ' ध्रुव ' नावाचा एक सॅटलाइट त्या काळी आकाशात बसवला, असं माझं वाटणं आहे,– अभ्यास तुम्ही करा, मी तर्क करतो ! असो ! )

" असूयेतून जन्माला आलेल्या प्रतिसृष्टीतली फळं कडू असतात. विश्वामित्राची काकडी कडू असं म्हणतात बाळ !–' असं सांगून श्रेष्ठ साहित्यिक ( मी तर त्यांना मनात महाराष्ट्राचे टागोर म्हणतो ). श्री. पु. ल. देशपांडे यांनीही त्यांच्या नकळत मला साहाय्य केलं ! मी त्याचा उपयोग कसा केला, हे नाटक पाहिल्यावर त्यांना कळेल !

श्री. शर्मा हे एक बहुभाषा येणारे संस्कृतचे पंडित. हिंदीचे जाणकार (त्यांनी या नाटकाचं हिंदी भाषांतरही केलेलं आहे.) मला याच नाटकाच्या लिखाणाच्या वेळी का भेटावेत? ही एक प्रेरणाच! या नाटकातील संस्कृत श्लोक सांगण्यापासून, टेपवर म्हणण्यापर्यंत त्यांचं मला साहाय्य झालं. पुढंही होत राहील!

यापूर्वी नाटक लिहिताना मी स्वत:ला मध्यवर्ती समजून रचना करीत असे. पण या वेळी मात्र श्री रमेश भाटकर या तरुण मुलाचं एका नाटकातलं काम बघून विश्वामित्र केवळ त्याच्यासाठीच लिहावं असं वाटलं म्हणूनच मी मनापासून लिहायला सुरुवात केली. चि. सदाशिव कान्हेरे माझ्याच कंपनीतला असल्यानं माझी भाषा सहज बोलतो आणि वसिष्ठाचं कामही त्याला शोभतं. या दोघांनीही मी लिहिलेल्या भूमिकांना योग्य न्याय देऊन आपापल्या भूमिका अप्रतिम केल्या.

कु. अर्चना जोगळेकर ही प्रथम नंदिनीच्या रूपानं रंगभूमीवर आली आणि नायिका झाली! श्रेय कुणाला देऊ? नंदिनीला का अर्चनाला? सध्या तरी हिच्यासाठी ती, आणि तिच्यासाठी ही! बाकी सर्व मंडळी माझीच! त्या सर्वांच्या बळावरच या बाळाचं बळ उभं आहे. जुडी अभंग आहे!

श्री. अनंत अमेमबल या नवीन संगीत दिग्दर्शकानं सूक्ष्म अभ्यास करून दिलेल्या पार्श्वसंगीतानं, तसंच श्री बापू लिमये यांच्या कल्पक नेपथ्यानं, त्यात श्री. प्रदीप मुळे यांच्या पोषाखाच्या वैशिष्ट्याचा अंत:र्भाव होतोच– या नाटकाचा थाट जितका वाढवला हे खरं, तितकंच चि. दिलीपच्या प्रकाशयोजनेनं हे नाटक म्हणजे एक चमत्कार करून ठेवला आहे, हेही खरं! या नाटकाच्या यशात माझ्याइतकाच या नाटकाच्या दिग्दर्शकाचा– चि. दिलीप कोल्हटकर याचा– वाटा आहे (मदतीला मंगेश कुलकर्णी) हे मी प्रांजलपणे कबूल करतो! श्री. प्रभाकर मुजुमदार यांचं हस्ताक्षर आणि सल्ला. श्री. अनंतराव पोंक्षे यांचं माझं एकमत आणि प्रोत्साहन या माझ्या नेहमीच्या यशाच्या वाटा आहेत! त्यांतच विद्याधर निमकर यानं केलेल्या काटेकोर प्रयत्नामुळं जसं नाटक होतं तसंच पुस्तक छापलं जातं. हा माझा पहिलाच अनुभव! आभार! श्री. मुकुंद निमकर यांच्याविषयी जे काही लिहिलं ते सगळं विनोदी आहे; हे समजण्याइतके ते विनोदी आहेत. म्हणूनच आमची भागीदारी सीरियसली टिकून आहे!

श्री. जोशीबुवा हे दुर्दैवाने एक सज्जन प्रकाशक आहेत. असं त्यांचेच एक समव्यावसायिक मजजवळ म्हणाले होते. मी बहुधा त्यांच्यासारखाच असेन, म्हणून आमचे ऋणानुबंध टिकून आहेत ! वृद्धिंगत होवोत !

आपणा सर्वांचा,

**बाळ कोल्हटकर**

महत्त्वाची जाणीव :

या नाटकाच्या या आवृत्तीचे प्रकाशनाखेरीज सर्व अधिकार सौ. शीला कोल्हटकर, ५१बी/१३८१ आदर्शनगर, वरळी, मुंबई ४०००२५, यांच्या स्वाधीन आहेत. प्रयोग करणारांनी अगोदर परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

बाळ कोल्हटकर

श्रीयुत बाळ कोल्हटकर यांस,

सप्रेम नमस्कार

'उघडले स्वर्गाचे दार' हे नाटक पाहण्याचा योग गेल्या महिन्यात आला. आपल्या कल्पक डोक्यातून हे नाटक लिहिण्याची कल्पना बाहेर पडली तेव्हापासून वेळोवेळी नाटकावर चर्चा करायची संधी आपण मला दिलीत याबद्दल मी आपला आभारी आहे. (नाटक प्रभावी भाषेमध्ये लिहिणे आणि तसेच प्रभावी स्वरूपात रंगमंचावर आणणे ह्या दोनही कला आपणास केव्हाच्या साध्य झाल्या आहेत. तरी पण 'स्वर्गाचे दार' उघडून आपण पुराणकालच्या पार्श्वभूमीवर वर्तमानकाळाला जो संदेश दिला आहे तो ह्या नाटकात एक वेगळेच वैशिष्ट्य आणतो.

विश्वामित्राने विज्ञानाच्या जोरावर अंतराळात प्रतिसृष्टी निर्माण केली. आजचे वैज्ञानिक पुढच्या शतकात अंतराळात वसाहती स्थापण्याच्या योजना आखीत आहेत. विश्वामित्राला अभिप्रेत असलेली समृद्धी आजच्या विज्ञान-युगात आधुनिक तंत्रज्ञान आणू पाहात आहे. 'अविद्यया मृत्युं तीर्त्वा' हे वचन सार्थ करायच्या मार्गाने विज्ञानाची घोडदौड चालू आहे. समाजाच्या उद्धारासाठी मानवी अंधविश्वासावर मात करणाऱ्या वैज्ञानिक दृष्टिकोणाकडे आशेने पाहिले जात आहे.

परंतु खुद्द विज्ञानाचा उपयोग डोळसपणे केला जात आहे का? दुसऱ्या महायुद्धाच्या सहा वर्षांच्या कालखंडात जेवढा संहार झाला तेवढा एका सेकंदात करू शकणारी शस्त्रास्त्रे आज मानवाकडे आहेत; आणि ती त्याने मिळवली आहेत विज्ञानबळावर. अशा आजच्या पार्श्वभूमीवर नाटकातल्या विश्वामित्रास शस्त्रास्त्रे पुरवण्याचे काम करणाऱ्या भगवान शंकरांना नंदिनीने

# उघडले स्वर्गाचे दार

'या नाटकाचा प्रथम प्रयोग रविवार दिनांक ९ जानेवारी १९८३ या दिवशी, दुपारी ४ वाजता, गडकरी रंगायतन, ठाणे, या नाट्यगृहात सादर करण्यात आला.

या शुभारंभाची श्रेयनामावली :

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | बाळ कोल्हटकर |
| दिग्दर्शक व प्रकाशयोजना | } | दिलीप कोल्हटकर |
| नेपथ्य | : | बापू लिमये |
| नेपथ्य साहाय्यक | : | पेंटर जुन्नरकर, दत्तू मेस्त्री |
| पार्श्वसंगीत | : | अनंत अमेंबल |
| पार्श्वगायक | : | रवींद्र साठे, अर्चना जोगळेकर, शकुन शर्मा |
| ध्वनिमुद्रण | : | प्रदीप देशपांडे |
| प्रकाश-नियंत्रण | : | तुकाराम हलसकर, शशिकान्त भावे |
| ध्वनि-संकेत | : | मारुति पाटील |
| रंगभूषा | : | प्रशांत टिपणीस, अनिल निमकर |
| वेषभूषा संकल्पन | : | प्रदीप मुळे |
| वेषभूषा | : | वसंत दुदवडकर, सदानंद धुरी |
| छायाचित्रे | : | राजदत्त आर्ट्स |
| रंगमंच व्यवस्था | : | गजानन, मामा, आणि सहकारी |

## : कलाकार :

ज्ञान : बाळ कोल्हटकर

विज्ञान : कमलाकर कुलकर्णी

विश्वामित्र : रमेश भाटकर

वसिष्ठ : सदाशिव कान्हेरे

नंदिनी : अर्चना जोगळेकर

माधवी : चंद्रलेखा

त्रिशंकू : विद्याधर निमकर

शुनःशेष : वीरेंद्र देवस्थळी

अमात्य, शंकर, कण्वमुनी, म्हातारा ब्राह्मण : माधव ओक

सेनापती, ब्रह्मदेव, हरिश्चंद्र : रामचंद्र कुलकर्णी

वरुण, ऋषिकुमार, सैनिक १ : अनिल निमकर

सैनिक २, मारेकरी १ : वसंत दुदवडकर

मारेकरी २ : मंगेश कांबळी

ऋषिकुमार : सदानंद धुरी

सूत्रधार : बाळ कोल्हटकर, मुकुंद निमकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २२४९२ नों. दि. १८।९।८५
वि. नाटक क्र. ..........

जयदेवी श्रीसरस्वती

ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीयमामृतात् ॥

# अंक पहिला

## प्रवेश १ ला

[पडदा उघडल्याबरोबर आपल्या डोळ्यांसमोर दिसतो पृथ्वीचा प्रचंड अर्धगोल. त्यामागं दिसतं अथांग आभाळ – आणि त्यावर चांदण्याची शाल ! चंद्र पौर्णिमेचा, शेजारी रोहिणी, डाव्या बाजूला त्रिशंकू. सप्तऋषी आणि इतर ठळक तसेच लहान तारे आणि चांदण्या !
आणि आपल्याला एक निवेदन ऐकू येतं आतून–]

**निवेदन** : चंद्र जेव्हा स्वर्गात होता तेव्हा घडलेली ही कथा आहे ! अभिमानानं उन्नत व्हावीत अंतःकरणं भारतीयांची अशी ही कथा आहे. भारत या राष्ट्राचं आकाशातलं स्थान कोणतं, हे उभ्या जगाला अधिकारवाणीनं सांगू …णारी ही एक समर्थ कथा आहे ! ज्या वेळी पृथ्वीवर चांदणं नव्हतं – ते …फ स्वर्गात आणि वसिष्ठांच्या आश्रमात होतं त्या वेळची ही कथा आहे. …दीनं विज्ञानाच्या बळावर ज्या विश्वामित्रानं हे चांदणं त्रिशंकूच्या निमित्तानं …वीवर आणलं, त्या इथल्या विश्वामित्राची ही कथा आहे ! विज्ञानाच्या …वर आज आकाशात ग्रह–उपग्रह बसवणाऱ्या सर्व परदेशांना (स्पेस) … कुणाचं याचं कोडं पडलेलं असताना, विज्ञानबळावर विध्वंस …रांना, ज्ञानबळावर वसिष्ठानं याच भूमीवर स्वर्गही आणून दाखवला होता असं सांगणारी ही एक अभिमानाची कथा आहे.

आज आकाशात उपग्रह बसवणाऱ्या सर्व देशांच्या डोक्यावर पडत असलेलं चांदणं हे भारताच्या – दुष्यंतपुत्र भरताच्या मातेच्या– शकुंतलेच्या पित्याची – विश्वामित्राची कृपा आहे हे कधीच विसरता येणार नाही. तर जेव्हा इथं चांदणं

नव्हतं. इथं जेव्हा चांदणं नव्हतं, चांदणे नव्हते जेव्हा इथे !...

[ आणि आकाशातलं चांदणं नाहीसं होतं. आणि रथांच्या चाकाचे आवाज, पृथ्वी जिंकून आलेल्या विश्वामित्राच्या नावानं जयघोष ऐकू येतो. त्याच वेळी उजव्या बाजूला आश्रमाबाहेर बसलेल्या एका शिष्याला—

ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात् ॥

असा घोष ऐकू येतो आतून. आत आश्रमाकडे बघतो आणि केविलवाणेपणानं त्या दिशेला बघून पोथी उघडून — ज्ञान आपल्याशीच— ]

**ज्ञान** : शुक्ल पन्त् मुच् रिच् वच् विच् ( पाच—सहा वेळा वेगळ्या वेगळ्या पद्धतीने म्हणतो. ही करिका म्हणत बसलेला असतो एवढ्यात नखशिखान्त युद्धाचा वेष असलेला एक, ज्याच्या खांद्यावर धनुष्य, पाठीवर बाणांचा भाता बांधलेला. हातांत तोमरसारखं शस्त्र असलेला युवक प्रवेश करतो. वाढलेली दाढी. जरा वेळ त्याचं बोलणं ऐकून )

**विज्ञान** : ए — हे काय चाललंय् तुझं ?

**ज्ञान** : कारिका पाठ करतोय, का रे का ? ऐकू येतं का नाही ?

**विज्ञान** : ऐकू येतं — पण कळत नाही. कुठली भाषा ही ?

**ज्ञान** : संस्कृत !

**विज्ञान** : काय ?

**ज्ञान** : संस्कृत !

**विज्ञान** : संकु—संखु ! संकुस ! हॅट ! सोपं करून सांग.

**ज्ञान** : काय ? संस्कृत ?

**विज्ञान** : तुझी ही भाषा कोणती ?

**ज्ञान** : माझी भाषा देववाणी !

**विज्ञान** : देव...वाणी...

**ज्ञान** : ए, सरळ बोल, देववाणी !

**विज्ञान** : तू राहतोस कुठं ?

**ज्ञान** : आत— स्वर्गात !

**विज्ञान** : आत स्वर्ग आहे ?

**ज्ञान** : हो, ज्ञानबळावर ब्रह्मर्षी वसिष्ठांनी आश्रमात स्वर्ग बनवलेला आहे.

शक्ल, पच्, मुच्, रिच्, वच्, विच्...

**विज्ञान** : हो ? मग तू बाहेर का ?

**ज्ञान** : मला शिक्षा झाली आहे.

**विज्ञान** : कसली ?

**ज्ञान** : कारिका पाठ झाल्याशिवाय आश्रमात पाऊल टाकायची अनुमती नाही. ' अविद्यया मृत्योर्तीत्वा विद्यया अमृतमस्नुते 'चा अर्थ समजल्याशिवाय मला आत जायला अनुमती नाही. शक्ल, पच्, मुच्, रिच्, वच्, विच्...

**विज्ञान** : बरं, बरं, शान्त रहा जरा, शान्त, शांऽऽऽत ! स्वामींची येण्याची वेळ झाली. ही तुझी बडबड बंद कर.

**ज्ञान** : काय रे, माझ्या तोंडावर तुझा काय अधिकार ? तू कोण ?

**विज्ञान** : मी कोण ? अरे मी कोऽऽऽण ?

**ज्ञान** : अरे मीच तुला विचारतोय, तू आणखी कुणाला विचारतोस ?

**विज्ञान** : मी कोण ? हां मी—मी विज्ञान !

**ज्ञान** : काय ?

**विज्ञान** : विज्ञान !

**ज्ञान** : विज्ञान ? हां, म्हणजे अज्ञान !

**विज्ञान** : विऽऽज्ञाऽऽन.

**ज्ञान** : तुला संस्कृत येत नाही ना ? मग मी सांगतो ते बरोबर. विज्ञान म्हणजे अविद्या, अविद्या म्हणजे अज्ञान, विज्ञान म्हणजे अज्ञान ! विज्ञान, हे काय तुझं नाव आहे ?

**विज्ञान** : स्वामी मला या नावानं ओळखतात.

**ज्ञान** : हा कोण कुठला स्वामी ?

**विज्ञान** : स्वामी विश्वामित्र.

**ज्ञान** : कोण विश्वामित्र ?

**विज्ञान** : कोण विश्वाऽऽमित्र ? अरे स्वतःच्या शस्त्रबलावर पृथ्वी पादाक्रान्त करून, विश्वविजय करण्यासाठी निघालेला पुरुषश्रेष्ठ, पृथ्वीपती विश्वामित्र कोण म्हणून विचारतोस ? तू कोण ?

**ज्ञान** : मी कोण ?

**विज्ञान** : होय, तू कोण ?

**ज्ञान** : मी कोण म्हणून विचारतोस ? अरे, ज्या माझं नाव ज्ञान असूनसुद्धा मला काडीचंही ज्ञान नाही, असं ज्या माझ्याविषयी अभिमानानं गुरुजी बोलतात तो मी कोण असं विचारतोस ? मूढा ! गुरुजी मला याच नावानं हाकारतात. ज्ञान !

**विज्ञान** : कोण गुरुजी ?

**ज्ञान** : ब्रह्मर्षी वसिष्ठ ! ब्रह्मर्षी वसिष्ठ !! ज्ञानबलावर ब्रह्मर्षिपद मिळवणारे वसिष्ठमुनी म्हणजे लहान सहान समजू नकोस !

**विज्ञान** : कसलं पद ?

**ज्ञान** : ब्रह्मर्षिपद !

**विज्ञान** : हॅऽऽ म्हणजे ब्राह्मण ?

**ज्ञान** : छे ! ब्राह्मण लहान झाला– तुला संस्कृत येत नाही ना ? मग मी म्हणतो ते बरोबर. अरे, 'ब्रह्म जानाति सः ब्राह्मणः ।' ब्रह्म जाणतो तो ब्राह्मण, पण ब्रह्मदेव ज्याला जाणतो तो ब्रह्मर्षी. तुमच्या क्षत्रियांमध्ये जसा श्रेष्ठ विश्वामित्र, तसाच ब्राह्मणांत श्रेष्ठ ब्रह्मर्षी वसिष्ठ.

**विज्ञान** : आमच्या स्वामींपेक्षा श्रेष्ठ ?

**ज्ञान** : कोण कुठला तुझा स्वामी ? तुझा स्वामी कधी देवाशी बोललाय ?

**विज्ञान** : बोलतात ! प्रत्यक्ष सूर्यनारायणाशी बोलतात.

**ज्ञान** : तुझे स्वामी सूर्यनारायणाशी बोलतात ? सूर्यनारायण त्यांच्याशी बोलतात ?

**विज्ञान** : मला ठाऊक नाही.

**ज्ञान** : मला ठाऊक आहे.

**विज्ञान** : काय ?

**ज्ञान** : सगळे देव आमच्या गुरुजींच्याशी बोलतात.

**विज्ञान** : देव ?

**ज्ञान** : मग ? आम्ही राहतोच मुळी स्वर्गात !

**विज्ञान** : चल ऊठ– दाखव मला– कुठाय तुझा स्वर्ग ?

**ज्ञान** : मला आत जायला अनुमती नाही.

**विज्ञान** : अरे मग ऊठ ना ! मला स्वामींच्याहीसाठी मार्ग मुक्त करायचाय.

**ज्ञान** : मला आत जाता येणार नाही.

**विज्ञान :** अस्सं, मला जावं लागेल !

**ज्ञान :** तुलाही जाता येणार नाही.

**विज्ञान :** मला ? वा– हे म्हणजे ज्ञानानं विज्ञानाचा पराभव केल्यासारखं झालं. अरे मला कोण अडवू शकतो ?

**ज्ञान :** जा. जाऊन बघ. शान्तपणानं आत जा. आत गेल्यावर छानपैकी जळून जाशील.

**विज्ञान :** कशावरून ?

**ज्ञान :** जाऊन बघ.

**विज्ञान :** नको नको.

**ज्ञान :** जा की.

**विज्ञान :** नको नको.

**ज्ञान :** जा ना, जा–

**विज्ञान :** नको नको.

**ज्ञान :** का रे, ॲऽऽऽ, शक्ल, पच्, मुच्, रिच्, वच्, विच्... हे म्हणता येतंय ? 'अविद्यया मृत्योर्तीत्वा विद्यया अमृतमश्नुते'चा अर्थ समजलेला आहे ? तुला संस्कृत येत नाही ना? मला येतं; तरीही मला समजलेला नाही. अरे ॐ त्र्यंबकं यं यं यं यं यजामहे म्हणता येतं ?

**विज्ञान :** नाही ! नाही नाही नाही नाही.

**ज्ञान :** मग ? मग मग– अरे माझ्यासारखा मी ब्रह्मर्षींच्या आज्ञेशिवाय आत जाऊ शकत नाही. तू कुठला कोण ? शक्ल पच् मुच् रिच् वच् विच्...

( आणि रथाचा आवाज जवळ येतो.)

**विज्ञान :** थांब, अरे आपण जरा समजून घेऊ. स्वामी आले आणि त्यांनी आज्ञा केल्याशिवाय कोणी बोलत असलं तर त्यांना सहन होत नाही. माझ्यावर दया कर. (ज्ञान, आपल्या पाया पड, अशी खूण करतो.) पण एका दिशेला ये ! ते माझ्यावर रुष्ट होतील. माझ्यासाठी काही काळ शान्त रहा ! ( विज्ञान ज्ञानाच्या पाया पडतो. )

**ज्ञान :** बघ ! केला की नाही ज्ञानानं विज्ञानाचा पराभव ? नाही तर आत जाऊन बघ.

**विज्ञान :** नको नको, ते कळलं रे ! पण आधी आपण त्यांना दिसणार

नाही अशी एखादी जागा सांग.

**ज्ञान** : हे बघ, कुठंही जाऊन उभं राहायचं आणि आपण त्यांना दिसत नाही असं समजायचं.

**विज्ञान** : वा ! असं कसं ?

**ज्ञान** : अरे असंच आहे बाबा. एवढ्या मोठ्या पृथ्वीतलावर स्वतःपलीकडे ओळखतंय कोण कुणाला ?

**ज्ञान** : हे बघ, तू विज्ञान, मी ज्ञान. तुझा मला उपयोग नाही. माझा तुला उपयोग नाही. आपला दोघांचा उपयोग– करून घेणाराला.

**विज्ञान** : कसा काय ?

**ज्ञान** : बघ. वास्तविक विचार जर केला तर तू आणि मी आपण दोघं महान. बाकी सगळे लहान. विचार कर. ब्रह्मर्षिपद वसिष्ठांनी मिळवलं. कशाच्या बळावर ?

**विज्ञान** : कशाच्या ?

**ज्ञान** : ज्ञानबलावर ! आता ज्ञान महान का वसिष्ठ महान ?

**विज्ञान** : ज्ञाऽऽन.

**ज्ञान** : हां ! विज्ञानबलावर विश्वामित्रांनी पृथ्वी पादाक्रान्त केली. पृथ्वीवर विजय मिळवला. विज्ञानच नसतं तर विश्वामित्र कोठे होते ? मग विज्ञान महान का विश्वामित्र महान ?

**विज्ञान** : विज्ञाऽऽन !

**ज्ञान** : हं, आपण दोघे महान. ते दोघे लहान. या लहानांना महानपण देण्यासाठी आपण महानांनी स्वतःकडे लहानपण घेऊन आयुष्याचा प्रवास करायचा. काय, समजलं ? नाही ना समजलं ? काय, केला की नाही ज्ञानानं विज्ञानाचा पराभव ?

( आतून विश्वामित्र : आहे कोणी माझ्या सामर्थ्याला पृथ्वीच्या पाठीवर प्रतिस्पर्धी ? )

**ज्ञान** : कोण रे तो ?

**विज्ञान** : स्वामी, स्वामी.

( युद्धवाद्यांचा जयघोष, पाठोपाठ दोन सैनिक, अमात्य सेनापती प्रवेशतात आणि त्यांच्यामागून विश्वामित्र प्रवेश करतो,– संपूर्ण योद्ध्याच्या वेषात.)

**विश्वामित्र** : ( प्रवेशून ) पराभव या शब्दाची उपपत्ती शोधायची संधी शोधत असलेला कोणी पुरुष, या पृथ्वीच्या पाठीवर तू कुठं पाहिला असशील तर त्याला हे प्रभाकरा, सूर्यनारायणा, मी भेटू इच्छितो. आहे कोणी माझ्या सामर्थ्याला पृथ्वीच्या पाठीवर प्रतिस्पर्धी ?

**आकाश** : ज्या प्रश्नाचं उत्तर पृथ्वीवरच मिळणार आहे— त्यासाठी आकाशाकडे डोळे कशाला ?

**विश्वामित्र** : पृथ्वी जिंकून स्वर्ग मिळविण्यासाठी मी पाऊल पुढं टाकू इच्छितो. आहे कोणी माझ्या विरोधात ? पृथ्वी जिंकून स्वर्गमार्गावर जाऊ पाहणाऱ्या मला पृथ्वीच्या पाठीवर कोण प्रतिस्पर्धी असू शकतो ?

**आकाश** : ज्याच्या पदस्पर्शानं पृथ्वीला कंप सुटतो अशी एखादी शक्ती !

**विश्वामित्र** : होय ? तर मग या पराक्रमी विश्वामित्राला विरोध करणारी जी शक्ती असेल— त्या शक्तीला हे माझं आव्हान आहे की, शस्त्रबलावर विश्व-विजय करून, स्वबलावर अखिल विश्वात भ्रातृभाव निर्माण करण्याची असीम महत्त्वाकांक्षा— आणि एक अक्षौहिणी शस्त्रसज्ज सैन्य बरोबर घेऊन हा गाधिराजाचा पुत्र विश्वामित्र हे आपलं पाऊल—

**वशिष्ठ** : ( आतून ) मागं घे ! पृथ्वीच्या मध्यबिंदूवर उभा आहेस. पाऊल पुढं टाकू नकोस. पृथ्वीचा तोल ढळेल. ( हॅऽऽ! असं म्हणून विश्वामित्र पाऊल पुढं टाकतो, आणि पृथ्वी डळमळू लागते, सर्वांचे तोल जात असताना विश्वामित्र विचारतो— )

**विश्वामित्र** : सेनापती, अमात्य, पृथ्वी अशी दोलायमान कशी होऊ लागली ?

**वशिष्ठ** : ( आतूनच ) तरीही सांगत होतो, पाऊल पुढं टाकू नकोस, पृथ्वीचा तोल ढळेल.

**विश्वामित्र** : माझ्या सामर्थ्याला आज्ञा देऊ शकणारा कोण ?

( वसिष्ठ शान्त, धीरगंभीर पावलं टाकीत पुढं येतो, पृथ्वीचं हालणं थांबतं. )

**वसिष्ठ** : नम्रता !

( अमात्य—सेनापतींचे हात शस्त्राकडे जातात, विश्वामित्र त्यांना थांबवतो. )

**विश्वामित्र** : आपला परिचय ?

**वसिष्ठ** : मी वसिष्ठ ! पृथ्वीच्या या पलीकडील भागात माझा आश्रम आहे.

**विश्वामित्र** : कसला आश्रम ?

**वसिष्ठ** : ज्ञानदानाचा ! तिथे मी वनस्पतीपासून श्वापदापर्यंत किंबहुना सर्वच विद्यार्थ्यांना विद्या शिकवतो. आज पृथ्वीचा जन्मदिन. या दिवशी स्वर्गातून आणलेल्या एका रोपाचं पृथ्वीवर आरोपण करावं हा माझा एक संकल्प आहे. त्याच शुभमुहूर्तावर आपल्यासारख्या राजपुरुषाचं दर्शन झालं. आनंद झाला. नंदिनी, त्या बाळाला इकडे आण. त्याला पृथ्वीच्या पाळण्यात घालू या !

( नंदिनी रोप घेऊन पुढं येते. )

**नंदिनी** : दोन हातांनी आंदोळत बाळ आणलं देवाचं, देवाचं. सांग बरं आता, तुझं नाव काय ठेवायचं ? हे बघ, एका हाती शस्त्र आहे, एका हाती शास्त्र आहे, या दोघांच्या स्नेहाचं हे आगळं वेगळं प्रतीक आहे. शस्त्र टाकून द्या, शास्त्र हाती घ्या. शक्ती, बुद्धी मिळून पृथ्वी नंदनवन करायचं. मित्रवृक्ष या बाळाचं नाव आता ठेवायचं.

**वसिष्ठ** : काय, काय ?

**नंदिनी** : मित्रवृक्ष या बाळाचं नाव आता ठेवायचं !

**वसिष्ठ** : पृथ्वीच्या मध्यबिंदूवरची जागा ओळख. ( रोपाच्या कानांत सांगितल्यासारखं. ) सावली आणि सुगंध देण्यासाठी आयुष्याचा उपयोग करायचा असतो, बरं बाळ !

( नंदिनी रोपाचं मातीच्या खळामध्ये आरोपण करते, त्या रोपाला बाळाप्रमाणं पाळण्यात घालण्याचा अभिनय करून पाळण्याच्या दोरीनं पाळण्याला झोका दिल्यासारखं करून पाळणा म्हणू लागते.. )

**नंदिनी** : मातीच्या ग पाळण्यात, बाळ पृथ्वीचं ठेवू या ।
आयुष्याचं गाणं त्याला, हीच अंगाई गाउ या ॥
पान पान फूल व्हावं, पूजेसाठी राउळात ।
बहराला गंध यावा, अंग अंग पारीजात ॥
उंच जाऊ दे आकाशी, धुंद सुगंधाचा पक्षी ।
जगातल्या सद्भावांना, तूच होई सर्वसाक्षी ॥
सौख्य आणि शान्ततेची, देई विश्वाला साउली ।
तुझी जन्मदात्री व्हावी, दीन अनाथा माउली ॥

थोर वृक्ष वाढो देवा, हीच आस ठेवोनिया ।
औक्षवंत होई बाळा, असा झोका हा देऊ या ॥

**वसिष्ठ :** ज्ञाना, तो जलकुंभ इकडे आणा. (ज्ञान बाजूला पाण्याने भरून ठेवलेला जलकुंभ घेऊन येतो.) निसर्गानं दिलेलं पाणी पेलायचं सामर्थ्य याला येईल. तोपर्यंत याचं संगोपन तुम्हांला करायला हवं बरं का, ज्ञाना. हे पूर्ण बहरास येईल त्या दिवशी तुमची शिक्षा पूर्ण होईल. तुम्ही आश्रमात परत यायचं ! आम्ही तुमची परीक्षा घेत आहोत. लक्षात आहे ना ?

**ज्ञान :** आता मी याला पाणी घालू ना ?

**वसिष्ठ :** नको. सुरुवातीलाच तुमच्या हातून याला पाणी नको.

**ज्ञान :** का ?

**वसिष्ठ :** त्याचा बुद्धिभेद होईल. द्या. (त्याच्या हातून जलकुंभ घेऊन खाली ठेवतो. अपमानित झालेला ज्ञान रागानं बाजूला जाऊन उभा राहतो.) नंदिनी, हा जलकुंभ त्या राजपुरुषाजवळ दे ! त्याच्या हातून या बाळाला उदक मिळालं तर या जीवाच्या आशीर्वादानं या विश्वामित्राची सावली, अवघ्या विश्वाला– मित्राची सावली देईल.

**नंदिनी :** यावं, यावं. या बाळाला पाणी द्यावं !

**विश्वामित्र :** मी या रोपट्याला पाणी घालू ?

**वसिष्ठ :** का ? शंका कसली ?

**विश्वामित्र :** आपल्याबद्दल आदर मनात ठेवूनच एक प्रश्न विचारू ?

**वसिष्ठ :** प्रश्न विचारा. ज्ञानदान हा माझा धर्मच आहे.

**विश्वामित्र :** आपण मला ओळखता ?

**वसिष्ठ :** मी ओळखतो. पण आपण स्वतःला कसे ओळखता हे कळलं तर अधिक भलं ?

**विश्वामित्र :** ऐका तर मग. शस्त्रबळावर, जगातील सर्व प्रकारची ऐहिक ऐश्वर्ये ज्याच्या पायाशी लोळत असतात, ज्यासाठी माणूस जन्म घेतो ती सर्व सुखं ज्याच्या इशाऱ्यावर नाचत असतात, पृथ्वी जिंकून सूर्याशी संवाद साधण्याइतकं नैतिक सामर्थ्य असलेला मी पृथ्वीपती विश्वामित्र !

**वसिष्ठ :** वाऽ ! फार आदर वाटला आपल्या सामर्थ्याचा आवाका ऐकून

आणि आश्चर्य !

**विश्वामित्र** : आश्चर्य ? कसलं ?

**वसिष्ठ** : ज्या पृथ्वीचे आपण पती आहात, तिचंच हे बालक. मग त्याच्या संगोपनाला आपण नकार का देता ?

**विश्वामित्र** : ज्या विचारांचा वृक्ष वाढविण्याची आपली मनीषा आहे तो आम्हाला अभिप्रेत नाही म्हणून. मी शस्त्रबलावर पृथ्वीवर स्वर्ग आणून दाखविण्याच्या मार्गावर आहे.

**वसिष्ठ** : हा असा? ( वृक्षाकडे बोट दाखवून )

**विश्वामित्र** : हंऽ हा असा ! हे काम करायला इतके मानवी हात माझ्या-साठी सिद्ध आहेत की मी असा खाली आलो तर ते लाजतील.

**वसिष्ठ** : झाडाला पाणी घालणं म्हणजे खाली येणं ?

**विश्वामित्र** : अर्थात !

**वसिष्ठ** : दर्जानं ?

**विश्वामित्र** : निश्चित !

**वसिष्ठ** : हे अहंकाराचं सुख झालं !

**विश्वामित्र** : नाही, हे आत्मविजयाचं सुख.

**वसिष्ठ** : आणि या पद्धतीनं आपण पृथ्वीवर स्वर्ग आणणार ?

**विश्वामित्र** : अर्थात !

**वसिष्ठ** : स्वर्ग याचा अर्थ समभाव !

**विश्वामित्र** : होय; आणि तोही शस्त्रबळावर !

**वसिष्ठ** : सर्वसमभाव म्हणजे भ्रातृभाव !

**विश्वामित्र** : हंऽऽ बंधुभाव ?

**वसिष्ठ** : आणि तोही शस्त्रबळावर ! आपल्या आत्मविश्वासाचं कौतुक करता करता एक शंका मनाला चाटून जाते.

**विश्वामित्र** : कोणती ?

**वसिष्ठ** : मग या वेगळ्या वेगळ्या दर्जाचं काय ?

**विश्वामित्र** : म्हणजे ?

**वसिष्ठ** : म्हणजे पाणी घालणाराची योग्यता वेगळी. आपली योग्यता वेगळी ! इथं बंधुभाव कुठं शिल्लक राहतो ?

( विश्वामित्राचा पहिला पराभव, अपमान ! रागारागानं विश्वामित्र वसिष्ठाकडे बघतो. नंदिनीकडे बघतो. तिच्या हातातला जलकुंभ घेतो. नंदिनी जाते. तो पाणी घालतो. )

**वसिष्ठ** : आमचे मित्र झालात. विश्व–मित्र व्हाल !

**विश्वामित्र** : विश्व–मित्र ? विश्वाऽमित्र !

**वसिष्ठ** : विश्वाऽमित्र ! तोच एक काना चुकीचा पडला आहे; उभा ! अहंकार आडवा घालावा लागेल.

**विश्वामित्र** : म्हणजे–

**वसिष्ठ** : कळेल. आता आपल्याला एक विनंती करतो.

**विश्वामित्र** : कसली ?

**वसिष्ठ** : स्वर्ग आकाशात आहे या असमंजस विचारामुळं सूर्याच्या दिशेनं आपण संहारासाठी पाऊल पुढं टाकता आहात ते टाकू नका. पृथ्वीचा तोल तर ढळेलच, पण आपलाही स्वर्गाचा मार्ग चुकेल. स्वर्ग इथंच पृथ्वीवर आहे.

**विश्वामित्र** : कोणाचीही कसलीही सूचना आम्ही घेत नसतो.

**वसिष्ठ** : असो ! आपल्या ऐहिक सुखाच्या उपभोगात व्यत्यय आणावा म्हणून नव्हे – पण फार दूरवरून आलाहात, पुढंही पल्ला फार मोठा आहे. काही क्षण आमच्या आश्रमात विश्राम केलात तर भूमी धन्य होईल !

**विश्वामित्र** : आनंदानं आपल्या आतिथ्याचा स्वीकार केला असता. पण माझ्यासोबत एक अक्षौहिणी शस्त्रसज्ज सैन्य आहे. त्या सर्वांचं पोषण मीच करीत असतो !

**वसिष्ठ** : आपणाला निमंत्रण यामध्ये आपल्या सैन्याचाही समावेश होतोच.

**विश्वामित्र** : इतकं सैन्य ?

**वसिष्ठ** : अश्व आणि गज जी जी म्हणून आपण पोषण करता त्या सर्वांना माझं आग्रहाचं निमंत्रण आहे. ज्ञाना, हा संदेश संपूर्ण सेनेमध्ये पोचवा. संपूर्ण बरं का;– आणि त्यांना प्रार्थना करून पाचारण करा. ( ज्ञान जाण्यासाठी वळतो. )

**विश्वामित्र** : त्यांना कष्ट कशाला ? तुमच्या ज्ञानाचं काम आमच्या विज्ञानाकडून त्वरेनं होईल.

**वसिष्ठ** : विज्ञान ?

**विश्वामित्र :** माझा शरीररक्षक !

**वसिष्ठ :** आपल्याला ? आणि शरीरसंरक्षक ?

**विश्वामित्र :** असं तो समजतो !

**वसिष्ठ :** म्हणजे ?

**विश्वामित्र :** तो माझ्यासोबत असला म्हणजे त्याला कुणाची भीती उरत नाही; या विश्वासानंच तो सदैव माझ्यासोबतच असतो.

**वसिष्ठ :** हा कसला विश्वास ? ही तर भीती.

**विश्वामित्र :** भीतिग्रस्ताचं संरक्षण हा तर राजाचा धर्मच.

**वसिष्ठ :** अभिनंदन ! म्हणजे आमच्या ज्ञानाचाच हा बंधू झाला.

**विश्वामित्र :** ज्ञान ?

**वसिष्ठ :** स्वतः अत्यंत ज्ञानी आहोत अशा आनंदात सदैव तृप्त असणारा एक अज्ञान जीव !

**ज्ञान :** ब्रह्मर्षींची कृपा आहे.

**विश्वामित्र :** ब्रह्मर्षी ? म्हणजे ?

**वसिष्ठ :** याचा अर्थ त्याला कधीच कळलेला नाही. तरी आपण ज्ञानी आहोत असं जगाला वाटावं म्हणून तो या शब्दांचा उच्चार करत असतो.

**ज्ञान :** ब्रह्मर्षी !

**वसिष्ठ :** उच्चार बरोबर आहे, बरं का बाळ !

**विश्वामित्र :** जा. विज्ञानाला यांचा संदेश द्या !

**वसिष्ठ :** चलावं आता. हा अज्ञान आणि तो विज्ञान ! हे दोघे एक झाल्यावर काय गोंधळ होतो तो बघायचा ! यावं !

( दोघ जातात. )

**विज्ञान :** इतक्या सर्व सैनिकांचं आश्रमात भोजन होऊ शकेल ?

**ज्ञान :** एका वेळी, सोनियाच्या ताटी अमृताचा घास ! शिवाय स्नानाला सरिता.

**विज्ञान :** सरिता म्हणजे ?

**ज्ञान :** बघ, यासाठी संस्कृत यावं लागतं !

**विज्ञान :** ते समजलं रे बाबा !

**ज्ञान :** काय समजलं ? सरिता म्हणजे काय ते समजलं ?

**विज्ञान :** नाही रे बाबा. तू ज्ञानी आहेस हे समजलं. पण सरिता म्हणजे काय ते नाही कळलं.

**ज्ञान :** इकडे ये, समोर बघ. ती आडवी सबंध पसरलेली आहे ना ती सरिता, दिसली का ?

**विज्ञान :** दिसली, पण कळली नाही.

**ज्ञान :** अरे महामूढा ! सरिता म्हणजे नदी ! दक्षिण बाजूला ऊन पाणी, उत्तर बाजूला थंड पाणी ! ज्याला जसं हवं तसं त्यानं स्नान करावं. इकडे ये ! सर्व प्रकारच्या सुगंधित फुलांच्या उद्यानातल्या सुगंधाचा स्वाद घ्या. इकडे बघ. तऱ्हतऱ्हेच्या फळांनी डवरलेल्या बागांतून आत जा. आनंदानं त्या फळांचा आस्वाद घ्या ! तिथं पक्षी तुमच्या स्वागतासाठी स्वागतगीतं गातील. तिथं सदैव वसंत वस्ती करून असतो. कोकिळांचं कुहू कुहू अन् भृंगांचा गुंजारव तिथं सदैव चालू असतो. सिंह व ससे गळ्यात गळा घालून फिरत असतील. यात काहीच नवल नाही. पण तिथल्या वनस्पती माणसावर जे प्रेम करतात ते पाहिलंत तरी-सुद्धा तुम्हाला गहिवर येईल ! जाऊन बघ आणि येऊन सांग !

**विज्ञान :** ए, पण जाऊन परत येता येईल ना ? तू बरोबर चल बाबा.

**ज्ञान :** मला आत जायला अनुमती नाही, सांगितलं ना एकदा ?

**विज्ञान :** मग आमचं काय ?

**ज्ञान :** तुम्हाला निमंत्रण आहे बाबा ! अतिथींचा अपमान आश्रमात होत नसतो. मूढा, मीच तुला काही काळापूर्वी प्रवेश बंद असं सांगत होतो. मीच तुला जा म्हणून सांगतो आहे ! याचा विचार कर. छेः, काही कळणार नाही. ज्ञान नाही, नुसते शस्त्रधारी.

**विज्ञान :** मी तुझा शिरच्छेद करीन.

**ज्ञान :** काय म्हणालास ?

**विज्ञान :** मी तुझा शिरच्छेद करीन, हां ऽऽ—

**ज्ञान :** तू माझा शिरच्छेद करशील ?

**विज्ञान :** करीन, करीन मी तुझा शिरच्छेद !

**ज्ञान :** वा, वा; बरा भेटलास, चल करून टाक.

**विज्ञान :** काय ?

**ज्ञान :** शिरच्छेद ! चल करून टाक लवकर.

**विज्ञान** : करीन.

**ज्ञान** : अरे करून टाक ना लवकर शिरच्छेद ! कर, कर ना. अरे घाबरू नकोस बाबा. इथं मी मरण पावलो तरी तिथं मी जिवंतच असणार.

**विज्ञान** : कुठं ?

**ज्ञान** : तिथं आश्रमात !

**विज्ञान** : का ?

**ज्ञान** : कारण तिथं स्वर्ग आहे. अमृताची नदी आता आत आहे. एकदा स्नान केलं की जन्मभर चिरंजीव !

**विज्ञान** : कशावरून ?

**ज्ञान** : शिरच्छेद करून बघ !

**विज्ञान** : नको नको.

**ज्ञान** : शिरच्छेद करून बघ.

**विज्ञान** : नको नको.

**ज्ञान** : अरे तुला कसली भीती आहे, शिरच्छेद माझा होणाराय.

**विज्ञान** : नको, नको.

**ज्ञान** : तुझ्या पाया पडतो, माझा शिरच्छेद कर.

**विज्ञान** : अरे नको नको; मी तुझ्या पाया पडतो, नको नको.

**ज्ञान** : एकदा माणसानं शब्द दिल्यावर मग तो बदलू नये. आता करतोस की नाही शिरच्छेद ?

**विज्ञान** : अरे नको रे.

**ज्ञान** : का ?

**विज्ञान** : हं: ! तुला काय वाटलं, मला एवढंसुद्धा ज्ञान नाही ? अरे निःशस्त्र शत्रूवर क्षत्रिय कधी शस्त्र चालवीत नाहीत !

**ज्ञान** : हा, म्हणजे तू भितोस ? जवळ शस्त्र आहे, पण ते चालविण्याचं हातांत बळ नाही. सशस्त्र असून अशक्त, अरे अरे अरे !

**विज्ञान** : अरे पण हा शस्त्राचा दुरुपयोग होईल !

**ज्ञान** : अरे जा रे. ज्याला उपयोगच करता येत नाही त्यानं दुरुपयोगाच्या कशाला वल्गना कराव्यात ?

**विज्ञान** : खरं आहे तुझं ? आहे शस्त्र खांद्यावर. पण ते विश्रांतीसाठी

भिंतीला टांगलेलं. उपयोग काहीच नाही. खरंच, मी भित्रा आहे रे ! या जगात मी एकटा आहे. स्वामींच्या सावलीत भय नाही म्हणून लोचटासारखा त्यांच्या छायेत राहतो. आणि ते मला आपला शरीरसंरक्षक समजतात. थांबा, याला पर्याय काढतो. सेनापतीला पुढं घालतो नि त्याच्या आधारानं आत जातो.

**ज्ञान** : का ?

**विज्ञान** : अरे जळाला तर तो आधी !

[ टाळ्या वाजवतो. आतून अमात्य व सेनापती येतात. त्याला मुजरा करतात. साभिप्राय विज्ञान ज्ञानाकडे बघतो. ]

**विज्ञान** : ( अमात्याला ) गुरुजींचा निरोप सेनापतीला सांगा.

**अमात्य** : ( सेनापतीला ) स्वामींचा निरोप सेनेत कळवा.

( सेनापती शंख काढतो. वाज़वतो. आतून दुंदुभी—चौघडे वाजू लागतात. आत जातो. )

**ज्ञान** : वा ! त्या मानानं तुला त्यांनी बराच मान दिला !

**विज्ञान** : शस्त्राला !

**ज्ञान** : उपयोग नसलेल्या ? ( खजील होतो. सेनापती येतो. )

**सेनापती** : स्वामींच्या आज्ञेप्रमाणं– ( ज्ञानाकडं बघतो, ज्ञाना आत बोट दाखवतो. ) सर्व सैनिकांना निमंत्रण मिळालं. प्रस्थान ठेवलं आहे ! स्वामींना निरोप—

**विज्ञान** : आपण पुढं चला. मी मागोमाग आलोच.

**विज्ञान** : जळाला का,– जळाला तो ?

**ज्ञान** : नाही रे, निमंत्रिताचा अपमान आश्रमात कधी होत नसतो. तू आत चालला आहेस, पोटभर खाऊन—पिऊन येशील. माझं एक काम करशील ? मी खूप दिवसांचा उपाशी आहे. माझ्यासाठी दोन फळं घेऊन ये. मी उपाशी आहे.

( सेनापतीपाठोपाठ विज्ञान आत जातो. )

[ अंधार ]

## प्रवेश २ रा

[ पुन्हा उजेड. तृप्तीचा ढेकर देत विज्ञान परत येतो. ]

**विज्ञान** : वा वा ! खरंच, स्वर्गच रे बाबा स्वर्ग ! वा वा वा ! सर्वजण तृप्त झाले. इतकी अगणित सेना– पण कोणालाही कसलीही उणीव नाही. खरंच, स्वर्गच रे बाबा स्वर्ग ! सोन्याच्या पात्रातून इच्छाभोजन प्रत्येकाला ! काय तुला थाट सांगू ? देवाच्या घरी भोजनाला गेल्यासारखं वाटलं. ( ढेकर देतो. ) अरे ती झाडं हातानं जशी फळं वाढावीत तशी फांद्या वाकवून वाकवून आपली फळं आम्हाला वाढत होती. खरंच– स्वर्गच रे बाबा स्वर्ग !

**ज्ञान** : तसं लहानपणापासून शिक्षण दिलेलं आहे त्या झाडांना. बरं, माझ्या-साठी दोन फळं आणलीस की नाही ? काय रे ?

**विज्ञान** : थांब रे, तेच सांगतो. तुझ्यासाठी मी दोन फळं तोडायचा प्रयत्न केला, तर त्या झाडांनी पटकन् आपल्या फांद्या पाठीमागं घेतल्या.

**ज्ञान** : वनस्पतींना तेसुद्धा शिक्षण मिळालेलं आहे.

**विज्ञान** : म्हणून एका सैनिकानं आपल्या शस्त्रानं झाडाची फांदी तोडायचा प्रयत्न केला, तर दोन बोरी-गाभळीच्या दोन झाडांनी वाकून त्याच्या हाताला काट्यांनी टोचलं ! त्यानं शस्त्र टाकून दिलं. आणि हवा– वा वा ! चंदनाचा सुगंध घेऊन आलेल्या हवेच्या झुळकी पाठोपाठ केतकीच्या सुगंधाची लहर ? केतकीच्या सुगंधाच्या लहरीच्या पाठोपाठ पारिजातकाच्या सुगंधाची लहर; लपेटून टाकलं होतं वातावरण सुगंधाच्या लहरींनी ? होय. अरे, त्या वाऱ्याच्या लहरींनासुद्धा एक सूर होता– कुठल्या कुणास कळे !

**ज्ञान** : अरे तो स्वर्गीय वाद्यांचा सूर ?

**विज्ञान** : खरंच, स्वर्गच रे बाबा, पृथ्वीवरचा स्वर्ग ? ससे सिंहाच्या आयाळीशी खेळत होते, आणि सरोवरातले मासे बगळ्यांच्या चोचीवरून फिरत होते.

**ज्ञान** : बरोबर आहे. बगळ्यांना अहिंसेचं शिक्षण मिळालेलं आहे.

**विज्ञान** : आणि सगळ्यांत आनंदाची गोष्ट म्हणजे, कुणाच्याही हातामध्ये तिथं शस्त्र नव्हतं !

**ज्ञान** : सगळे सैनिक परत गेले ?

**विज्ञान :** मी आहे ना !

**ज्ञान :** तू कसला सैनिक ? साधं माझा शिरच्छेद करणं तुला जमत नाही !

**विज्ञान :** कशासाठी ?

**ज्ञान :** अरे तुझ्यामुळं तरी मला आज स्वर्गात जाता आलं असतं. पृथ्वीवर स्वर्ग असून मला आत जाता येत नाही.

**विज्ञान :** मला केव्हाही येत जा, असं निमंत्रण दिलंय तुझ्या गुरुजींनी !

**ज्ञान :** नशीबवान आहेस ! भरल्या पोटी तुला हे बोलायला काय होतंय ?

**विज्ञान :** नाही, पण मी म्हणतो, इतक्या सेनेचा पाहुणचार सहजगत्या कसा काय करता आला ?

[ विश्वामित्र वसिष्ठ बोलत येतात. ते दोघे मागं जातात; अंधारात. ]

**वसिष्ठ :** यावं, यावं.

**विश्वामित्र :** हा वृक्ष कसा असा उलट्या बाजूनं आमच्या अंगावर झाकला ?

**वसिष्ठ :** जाताना वाकला तो आपल्या स्वागतासाठी, आणि येताना वाकला तो आपल्याला सावली देण्यासाठी ! हे आम्ही इथं वनस्पतींना शिक्षण देतो ज्ञानाच्या साहाय्यानं ! या आश्रमात आम्ही स्वर्ग बनवला आहे.

**विश्वामित्र :** इथं सोमरसाची निर्मिती होत नाही ?

**वसिष्ठ :** त्या धुंदीनं मिळणारी सर्व सुखं प्रत्यक्षात मिळत असल्यामुळं आवश्यकताच वाटत नाही ! विध्वंसक शक्ती असलेली कुठलीही शस्त्रं या भूमीवर नाहीत. नदी वाहते तीही अमृताची.

**विश्वामित्र :** वा; आपण आमचा सन्मान केलात. आम्ही प्रसन्न झालो. वनस्पतींनासुद्धा आपण शिक्षण दिलंत, अं ?

**वसिष्ठ :** जन्म घेणाऱ्या प्रत्येक जीवाला बुद्धी असतेच. जे वळण द्याल ते ती घेत असते !

**विश्वामित्र :** आणि आश्रमात असलेल्या शीतल हवामानावरही आपण शिक्षणानं संस्कार केलेत का ?

**वसिष्ठ :** हवासुद्धा आपल्याला हवी त्या अवस्थेत बांधून ठेवता येत नसेल तर त्या ज्ञानाचा उपयोग काय ?

**विश्वामित्र :** आणि डोक्यावर शीतल प्रकाश देणारा तो गोलक ?

उ. स्व. द्वा...

**वसिष्ठ** : त्याला आम्हीच चंद्र असं नाव दिलं. चंद्रमा ! वनस्पतींच्या पोषणासाठी आम्हीच ज्ञानाच्या बळावर हा आकाशात बसवला. प्रथम हा स्वर्गात पाहिला ! आम्ही अभ्यास करून त्याला आमच्या आश्रमांत आणला ! ' चंद्रमा मनसो जातः ' !

**विश्वामित्र** : पण हे सर्व आम्हाला दाखवण्यामागचा आपला हेतू ?

**वसिष्ठ** : सांगतो, आसनस्थ व्हा. शस्त्रबळावर विश्वविजय करून जो स्वर्ग आपण पृथ्वीवर आणू म्हणताहात तोच स्वर्ग जर ज्ञानबळावर आणता येतो तर हा संहार कशासाठी करता, हा प्रश्न तुम्हाला विचारण्यासाठी !

**विश्वामित्र** : शस्त्रबळावरसुद्धा हा भ्रातृभाव निर्माण करता येईल !

**वसिष्ठ** : कसा ?

**विश्वामित्र** : शस्त्रबळावर सर्वांचा संहार करून हा आश्रम आम्ही आपला करू शकतो !

**वसिष्ठ** : त्यासाठी संहार कशाला ? आमचं तर आपल्याला नम्र निमंत्रण आहे. आणि संहार आपण जो म्हणता तो इथं होणारच नाही. कारण इथं मरणच नाही ! आहे ते फक्त जगणं आणि तेही सुखाचं ! म्हणून विनंती करतो, ही शस्त्रं टाकून द्या. आपण दोघेही एका ठिकाणी आलो तर पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करू.

**विश्वामित्र** : जे मी सामर्थ्यावर निर्माण करतो त्यासाठी कोणाचं साहाय्य का घ्यायचं ? आपले आणि आमचे विचार भिन्न ! शस्त्रबळावर उरलं विश्व जिंकून जो आमच्या धाकात राहून आमच्या मनाप्रमाणं वागेल तो आमचा स्वर्ग ! भ्रातृभावच, पण तोही शस्त्रबळावर !

**वसिष्ठ** : शस्त्रबलावर आपण हे सर्व मिळवू शकाल ?

**विश्वामित्र** : हं ! एकच कुतूहल म्हणून आपल्याला विचारतो. एका वेळी इतक्या अल्पावधीत इतक्या सैनिकांच्या स्वागताची तयारी कशी होऊ शकली ?

**वसिष्ठ** : ती सर्व नंदिनीची कृपा !

**विश्वामित्र** : नंदिनी !

**वसिष्ठ** : कामधेनूची कन्या ! नंदिनी, बाहेर ये बाळ ! आज विश्वविजेत्या थोर पुरुषाकडून तुझं कौतुक होत आहे. ये. ऐकून धन्य हो ! ( नंदिनी

प्रवेश करते. ) ही कामधेनूची कन्या ! नंदिनी ! !

**विश्वामित्र** : धेनू ?

**वसिष्ठ** : कामधेनू कोणतंही रूप घेऊ शकते ! हिच्यामुळं मला जगात अप्राप्य असं काहीही नाही ! मनात येईल ती इच्छा पूर्ण करण्याचं सामर्थ्य हिला आहे.

**विश्वामित्र** : वा ! म्हणजे एक हे अद्वितीय असं रत्नच म्हणावं लागेल !

**वसिष्ठ** : अद्वितीय रत्न ! नंदिनी म्हणजे या ब्रह्मर्षींच्या आश्रमाचं वैभव आहे.

**विश्वामित्र** : अद्वितीय आणि अलौकिक ! अद्वितीय आणि अलौकिक वस्तूंचा संग्रह करण्याचा अधिकार फक्त पराक्रमी राजपुरुषांचा असतो ! आपल्यासारख्या साधुसंतांनी अशा गोष्टी जवळ बाळगू नयेत !

**वसिष्ठ** : मी अर्थ नाही समजलो !

**विश्वामित्र** : सोपा आहे. इतक्या सन्मानानं आपण आमचं आदरातिथ्य केलंत, आता उपहार—दक्षिणा, म्हणून आपण ही नंदिनी आपण आम्हाला द्यावी !

**नंदिनी** : आई !

**वसिष्ठ** : थांब, चिंता करू नकोस बाळ ! ही मागणी ऐकून मीसुद्धा क्षण-भर सुन्न झालो. पण हे राजपुरुष आततायी नाहीत— आपण त्यांची समजूत घालू !

**विश्वामित्र** : कसली समजूत ?

**वसिष्ठ** : राजन् ! या नंदिनीला आश्रमात ज्या वेळी मी घेऊन आलो— तेव्हा हिच्या मातेला वचन दिलं होतं— मी हिला या आश्रमाबाहेर कधी देणार नाही— हिचं कुणालाही दान करणार नाही ! आपण खासच मला वचन-भंगाचं पातक करायला सांगणार नाही. आपण उच्च कुलाचे क्षत्रिय आहात !

**विश्वा०** : पर्याय आहे ! आपण भोजनोत्तर-दक्षिणा म्हणून ही मला द्यावीत.

**वसिष्ठ** : दक्षिणा ब्राह्मणाला देतात !

**विश्वा०** : कोण ब्राह्मण माझ्याहून श्रेष्ठ आहे ?

**वसिष्ठ** : आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. तरीही आपण ब्राह्मण नाही.

**विश्वा०** : काय अंतर पडतं ?

**वसिष्ठ०** : आपादमस्तक इतकं अंतर. पराक्रमासाठी पावलांनी भूमी आक्रमत

जाणं हा क्षत्रियाचा धर्म, आणि त्याच भूमीवर नतमस्तक होणं हा ब्राह्मणाचा धर्म ! आपादमस्तक इतकं हे अंतर आहे. आपण या भूमीवर मस्तक टेका असं आपल्याला सांगितलं, आपल्याला अपमान वाटेल, ब्राह्मणाला नाही ! म्हणून दक्षिणा म्हणूनही हिला आपल्याला देता येणार नाही !

**विश्वा०** : मी स्वस्त्रीसारखं हिचं पालन करीन !

**वसिष्ठ** : कामधेनूच्या पालनाचा अधिकार फक्त ब्रह्मर्षीलाच आहे.

**विश्वा०** : असेल, पण क्षत्रिय-बलावर कुठलेही अधिकार मी बळकावू शकतो. ब्राह्मण नाही म्हणून आपण मला झिडकारत आहात ! मी क्षत्रिय म्हणून तिचं बळजबरीनं हरण करीन ! आपण मला खजिल करण्याच्या हेतूनं आपल्या या भौतिक ऐश्वर्याचं जे प्रदर्शन केलंत ते आम्ही अनुभवलं ! शस्त्र नाही, शस्त्र नाही असं वारंवार म्हणत असलात, तरी कामधेनू हे तुमच्या हाती असलेलं शस्त्रच आहे. आणि समोरच्या व्यक्तीला निःशस्त्र करणं हा क्षत्रिय म्हणून माझा धर्मच आहे. मग असो कुणी तो ब्रह्मर्षी वा असो कुणी चांडाळ ! असेल सामर्थ्य तर करा प्रतिकार !

[ नंदिनीचं मनगट धरून तिला खेचून नेऊ लागतो. ]

**नंदिनी** : आई ऽऽ

**विश्वा०** : आता हिच्या रक्षणाची जबाबदारी ?

**वसिष्ठ** : कामधेनूचं संरक्षण मी कोण करणार राजन् ! – तू स्वतःचं संरक्षण कर !

( तो तिला ओढून पलीकडे नेतो. हंबरण्याचा आवाज. विजेचा कडकडाट व्हावा तसा आवाज होतो. अंधार होतो. भयानक आवाज. बाण सुटताना होणारे आवाज. किंकाळ्या– एकदम सगळं शान्त. )

( विज्ञान थरथर कापत उभा आहे. )

**ज्ञान** : काय झालं रे ? हवेत काय वार करत बसलास ?

**विज्ञान** : सत्यानाश !

**ज्ञान** : सत्यानाश ?

**विज्ञान** : अरे धेनू कसली ती महामाया ? स्वामींच्या हाताला झटका देऊन तिनं आपला केशसंभार सोडलान् मात्र. केसागणिक जसा सैनिक उत्पन्न व्हावा तशी वृक्षांच्या पानापानाला सेना फुटली. स्वामींनी सर्व सेना निमिषार्धात

निश्चेष्ट केली ! तुझ्या ब्रह्मर्षींच्या हुंकाराचं सामर्थ्य सांगू ? स्वामींचे शंभर पुत्र उभ्या जागीच आडवे झाले !

**ज्ञानः** अरे अरे, असं व्हायला नको होतं. युद्ध संपलं ?

**विज्ञान :** नाही, मी पुढं आलो !

**ज्ञान :** तुझे स्वामी असताना तुला कसली भीती ?

**विज्ञान :** अरे आता स्वामींचंच अस्तित्व धोक्यात आहे.

**ज्ञान :** का ?

**विज्ञान :** ती बघ ! आली, आली नंदिनी !

[ आतून धावत आलेली नंदिनी वर मध्यावर येऊन उभी राहते. ]

**विश्वा० :** ( प्रवेश ) माझा सर्वनाश करून तू सुखरूप परत आलीस– पण मी तुला जिवंत ठेवणार नाही. कामधेनूचं पालन करण्याचा अधिकार फक्त ब्रह्मर्षींलाच आहे काय ? मला नाही तर नाही. पण त्यालाही मी तुझी प्राप्ती होऊ देणार नाही. ( बाण धनुष्याला लावतो.) तुलाच जगातून नाहीशी करतो.

( विजेचा लोळ उत्पन्न होऊन ती दिसेनाशी होते. आणि मागच्या आकाशात स्वर्गाच्या दिशेनं जाणारी नंदिनी दिसू लागते... ती म्हणते– )

" राजा, मला इथून नेण्याचा प्रयत्न करू नकोस. मी फक्त ब्रह्मर्षींच्या घरात राहात असते. तुझ्या मनात माझ्याविषयी उत्पन्न झालेल्या आसक्तीची मला कल्पना आहे– पण ब्रह्मर्षीपद मिळवल्याशिवाय माझी अपेक्षा करू नकोस. वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या रूपात जन्मभर मी तुला भेटत राहीन, या क्षणी पराभूत आहेस, परत जा ! जा, परत जा !

( नंदिनी दिसेनाशी होते.)

**विश्वा० :** ( विज्ञानाला ) कुणाचं तोंड बघत उभा आहेस ? चल नीघ येथून !

( तो आणि विज्ञान जातात. )

[ अंधार होतो. ]

## प्रवेश ३ रा

[ विश्वामित्राच्या राजप्रासादातील माधवीचा महाल दिसतो. माधवी आसनावर बसलेली दिसते. तिच्यासमोर अमात्य आणि सेनापती हात जोडून उभे आहेत. ]

**अमात्य :** महाराणी, आपणच यातून काही उपाय काढू शकत असाल तर काही तरणोपाय आहे ! आमचे सर्व उपाय हरले !

**माधवी :** म्हणजे काय ?

**अमात्य :** सहा मास पूर्ण झाले. प्रजेला राजदर्शन दुर्लभ झालं आहे. कारभारातून अंगच काढून घेतलं आहे.

**सेना. :** पराभव इतका मनाला लावून घेतला तर राज्य कसं चालायचं ?

**अमात्य :** असा पितृवत प्रेम करणारा राजा नजरेआड राहिल्यामुळं प्रजाही कष्टी आहे.

**सेना. :** आपण तरी त्यांची समजूत घाला.

**अमात्य :** युवराजांना राज्याभिषेक करण्याविषयी राजपुरोहितांशी चर्चा केली ती कोणत्या कारणासाठी ?

**सेना. :** आपल्याजवळ काही बोलले असतील तर—

**माधवी :** नाही, अमात्य ! नगरीत परत आल्यापासून स्वामी एकान्तात आहेत. आमच्याशीही मोकळ्या मनानं बोलत नाहीत ! आम्हीही त्यांचं दुःख ओळखायला उत्सुक आहोत.

**अमात्य :** मी सांगू देवी ? फक्त ब्रह्मर्षीलाच प्राप्त होऊ शकणारी नंदिनी—कामधेनू हेच जर त्या दुःखाचं कारण असेल तर ते खरोखरीच अप्राप्य आहे. त्याचा अट्टाहास त्यांनी धरू नये ! असं कोणतंच सुख महाराजांना पृथ्वीवर अप्राप्य नाही की जे कामधेनूसाठीच अडून राहील !

**सेना. :** अनपेक्षितरीत्या समोर आलेल्या सामर्थ्यामुळं आम्हांला तात्कालिक पराभव पत्करावा लागला असेल तरी त्याची इतकी खंत न करता पुन्हा एकदा विश्वविजयासाठी उभे राहू. स्वामींच्या सुखासाठी रक्ताचा थेंब नि थेंब असेपर्यंत लढण्याची माझ्यासह सर्व सैनिकांची तयारी आहे.

**माधवी :** आपल्या सर्वांच्या सदिच्छा मी त्यांच्यापाशी पोचवीन ! तुम्ही

जितके त्यांच्या दुःखामुळं व्यथित आहात तितकीच– वा त्याहूनही अधिक मी दुःखी आहे ! आपण या– मी मार्ग शोधीन– [ दोघं जातात. ]

[ आणि आतून भगवी वस्त्रं परिधान केलेला विश्वामित्र प्रवेश करतो. ]

हे काय ? आपण ? आणि या वेषात ?

**विश्वा० :** होय, माधवी. राज्यत्याग करून तपश्चर्या करण्यासाठी तुझी अनुमती घेण्यासाठीच मी आलो आहे.

**माधवी :** त्या पराभवानं आपण इतके खचलात ?

**विश्वा० :** पराक्रमानं पराभवाची भरपाई करता येईल माधवी; पण केवळ ब्रह्मर्षीच कामधेनूचं पालन करू शकतो. कुणी क्षत्रिय नाही, हा अपमान मी विसरू शकत नाही.

**माधवी :** त्या नंदिनीविषयी आसक्ती तर आपल्या मनी उत्पन्न झाली नाही ना ?

**विश्वा० :** नाही माधवी. कामधेनूची कन्या फक्त ब्रह्मर्षींच्या अंकित राहील. कुणा क्षत्रियाच्या नाही, हे असं का ? ज्ञानग्रहणाचा अधिकार मिळविण्यासाठी ब्रह्मर्षिपद मिळवणं येवढंच असेल तर मी तेही मिळवीन.

**माधवी :** स्वामी, राग मानू नका; पण कुणाविषयी कटुता मनात धरून हाती घेतलेल्या कार्याचा शेवट गोड होत नसतो.

**विश्वा० :** नाही माधवी, वसिष्ठाविषयी कोणतीही कटू भावना माझ्या मनामध्ये नाही ! माझ्या मनात आहे ती फक्त ईर्षा ! जे ब्रह्मर्षिपद त्यानं मिळवलं ते मला मिळवायचं आहे ! या क्षत्रिय विश्वामित्राला ब्रह्मर्षी विश्वामित्र व्हायचं आहे.

**माधवी :** पण त्यासाठी फार देहकष्ट सोसावे लागतील. तपश्चर्या करावी लागेल.

**विश्वा० :** देहकष्टाची मला चिंता नाही, माधवी ! माधवी, माझ्या परिवारात असलेल्या इतर सर्व स्त्रियांपेक्षा मी तुझं मोल अधिक मानतो हे तू जाणतेसच. एक प्रश्न विचारू ?

**माधवी :** आपल्या मनात असेल तेच उत्तर आपल्याला मिळेल !

**विश्वा० :** माझ्याबरोबर तुलाही हा राज्योपभोग सोडावा लागला तर व्यथित तर होणार नाहीस ?

**माधवी :** सप्तपदी झाली त्या वेळी पहिलं पाऊल मी आपल्यासह टाकलं

तेच मुळी स्वर्गापर्यंतच आपली सोबत करण्यासाठी !

**विश्वा०** : स्वर्ग ? तोच स्वर्ग, तपश्चर्येच्या बळावर, वसिष्ठ ज्ञानबळावर म्हणतो, मी म्हणतो विज्ञानबळावर मी तो पृथ्वीवर खेचून आणीन ! फक्त तू मला अनुमती दे.

**माधवी** : कामधेनूच्या प्राप्तीसाठी ब्रह्मर्षीपद, येवढा जरी आपला हेतू असला तरी माझी ना नाही ! स्वर्ग तर दूरच पण माझं पाऊल आपल्या पावलावर ! विनंती, फक्त एकच !

**विश्वा०** : बोल माधवी !

**माधवी** : तपश्चर्या पूर्ण झाल्यावर मला विसरू नका.

[ तिच्या डोळ्यांतलं पाणी बोटांनी पुसतो. अंधार. ]

## प्रवेश ४ था

[ पुन्हा उजेड. वरच्या मध्यबिंदूजवळ पूर्वी लावलेलं रोप आता थोडं वाढलं आहे. ]

( ' मातीच्या ग पाळण्यात, बाळ पृथ्वीचं ठेवू या ' या ओळी गुणगुणत ज्ञान आतून हातात भरलेला जलकुंभ घेऊन येतो. झाडाच्या बाजूला मांडी घालून बसतो. )

**ज्ञान** : हां, मित्रा ! माझ्या हातचं पाणी मिळालं तर तुझा बुद्धिभेद होईल, नाही का ? पाणी घालण्याआधी शिक्षण देतोय. नीट ध्यानात ठेव. आयुष्याचा उपयोग कधीही सुगंध किंवा सावली देण्यासाठी करायचा नाही, समजलं का ? मी हे पाणी घालतोय. मोठा होशील, आभाळाला पोचशील. तुझ्या फांद्यांचा विस्तार चहूबाजूंनी वाढेल. आता सांगतो ते लक्षात ठेव. एखादा श्रान्त असा प्रवासी, तहानेनं व्याकुळ वगैरे झालेला, या दिशेनं येईल. उन्हाच्या तापानं करपून निघाल्यामुळं तुझ्या छायेखाली विश्रान्तीसाठी थांबेल. इथं बसेल. तो बसला रे बसला की त्याच्या डोक्यावरच्या फांद्या सगळ्या बाजूला करून मागं घेऊन जायच्या. त्या फांद्यांनी एक पाषाण उचलून तो त्याच्या डोक्यात घालायचा ! हं, घे पाणी.

(हे बोलत असतानाच मध्येच वसिष्ठाच्या आश्रमाच्या बाजूनं विज्ञान येतो.)

ग्रा. क्र. २०७९२ नों. दि ..............
वि. ....नाटक... क्र. ....१५१.५....


**विज्ञान** : हा वृक्ष लावला तेव्हा किती लहान होता—

**ज्ञान** : हं, तू जन्माला आलास तेव्हा तूदेखील लहानच होतास. वय वाढलं म्हणून तू वाढलास. तू पुन्हा इकडे कसा काय आलास ?

**विज्ञान** : स्वामींची विनंती तुझ्या गुरुजींना पोचवून आलो !

**ज्ञान** : कसली ?

**विज्ञान** : स्वामींना त्यांची भेट हवी आहे.

**ज्ञान** : अरेरे ! एवढा पराभव झाल्यानंतरही भेट कशाला घेतात ?

**विज्ञान** : हळू बोल ! येवढ्यात स्वामी येतील.

**ज्ञान** : पुन्हा सैन्यासह ?

**विज्ञान** : आता सैन्य नाही ! सर्व वैभवाचा त्याग करून स्वामी गिरिकंदरात निघाले आहेत.

**ज्ञान** : अरे अरे ! मग आता तुझं काय ?

**विज्ञान** : माझं काय ? मीही त्याच मार्गानं जाणार ! मीसुद्धां त्यांच्याप्रमाणंच माझंही शस्त्र खाली उतरून ठेवणार.

**ज्ञान** : हो ! एरव्ही उपयोग नव्हताच ! आण, इकडे आण ते ( विज्ञानाच्या हातातलं शस्त्र स्वतः घेतो. ) मग तू गिरिकंदरांत जाणार ?

**विज्ञान** : नाही ! ज्ञानाची उपासना करणार. तुझ्याजवळ बसून !

**ज्ञान** : माझ्याजवळ बसून काय करणार ? मी आता शस्त्र धारण करणार.

**विज्ञान** : अरे, ज्या दिवशी मी आश्रमात स्वर्ग पाहिला, त्याच दिवशी मी हा निर्णय घेतला.

**ज्ञान** : आणि ज्या दिवशी तुझ्या पराक्रमी स्वामींचा अपमान झालेला मी पाहिला, त्याच दिवशी मी हा निर्णय घेतला.

**विज्ञान** : शान्ततेचं सुख तुला कळणार नाही.

**ज्ञान** : अपमानाचं दुःख तुला समजणार नाही. आजपासून तुझा मार्ग वेगळा.

**विज्ञान** : तुझा मार्ग वेगळा !

( दोघेही दोन दिशांनी आत निघून जातात. आणि नंतर एका बाजूनं विश्वामित्र आणि दुसऱ्या बाजूनं वसिष्ठ एकमेकांकडे बघत वर चढून येतात. )

**वसिष्ठ** : आपला संदेश पोचला राजन् ! सर्व राग विसरून आपण परत

इथं आलात — धन्य ! माझ्यायोग्य काही सेवा असली तर अवश्य सांगा.

**विश्वा० :** जेत्यानं जिताची सेवा करायची नसते. आपण करीत असलेला उपहास न समजण्याइतका मी अज्ञ नाही. क्षत्रिय असूनही !

**वसिष्ठ :** मी आपल्याला जित समजत नाही — कारण मी स्वतःला जेता मानत नाही. ज्ञानसाधनेत निमग्न असणारा मी एक नम्र साधक आहे. आपल्या-सारख्या पराक्रमी पुरुषाप्रमाणं मी कुठलंही शस्त्र वापरत नाही !

**विश्वा० :** धादान्त असत्य !

**वसिष्ठ :** म्हणजे ?

**विश्वा० :** शस्त्रबलावर विश्वविजय करणाराचा पराभव आपण केवळ एका शस्त्रानंच केलात !

**वसिष्ठ :** कोणत्या ?

**विश्वा० :** कामधेनू ! ते एक शस्त्रच आहे असं मी म्हणतो—

**वसिष्ठ :** असो.

**विश्वा० :** असो नव्हे आहेच. ज्ञानबलावर •ब्रह्मर्षीपद मिळवून आपण मिळवलेलं ते एक शस्त्रच आहे.

**वसिष्ठ :** आपण ते मिळवा.

**विश्वा० :** तेच सांगण्यासाठी मी आपल्याला इथं पाचारण केलं.

**वसिष्ठ :** म्हणजे ?

**विश्वा० :** मी एक जन्मजात क्षत्रिय आहे. आव्हान देऊनच समोर येणाऱ्या शत्रूला सावध करून मगच आम्ही युद्ध खेळत असतो !

**वसिष्ठ :** युद्ध ?

**विश्वा० :** होय, युद्धच ! धर्मयुद्ध ! ज्या ब्रह्मर्षीपदाच्या बळावर आपण कामधेनू मिळवलीत— ती कामधेनू मिळवून — तुमच्यावर मात करण्यासाठी हा विश्वामित्र तपश्चर्येला निघाला आहे. या हातानं शस्त्रबलावर स्वर्ग पृथ्वीवर खेचून आणीन ! ज्या विचारांचा वृक्ष वाढविण्यासाठी आपण उत्सुक आहात— तोच विचार, तोच स्वर्ग, तोच भ्रातृभाव विज्ञानबळावर पृथ्वीवर खेचून आणीन— ही प्रतिज्ञा करून — ज्ञानबलावर जो चंद्र आपण आपल्या आश्रमात आणलात, तोच चंद्र तिथल्या सर्व तारांगणासह इथं पृथ्वीवर निर्माण करण्या-साठी — विज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी हा क्षत्रिय विश्वामित्र तपश्चर्येला

निघाला आहे. हे ज्ञानी वसिष्ठा, आपलं ब्रह्मर्षीपद सांभाळ !

(झाडाला पाणी घालतो.)

**वसिष्ठ :** हे इतकं आवर्जून सांगण्याचं कारण ?

**विश्वा० :** आव्हान देऊनच युद्धाला सामोरं जाणं हा धर्म क्षत्रियाचा !

**वसिष्ठ :** यशस्वी व्हा ! तपश्चर्येसाठी महामृत्युंजय मंत्र हवा असल्यास, तो मी आपणास देतो. तो मीच रचलेला आहे, देवांच्यासाठी !

**विश्वा० :** आपण ?

**वसिष्ठ :** होय, राजन् !—मी ऋषी आहे देवांचा ! मी त्यांना हे मंत्र शिकवतो. म्हणून मला ब्रह्मर्षी म्हणतात. हे मंत्र तयार करण्यासाठी— तुम्हाला वरदायिनी सरस्वती प्रसन्न होवो अशी शुभेच्छा मनात धरून आपल्याला एक मंत्र देतो— तो म्हणा— !

ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात् ॥

**विश्वा०** हॅ ऽऽ ! माझ्या तपश्चर्येचा मंत्र फक्त एवढाच असेल !

**वसिष्ठ :** कोणता ?

**विश्वा० :** या क्षत्रिय विश्वामित्राला ब्रह्मर्षी विश्वामित्र व्हायचं आहे. हे सूर्यनारायणा, तुझ्या साक्षीनं या क्षणापासूनच, शस्त्र आणि शास्त्र, ज्ञान आणि विज्ञान, ब्रह्मर्षी आणि क्षत्रिय यांचा संघर्ष सुरू होतो आहे. सावधा ऽ ऽ न... (जातो.)

**वसिष्ठ :** (तो गेल्यावर झाडाला पाणी घालत) तथास्तु ! काही का असेना, काही काल तरी धरतीवरचा संहार थांबला, हा काय कमी लाभ झाला ? ये, अरुंधती...

**अंक पहिला समाप्त**

## अंक दुसरा

### प्रवेश १ ला

[ पृथ्वीच्या गोलाच्या जागी, अनेक पर्वत-शिखरे दिसतात. मागं आकाश, पुढल्या बाजूला एका चौथऱ्यावर विश्वामित्र ध्यानस्थ बसलेला दिसतो. ]

या कुन्देन्दुतुषार हार धवला या शुभ्रवस्त्रावृता।
या वीणावरदंड मंडित करा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युत शंकर प्रभृतिभिर्देवैः सदावंदिता।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्या पहा ॥

[ असा श्लोक ऐकू येतो. आणि प्रत्यक्ष वीणाधारिणी सरस्वती मागं प्रगट झालेली दिसते. ]

**सरस्वती :** ब्रह्मर्षिपदाचा ध्यास घेऊन तपश्चर्येला बसलेल्या हे निग्रही राजपुरुषा, आता हे तप थांबव ! मी ज्ञानाची देवता सरस्वती तुला प्रसन्न झालेली आहे. ब्रह्मर्षिपदासाठी आवश्यक असलेलं मंत्रोच्चाराचं सामर्थ्य या वरानं मी तुला प्रदान करते. समाधी मोडून जागा होशील त्या वेळी तुझ्या तोंडून जो उच्चार बाहेर पडेल तो एक मंत्र असेल. गायत्री मंत्र असं त्याचं नाव असेल. त्याबरोबरच हे विश्वामित्रा, तू चिरंजीव होशील; तू चिरंजीव होशील !

[ समाधीतून झडझडून जागा होऊन विश्वामित्र डोळे उघडून बघतो. मांडी घालून बसल्या जागीच ]

**विश्वा० :** ॐ भूर्भुवः स्वः तत्स वितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि।
धियो योनः प्रचोदयात्।

माझ्या तोंडून मंत्राचा उच्चार झाला, माझ्या तोंडून मंत्राचा उच्चार झाला. माझ्या तोंडून मंत्राचा उच्चार झाला ! आज एका क्षत्रियाला ब्रह्मर्षिपदाचा मार्ग सापडला !

[ मागच्या आकाशात तीनचार प्रकाशाचे गोलक दिसतात. ]

'तपश्चर्येनं विश्वामित्राला देवी शारदा प्रसन्न झाली.' 'त्याच्या तोंडून गायत्री-

मंत्र जन्माला आला.' ' एक क्षत्रिय ऋषिपदाला पोचला.'
' धन्य धन्य ऋषी विश्वामित्र ! "... असे वेगवेगळे देवांचे आवाज ऐकू येतात. देवांचा गोंगाट ऐकून ज्ञान बाहेर येतो. त्याच्या अंगावर आता सैनिकाचा (पूर्वीचा विज्ञानाचा) पोषाख आहे, आणि विज्ञान येतो त्याच्या अंगावर पूर्वीचा ज्ञानाचा वेष आहे.)

**ज्ञान** : ए ! अरे काय चाललंय काय ? कसला गोंगाट चाललाय ? माणसं आहात का आहात कोण ?

**विज्ञान** : देव आहेत देव ! देव जमलेत सगळे ! सभा आहे. देवांची सभा भरलीय ना ? तो गोंधळ असणारच !

**ज्ञान** : सभा म्हटली म्हणजे गोंधळ असणारच ! मग ती माणसांनी बोलावलेली असो– की देवांची असो. पण आहे कशाबद्दल ?

**विज्ञान** : कुणास कळे ! तुझे गुरुजी पण स्वर्गात गेलेत. त्यांना निमंत्रण आहे देवांचं !

**ज्ञान** : बरोबर ! स्वर्गात जायचं म्हणजे देवाचं निमंत्रण हवंच.

**विज्ञान** : अरे तसं नाही ! ते ब्रह्मर्षी आहेत ना, म्हणून त्यांना निमंत्रण आहे. असं जिवंतपणी स्वर्गात जाता येत नसतं ! आमच्या स्वामींना नसतं जाता आलं ?– मानानं ? तो अधिकार त्यांना हवाय ! त्यांना ब्रह्मर्षी व्हायचंय.

**ज्ञान** : पण सभा कसली आहे, तुला माहीत नाही ? थांब थांब ! ही आली नंदिनी. तिला विचारू या. सगळ्या विश्वभर मुक्त संचार करीत असते. सोनचाफ्याबरोबरच बकुळीच्या सुगंधासारखी ! कामधेनूची लेक आहे ना, कालवडीसारखी हुंदडत असते. तिला विचारू या. ए, नंदिनीबाई, इकडे ये. (नंदिनी आतून धापा टाकत येते.) ऑऽ, का ग ? दमलीस ?

**नंदिनी** : मी देवांच्या पूजेसाठी आज जेव्हा स्वर्गात गेले– शोध शोध शोधून दमले, पायच त्यांचे हरवलेले–

**ज्ञान** : देवांचे ?

**नंदिनी** : नाही तुझे !

**विज्ञान** : त्याचे काय पाय हरवतात, त्याचं हरवलंय डोकं !

**ज्ञान** : आणि याचे हात—

**नंदिनी** : शोध शोध शोधत होते, देव सगळे दिसत होते, ते माझ्याशी

बोलत होते, पण पूजेसाठी नम्र व्हावं– तर पाय हाती लागत नव्हते—

**ज्ञान :** का ?

**नंदिनी :** देव सगळे नाचत होते; देव सगळे नाचत होते. आनंदानं गात होते. एक क्षत्रिय ऋषी झाला– धन्य धन्य म्हणत होते. म्हणत म्हणत नाचत होते. पाय त्यांचे मिळत नव्हते. अशी आज गंमत झाली. स्वर्गामध्ये सभा झाली.

**ज्ञान :** कशासाठी सभा झाली ?

**नंदिनी :** तुला सांगून काय करू ?– ज्याचा त्याला निरोप देते, तू ज्ञानी आहेस ना ?—

**ज्ञान :** बघ रे ही एक आहे ओळखणारी !

**नंदिनी :** मग तू विज्ञानाला ज्ञान देत बस. मी सज्ञानाचं ज्ञान अनुभवायला जाते. विश्वामित्राजवळ प्रगट होते. जिथं सांगायचं तिथं जाऊन सांगते.

**ज्ञान :** तू सज्ञानाचं ज्ञान अनुभवायला जातेस ? तोपर्यंत मी या अज्ञानाला ज्ञान देऊन येतो.

( ती दोघं आत जातात, नंदिनी ध्यानस्थ बसलेल्या विश्वामित्राजवळ जाते.)

**नंदिनी :** क्षत्रियानं तप केलं, देवी त्याला प्रसन्न झाली. ब्रह्मर्षींच्या मंत्राचीही आता त्याला सिद्धी आली – देव सगळे क्षत्रियच. आता त्यांना धीर आला. त्या देवांच्या गोत्रामधला आज एक ऋषी झाला !

**विश्वा० :** कोण ? नंदिनी ?

**नंदिनी :** आनंदिनी !

**विश्वा० :** इथं माझ्यासमोर येण्याचं साहस कसं केलंस ?

**नंदिनी :** आनंदाला कुठं जायला – साहस कुठं आड येतं ? मी कुठंही संचार करते. कधी कुणाच्या मनात बसते. तरी संचार करीत असते. वेगवेगळी नावं घेते ! रूपानं मी तीच असते. मला कसलं भय आहे ? तुमच्या आधी जन्मा आले. तरी वयानं लहान झाले – देवीनं आज कृपा केली. चिरजीव आज झाला. मी जन्माला आले तेव्हा – चिरंजीव जन्म झाला. मी कुठंही संचार करीन. तुमच्या घरी जाऊन येईन. तुमचा निरोप घेऊन जाईन. यशातुमचं तिला सांगेन. आनंदाचे कण जगात – मुक्त हाती वाटत जावं – ज्याचं सुख त्याच्या-साठी – ज्याचं त्याला भेटत जावं !

**विश्वा०** : आता कुठून आलीस ?

**नंदिनी** : आता झाले स्वर्गामधून ! देवांचा एक निरोप घेऊन ! तुम्ही ब्रह्मर्षी कसे होता ! तो क्षण मनात धरून ! !

**विश्वा०** : म्हणजे ?

**नंदिनी** : प्रसन्न झाले देव सगळे. आपल्या घोर तपस्येला — तुमच्यासाठी देवांचाही ब्रह्मर्षींशी वाद झाला.

**विश्वा०** : वसिष्ठ ?

**नंदिनी** : हो, ब्रह्मर्षी वशिष्ठ !

**विश्वा०** : ब्रह्मर्षी वसिष्ठ तुझे पालक असूनसुद्धा तूच इथं हे सांगत आलीस ? का ?

**नंदिनी** : ब्रह्मर्षी या पदासाठी त्यांनी त्यांना नकार दिला.

**विश्वा०** : हे सांगून तू मला सुखी केलंस !

**नंदिनी** : हेच माझं दुःख आहे, हे फक्त प्रकट केलं !

**विश्वा०** : माझ्या दुःखात तुझं दुःख ? आश्चर्याचा प्रकोप झाला !

**नंदिनी** : हा माणसाचा धर्म झाला ! दुसऱ्याच्याही दुःखामुळं— एकाला जे दुःख होतं, या दुःखानं त्या दुःखाचं— सान्त्वन हसत होत जातं— !

**विश्वा०** : तू आहेस तरी कोण ?

**नंदिनी** : मी मनगामिनी, शुभकामिनी !

जन्मभर मी तुम्हाला अशीच दिसत असेन ।
तुमचं भलं जन्मभर अशीच चिंतत असेन ।।

**विश्वा०** : कशासाठी ?

**नंदिनी** : एक क्षत्रिय ऋषी होतो, मलाही हे नवीन आहे— ।
ब्रह्मर्षींची वाटचाल, माझे ते कुतूहल आहे— ।।
तुमच्या भल्यात भलं बघणं, हा माझा धर्म आहे ।
शोध घेत फिरते काय ब्रह्मर्षींचं मर्म आहे ।।

**विश्वा०** : ते ब्रह्मर्षीपदाचं मर्म तुला सापडणार आहे ?

**नंदिनी** : तुम्हाला सापडलं, मला मिळालं ?

**विश्वा०** ; कारण ?

**नंदिनी** : कारण तुमच्या दुःखाबरोबरच तुमच्या सुखात माझं सुख !

ब्रह्मर्षींच्या पदाआधी देवांनी जी कृपा केली...

**विश्वा॰** : देव कोणती कृपा माझ्यावर करणार ? ब्रह्मर्षी पदाशिवाय कुठलीच अपेक्षा मला देवांच्याकडून नाही. माझ्या तपश्चर्येनं चळचळा कापत असलेले ते आसनस्थ इंद्र—वरुणादी देव, स्वतःची जागा जाईल म्हणून मला भ्यालेले देव, ते कोणती माझ्यावर कृपा करणार ?

**नंदिनी** : ऋषी ?

**विश्वा॰** : नाही ब्रह्मर्षी !

**नंदिनी** : राजर्षी ?

**विश्वा॰** : नाही ब्रह्मर्षी !

**नंदिनी** : महर्षी ?

**विश्वा॰** : नाही— नाही— नाही ! —ब्रह्मर्षी !

[ मागच्या बाजूनं स्वर्गाकडून वसिष्ठ खाली उतरत येताना ]

**वसिष्ठ** : ब्रह्मर्षी नाही— त्रिवार नाही— अजून नाही !

**नंदिनी** : मी आता लांब जाते, तुमचा वाद ऐकून घेते—
तेच घरी सांगून येते. पुन्हा तुम्हाला भेट देते—

[ जाते ]

**वसिष्ठ** : तुम्ही सर्व देवांनी कितीही आग्रह केला, तरी मला यांना ब्रह्मर्षी म्हणता येणार नाही ! तुम्ही सर्व देव क्षत्रिय असल्यामुळं कदाचित तुम्हाला माझा राग येत असेल. पण तुम्ही देवांनी माणसाच्या पाया पडावं असं जसं मला वाटत नाही, तसंच एका क्षत्रियानं ब्रह्मर्षी व्हावं असंही मी म्हणणार नाही ! साक्षात सरस्वतीदेवी प्रसन्न झाल्यानं मंत्रोच्चाराचं सामर्थ्य त्यांना आलं म्हणून हवं तर तुम्ही त्यांना ऋषी म्हणा — पण ब्रह्मर्षी नाही — त्रिवार नाही — अजून नाही !

**विश्वा॰** : ऐका तर मग ! मी एक विश्वविजेता क्षत्रिय आहे ! मनात आलेली ईर्षा पूर्ण करण्यासाठी पाऊल पुढं टाकलेलं आहे ते मी पुढंच टाकणार आहे. ब्रह्मर्षीचं मंत्र उच्चाराचं सामर्थ्य— देवी शारदेकडून मी तपश्चर्येच्या बळावर मिळवलेलं आहे. शस्त्रसामर्थ्याचा वापर करण्याचं सामर्थ्य तर मी माझ्या रक्तातच खेळवत असतो. त्या बळावर मी ब्रह्मर्षीपद खेचून आणीन !

**वसिष्ठ** : मग जा ना त्या शिवाकडे— तो शिवशंकर, तो प्रलयंकर, तो तर

बसलेलाच आहे शस्त्रास्त्रांचे साठे घेऊन— मागायला कोण येतो आहे, त्याची वाट बघत ! त्याची मनधरणी करा— तपश्चर्या करा, त्याच्या विज्ञानाचा अभ्यास करा. मात्र घेतलेल्या अस्त्रांचा, विज्ञानशास्त्राचा प्रयोग करून पृथ्वीवर स्वर्ग आणा. आम्ही प्रेमानं उत्सुक आहोत आपलं यश बघायला ! पण अस्त्र वा शस्त्र हाती आलं की विध्वंस ही मानवी मनाची करमणूक असते. ही एक सहज-प्रवृत्ती आहे. तिच्यापासून सावध, नव्हे दूर रहा. विज्ञानानं विध्वंस घडवण्या-पेक्षा, विज्ञानानं अज्ञानाला सज्ञान केलं तर सहजगत्या पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होईल ! आपण अवश्य शिवाची तपश्चर्या करा. आम्ही तुम्हाला सुयश चिंतितो.

[ जाऊ लागतो. जाताना परत फिरतो. ] हां — एक जाता जाता; आपल्या रक्तात खेळत असलेल्या क्षत्रियवृत्तीला उद्देशून सांगतो — समोर उभा असलेला शत्रू, नेहमीच असमर्थ असतो, — असा समज, नेहमीच खरा असतो असं नाही.

( असं म्हणून वसिष्ठ आत जातो. आत गेलेल्या वसिष्ठाकडे रागानं, संतापानं पाहात विश्वामित्र म्हणतो—)

**विश्वामित्र :** या तुझ्या उपहासाला, एक दिवस अशाच उपहासानं उत्तर देईन की, विश्वामित्र हे नाव, वसिष्ठ या नावाला जन्मभर जोडलं जाईल. भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी तप करण्याचा तू मला उपदेश करतोस ? करीन ! करीन ! ! यक्ष प्रजापतीनं देवी पार्वतीच्या केलेल्या अपमानाची भरपाई करण्यासाठी, शिवानं केलेल्या तांडवानं, अग्निशाखेत होरपळून निघणारं विश्व, शीतल वाटेल इतकी उग्र तपश्चर्या करीन ! सारं विश्वच त्राहि भगवान् होऊन माझ्या श्वासोच्छ्वासाच्या उष्णतेनं, अवघा आसमंत करपून जाईल अशी अवस्था करीन——

( असं म्हणून जायला वळतो, तेवढ्यात हे सर्व चिंतातुर होऊन ऐकत असलेली नंदिनी पुढे होऊन विचारते—)

**नंदिनी :** याचे परिणाम ?

[ अंधार होतो ]

## प्रवेश २ रा

[ आपल्या झोपडीच्या बाहेर एका दगडावर माधवी बसली आहे. मागं नंदिनी उभी ]

दुष्काळाचे सावट अवघ्या भूमीवरती पडले
अन्न मिळेना, जलहि मिळेना, व्याकुळ जीवन झाले
पशुधन सरले सरले संचित रिक्त पूर्ण ग्रह झाले.
आज पोटचे मूल विकावे काय प्राक्तनी आले.
राजाची राणी आता हो केविलवाणी

**नंदिनी :** उदासवाणी बसली राणी खंत कशाची हो बाई !

**माधवी :** कोण बाई तू ?

**नंदिनी :** सखी म्हणा वा लेक म्हणा– कळेल त्याची कां घाई ॥
एक सांगते वृत्त पतीचे,– साठवून घ्यावे कानी ।
दुःखावरती एक सुखाचा शिडकावा समजा राणी ॥
तुझ्या पतीचे भाग्य उजळले,– तपे फळा आली ।
मंत्रोच्चारण शक्ती त्याते– सरस्वतीने दिली ॥

**माधवी :** ( डोळे पुसून हात जोडते. ) कोण आहेस बाई तू ?– ये बैस अशी ! कुठून अशी सोन्याच्या पावलांनी, अमृताची वाणी घेऊन आलीस ?– दीर्घायुषी हो !– ( नंदिनी हसते ). वनदेवी आहेस का ? आहेस तरी कोण ?

**नंदिनी :** मी नंदिनी ! कामधेनूची कन्या नंदिनी !

**माधवी :** म्हणजे जिच्यावरून येवढं रण झालं ..

**नंदिनी :** ते एक कारण झालं; खरं रण तर पुढंच आहे !

**माधवी :** आता कसलं म्हणावं रण करता ? त्या वेळी घडलेल्या संहाराची पापं सगळी पृथ्वी अजून भोगते आहे ! सगळं वातावरणच करपून गेलं आहे. दुःखामुळं डोळ्यांना पाणीसुद्धा येत नाही. तेसुद्धा सुकून गेलंय. तू त्यांना भेटू शकशील ? माझा निरोप सांगू शकशील ?

**नंदिनी :** सांगू शकेन ! सांगू शकेन ! मनामनातून प्रवास करते, याच्या मनातलं त्याच्या मनात अलगद जाऊन ठेवून येते.

**माधवी** माझा निरोप त्यांना सांग– म्हणावं पुन्हा संहार करू नका.

त्याची फळं वाईट असतात !

**नंदिनी :** सांगेन, सांगेन— असंच सांगेन !

**माधवी :** तपश्चर्या करा— यशस्वी व्हा— इकडं, इकडं सर्व सुखरूप आहे— असं तिकडं सांग—

**नंदिनी :** नसतानाही तसं सांगू ?

**माधवी :** त्यांच्या यशात माझं यश ! त्यांच्या सुखात माझं सुख ! त्यांच्या साधनेत आमच्या दुःखाचं विघ्न नको.

**नंदिनी :** पुन्हा रण करू नका— आम्ही इकडं सुखी आहोत. असं जाऊन तिकडं सांगेन, ऐकून घेणं त्यांचं काम !

**माधवी :** तुझ्याशी ते बोलतात ?

**नंदिनी :** मी त्यांच्याशी बोलते.

**माधवी :** ते ?

**नंदिनी :** ते आपल्याशी बोलतात.

**माधवी :** म्हणजे ?

**नंदिनी :** (स्वतःच्या छातीला हात लावून) म्हणजे आपल्याशी असं मी समजून चालते ! सुगंध आपण वाटत जावं— घेणं घेणाराचं काम ! सुगंधाला अश्रू येतो, असा क्षण जेव्हा येतो—

**माधवी :** सुगंधाला अश्रू ? फुलासारखंच बोलणं आहे ग तुझं !

**नंदिनी :** होऽऽ सुगंधाला अश्रू येतो— सांगू त्याची कथा— ? फुलांनी बहरलेलं झाड होतं बकुळीचं— आतुरलेलं होतं, जगाला सुगंध वाटायचा म्हणून— त्याच्या खालून गेला एक शस्त्रधारी— त्याला काही तो वास आला नाही ! बकुळीला दुःख झालं, तिच्या डोळ्यां पाणी आलं— एक फूल खाली पडलं, तो होता अश्रूंचा थेंब ! सुगंधाच्या !— मी आता जाते ! काही तरी वेगळाच गंध मला इथं आला, माझा धर्म फुलावरून फुलाकडे निघून गेला ! येत जाईन, जात जाईन, पुन्हा भेट घेत राहीन, येत जाईन, जात जाईन—

[ असं म्हणत म्हणत आत जाते. ]

**माधवी :** जा, बाई जा; सुखरूप जा. दीर्घायुषी हो— चिरंजीव हो ! या दुष्काळाच्या खाईतून शक्य तितक्या दूर जा ! स्वतःच्या दोन मुलांच्या पोटा-साठी तिसरं मूल विकायला निघालेल्या एका तळमळणाऱ्या आईचे कळवळ्याचे

उद्धार आहेत हे पोरी ! चिरंजीव हो !

( माधवी हे बोलत असताना, नंदिनीच्या विरुद्ध दिशेने, पण मागच्या बाजूने अतिशय विद्रूप असा दिसणारा, डोक्यावर तीन शिंगं असलेला, भयावह वाटणारा त्रिशंकू प्रवेशतो. )

**त्रिशंकू** : आई, तुम्ही मूल विकू नका !

**माधवी** : ( घाबरून )– कोण आहेस बाबा तू ? आणि मी मूल विकणार हे तुला कोणी सांगितलं ?

**त्रिशंकू** : दोन मुलांच्या निर्वाहासाठी तिसरा मुलगा विकावा म्हणून तुम्ही त्याच्या गळ्यात दर्भ बांधलात ना ?– धेनूच्या वासराच्या गळ्यात बांधतात तसा,– तो मी सकाळीच पाहिला. मी मघाच पुढं येणार होतो– पण तिसरी व्यक्ती मध्ये होती म्हणून मध्ये आलो नाही. आई, खरंच तुम्ही मूल विकू नका. तुमच्या सर्व कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी आजपासून मी माझ्यावर घेतली आहे.

**माधवी** : छे छेऽऽ !

**त्रिशंकू** : तुम्ही मला आपला कर्ता, मोठा मुलगा असं समजा. पण दुष्काळापायी आपला पोटचा मुलगा विकू नका. आजपासून एक पशू मृगया करून – आपल्या निर्वाहासाठी मी आश्रमाबाहेर टांगत जाईन.

**माधवी** : हे महाभागा, तू आहेस तरी कोण ?

**त्रिशंकू** : मी त्रिशंकू ! माझ्या डोक्यावरची तीन शिंगं, माझं हे विद्रूप बघून भीती घेऊ नका. आणि, माझी कीवही करू नका. आई, मी एक शापित राजपुत्र आहे. इक्ष्वाकु वंशाचे राजे अरुण, त्यांचा मी मुलगा ! माझं नाव सत्यव्रत ! राजगुरू ब्रह्मर्षी वसिष्ठांनी दिलेल्या शापामुळं माझी ही अशी अवस्था झालेली आहे. माझ्या सर्वांगाला येणारा दुर्गंध, चांडाळयोनीत जन्मभर वस्ती, आणि हे विद्रूप त्यांच्या शापाचा प्रताप आहे !

**माधवी** : असं पाप तरी कुठलं केलंस ?

**त्रिशंकू** : कुठलंच नाही !

**माधवी** : म्हणजे ?

**त्रिशंकू** : मी जे केलं ते पाप होतं असं मला वाटलं असतं, तर, तर...मी ते केलंच नसतं !

**माधवी** : मग केलंस तरी काय ?

**त्रिशंकू** : वडील मृगयेला गेले असताना राज्यकारभार माझ्याकडे होता. एका मुलीचा तिच्या मनाविरुद्ध होत असलेला विवाह टाळण्यासाठी— मी लग्नमंडपातून तिचं हरण करून तिला प्रासादात आणून ठेवली ! पिताजी परत आल्यानंतर हीच कहाणी त्यांना वेगळ्या रूपांत कळवली गेली !

**माधवी** : अरे पण एका विवाहित मुलीला...

**त्रिशंकू** : ती— विवाहित नव्हती. सप्तपदीसुद्धा पूर्ण झालेली नव्हती. पण या माझ्या गाऱ्हाण्याची दखलदेखील न घेता, केवळ उपमर्द म्हणून ही विद्रूपाची देणगी मला ब्रह्मर्षींच्या शापवाणीनं दिली. असो ! पण काहीही असलं तरी प्रजापालन हा माझा राजधर्म आहे, तो मला सुटू शकत नाही. कारण मी शापित असलो तरी राजपुत्र आहे. आपल्या थोर पतींना— विश्वामित्रांना— मी ओळखतो, इतकंच नव्हे तर पूज्य मानतो; म्हणून म्हणतो, आई, आपण माझी एवढी विनंती ऐका : आपण स्वस्थ रहा ! मला आशीर्वाद द्या— ( तिच्या पाया पडतो ).

**माधवी** : ( आशीर्वाद देत ) एवढा सद्भाव मनात ठेवून जगात फिरतो आहेस, कल्याण होईल ! कल्याणी भगवतीदेवीच्या नवाक्षर मंत्राचा जप कर. तुझं पूर्वरूप तुला प्राप्त होईल. ( पुन्हा नमस्कार करून तो जातो.)

**माधवी** : एकाच दिवशी दोन मुलं भेटली ! माझी असलेली— माझी नसलेली— त्या दोघांनाही चिरंजीव होऊ दे. परमेश्वरा ! माझ्या पतीला दीर्घायुष्य दे !

[ अंधार होतो. ]

## प्रवेश ३ रा

[ पूर्वीच्याच जागी विश्वामित्र तप करीत ध्यानस्थ बसलेला दिसतो. गाणे सुरू होते, आणि ते चालू असताना पर्वतशिखरांमधून भगवान शंकर प्रवेश करतात ].

ॐ नमः शिवाय । ॐ नमः शिवाय । ॐ नमः शिवाय ।

**शंकर** : शिव, मी प्रसन्न तुजवर मित्रा,
तुझ्या तपाने मिळो मान्यता, जगात कौशिक गोत्रा
शिव मी प्रसन्न तुजवर मित्रा ।। धृ० ।।

**शंकर :** उघड नेत्र !– हे निग्रही क्षत्रियभूषणा विश्वामित्रा ! नेत्र उघड. मी मूर्तिमंत रुद्र ! स्वर्गात, देवांच्या आणि ब्रह्मर्षी वसिष्ठांच्या चर्चासत्राच्या वेळी मी उपस्थित होतो. चर्चेत भाग घेत नव्हतो. कारण तुला ब्रह्मर्षीपद का मिळू नये हा मलाही प्रश्नच आहे. पण त्याचं उत्तर फक्त ब्रह्मर्षी वसिष्ठच देऊ शकतात, हेही एक सत्य आहे. म्हणून मी तुझ्यावर प्रसन्न होऊन बुद्ध्याच तुझ्या भेटीसाठी आलो ! आता ही उग्र तपश्चर्या थांबव !

**विश्वा॰ :** नाही ! ब्रह्मर्षिपदाची प्राप्ती होईपर्यंत मी असाच देहदंड घेत राहणार ! असं कोणतं उणेपण माझ्याठिकाणी आहे की ज्यामुळं मला ब्रह्मर्षीपद मिळू नये ? हे कळत नाही तोवर मी ही तपश्चर्या थांबवणार नाही. ब्रह्मर्षी वसिष्ठ स्वर्गात जाऊ शकतो नि मला प्रवेश मिळत नाही, याचा अर्थ काय ? देवी शारदेच्या आशीर्वादानं चिरंजीव झाल्यानं आयुष्याचा प्रश्नच उरत नाही. पण चिरंजीव या शब्दाच्या अर्थाला जितकं आयुष्य असेल तितकं सगळं घालावं लागलं तरी चालेल, ते या एका ब्रह्मर्षिपदासाठी मी पणाला लावून बसणार आहे !

**शंकर :** आपण म्हणू तसंच झालं पाहिजे, हा हट्ट केव्हा केव्हा सोडून द्यावा लागतो. असं कधीच घडत नसतं ! थोडी तडजोड करावीच लागते. ऊठ, खरं म्हणशील तर मला स्वतःलासुद्धा ब्रह्मर्षी वसिष्ठाबद्दल थोडा रागच आहे. एका क्षत्रियाला ब्रह्मर्षी करण्याबाबत ते एवढी अनास्था का दाखवतात तेच मला कळत नाही. पण त्याला अन्य मार्ग आहेत. तू आता मला स्वर्गप्रवेशाबद्दल म्हणालास, माझ्याकडे विज्ञानबळावर तयार झालेली अनेक अस्त्रं आहेत. अंतराळातून संचार करणारी अनेक यानं आहेत. अनेक प्रकारची शस्त्रं आहेत. तू क्षत्रिय आहेस, दीर्घकष्टी आहेस. या विज्ञानाचा लाभ घेऊन अन्य मार्गांनी ब्रह्मर्षीपद मिळव. माझे तुला आशीर्वाद आहेत. शास्त्र मोठं की शस्त्र मोठं याचा पडताळा मलाही एकदा व्यायचाच आहे.

( शंकर बोलत असतानाच नंदिनी मागून प्रवेश करते. )

**नंदिनी :** हो; एरवी शस्त्रं खपतील कशी ?

साठा जास्त झाला आहे । उत्पादन तर चालू आहे ।
दोन वृत्तींना झुंजू द्यावं ।
काम आपलं करून घ्यावं ।

झुंज नाही तर युद्ध नाही. युद्ध नाही तर संहार नाही.
रुद्राला मग कामच नाही ।
याचं त्याचं युद्ध झालं ! माझं शस्त्र कामी आलं.
देवाजीचं काम झालं ।

**शंकर :** ए नंदिनी, इथं तुझं काय काम आहे ग ? लाडकी असलीस सगळ्यांची तरी नाही ते लाड नाही चालायचे ! मोठी माणसं बोलतो आहोत ना ? चल जा इथून !

**नंदिनी :** आता जाते. आड जाते. पुन्हा इथं परत येते. ( जाते. )

**शंकर :** अल्लड पोर ! तिची वेडी बडबड विसरून जा ! माग, हे क्षत्रिय-श्रेष्ठ विश्वामित्रा, ब्रह्मर्षिपद सोडून ब्रह्मर्षिपदासाठी हवा असेल तो वर माग. निमिषार्धात सर्व विज्ञान तुझ्या स्वाधीन झालेलं असेल.

**विश्वा० :** तसंच असेल तर हे महादेवा, देवदानव आणि मानव या सर्वांना अवगत असलेली जितकी म्हणून अस्त्रं आणि शस्त्रं असतील तितकी मला द्या— मी हे तप थांबवतो. निदान काही काळ तरी सर्वच देवांची आसनं स्थिर होऊ देत. स्वर्गाचं द्वार शास्त्रबळावर केवळ ब्रह्मर्षींसाठीच उघडत असेल तर शस्त्रबळावर मी ते क्षत्रियांसाठी उघडीन.

**शंकर :** तथास्तु ! हे क्षत्रियश्रेष्ठ विश्वामित्रा ! शस्त्र, अस्त्र, यानासहित, सर्व विज्ञान मी तुझ्या स्वाधीन करीत आहे. ( हातातील त्रिशूलातून दुसरा त्रिशूल निर्माण करून तो विश्वामित्राला देऊन, त्याला आशीर्वाद देत शंकर पुन्हा पर्वत-शिखरात नाहीसा होतो. त्या वेळी गाणे चालू राहते— )

शस्त्र अस्त्र वा ज्ञान हवें का,
विज्ञानाचा गर्भ हवा का,
ब्रह्मर्षीपद तुला मिळावे,
हीच अपेक्षा छात्रा, शिव मी प्रसन्न तुजवर मित्रा ॥

**विश्वा० :** ( शंकराने दिलेला त्रिशूल हाती घेऊन उठत ) आज मी धन्य झालो. अखेर विश्वात कुणाच्याही हाती नसलेलं हे सामर्थ्य, हे विज्ञान आज माझ्या हाती आलं. प्रभो, मी धन्य झालो. आता मी स्वर्गापर्यंत सहज पोचेन, निदान वसिष्ठानं ब्रह्मबळावर उत्पन्न केलेला त्याच्या आश्रमातला स्वर्ग तरी

उद्ध्वस्त करीन ! ( नंदिनी प्रवेशते. )

**नंदिनी :** दान दिलं त्यानं विज्ञान दिलं—ज्ञान मुळीच नाही दिलं. अज्ञानाचं विज्ञानाशी असं नातं जुळून जातं ? प्रेमापेक्षा विध्वंसाला मोठं नाव मिळून जातं ! असं कधी होऊ नये, विज्ञानानं विध्वंसाला स्थान कधी देऊ नये, अज्ञानाची विज्ञानाशी भेट कधी होऊ नये ! प्रेम द्या— प्रेम घ्या, आनंदी आनंद द्या. शस्त्रामुळं विध्वंसाचा विचार जेव्हा मनी येतो— अभिमानाच्या मनालाही तिथं छेद दिला जातो. असा छेद नका देऊ ! आहो तसे सुखी राहू ! तुम्हाला ते पटणार नाही— चांगलं तुम्ही ऐकणार नाही. शत्रुत्वाचं नातं जोवर मनामधून जात नाही— ब्रह्मर्षिपद तोवर हातामध्ये येत नाही.

**विश्वा० :** पृथ्वीवरचा स्वर्ग नाही विध्वंस करता आला— मी आकाशातून स्वर्गाचा मार्ग शोधीन. मला सर्व विज्ञान प्राप्त झालेलं आहे. मी पृथ्वीवर पराभूत झालो तर अवकाशात झेप घेईन. निमिषार्धात माझाही विज्ञानशाला-आश्रम स्थापन करीन, वसिष्ठाप्रमाणं माझाही शिष्यपरिवार तयार करीन.

**नंदिनी :** कशासाठी ? स्वर्गद्वार उघडण्यासाठी ? शस्त्राशिवाय जे द्वार पृथ्वीवर उघडतं, त्याच्यासाठी आकाशाला का मन फोडतं ?

वेलीपासून पशूपावेतो प्रेम करायला शिकता ।
तेव्हाच मुळी एक स्वर्ग इथे जन्मा घालता ॥
माणूस असून माणसापासून माणूस जेव्हा दूर जातो ।
तिथे तिथे माणसापासून एक पशू जन्म घेतो ॥
असं कधी करू नका, शस्त्र हाती घेऊ नका ।
घेतलंच जर हाती, तर विध्वंस तरी करू नका ॥

**विश्वा. :** तू कोण मला सांगणारी ? मी वसिष्ठांचा आश्रम उद्ध्वस्त करणार. इतकंच नव्हे, तर मी, विश्वविजेता, शास्त्रबळापेक्षा शस्त्रबळ श्रेष्ठ ठरवणार. ब्रह्मर्षी होण्यासाठी !

**नंदिनी :** व्यर्थ संहार करू नका. पाप माथी घेऊ नका. सशस्त्राचा खेळ होईल, निःशस्त्राचा प्राण जाईल.

**विश्वा. :** मला तुझा उपदेश नको !

**नंदिनी :** उपदेश करतंय् कोण कुणाला ? हा पत्नीचा संदेश तुम्हाला !

**विश्वा. :** माधवीचा ?

**नंदिनी :** संहाराचं पाप जेव्हा दुष्काळाचं रूप घेतं, राणीचंही राणीपण, त्या काळानं पोळून जातं ! माणुसकीचा भलेपणा जिथं जळून कोळ होतो, संहाराच्या त्या पापाचा पृथ्वीलाही भार होतो. मुलं-बाळं घेऊन आई वणव्या-मध्ये सापडली— पतीला तर संहाराची, नवी संधीच मिळून गेली.

**विश्वामित्र :** माधवी दुष्काळात सापडली ?

**नंदिनी :** संदेश देणं माझं काम, माझं काम केलं मी ! तुमचं काम तुम्ही करा— तारा किंवा मारा— तुम्ही तुमचा हेतू पूर्ण करा. ब्रह्मर्षीच्या पदासाठी हत्या करून भागत नाही, अमृताच्या फळासाठी विष पेरून चालत नाही.

प्रेम करा लोभ करा । स्नेहासाठी हात धरा ।
ब्रह्मर्षींच्या पदासाठी वसिष्ठांचे पाय स्मरा ॥

**विश्वामित्र :** वसिष्ठांचे पाय स्मरा ? स्वतःच्या अंगी असलेल्या दैवी सामर्थ्यामुळं उन्मत्त झालेल्या मूढ पोरी— कान फोडून ऐक ! शिवप्रभूच्या आशीर्वादानं माझ्या अंगी आलेल्या सामर्थ्याच्या बळावर त्या दुर्मती वसिष्ठांसह त्याचा आश्रमच काय, पण देवांच्यासकट सगळा स्वर्ग मी उद्ध्वस्त करीन. त्या क्षुद्र वसिष्ठांचे पाय धरण्याचा तू मला उपदेश करतेस ? ऐकून ठेव. यापुढं ज्या ज्या ठिकाणी राजपुरोहित, राजर्षी वा महर्षी म्हणून वशिष्ठ उभा राहील, त्या त्या ठिकाणी हा विश्वामित्र त्याच्या विरोधात असेल. आता या क्षणी माझ्या डोळ्यांसमोरून दूर जा, नाही तर माझ्या मनातला क्रोधाचा अंगार जर डोळ्यांतून बाहेर आला, तर तुझा इथंच करपून कोळसा होईल !

**नंदिनी :** ( हसते. ) असं पण होईल कसं ? डोळ्यापुढनं निघून गेले —
मनामधून कुठं जाणार ? आणि मनामध्ये त्या जळून गेले ? मनाचं त्या काय होणार ? तुमचा तुम्ही विचार करा— विचार करा विचार करा, विचार करून प्रहार करा— येत जाईन, जात जाईन, पुन्हा भेट घेत जाईन ॥
जप करा, तप करा, जप करा, तप करा —

( जाते. )

**विश्वामित्र :** विचार ! आता विचार एकच ! पराभवाचा सूड ! माझ्या दिग्विजयाच्या सांगतेच्या वेळी — या क्षत्रियाचा झालेला अपमान अजून त्याच्या मनामधून गेलेला नाही ! ( त्रिशूल उचलून हाती घेतो — हसतो. ) आग्नेय-अस्त्र टाकून तुझा सगळा आश्रम भाजून टाकीन. पर्जन्य-अस्त्राचा वापर करून सगळं

चराचरजळांत बुडवीन. वायव्यास्त्र फेकून आश्रमातल्या पशुपक्षी, वृक्ष वनस्पतींसह सगळे मानव अवकाशात दहा दिशांना भिरकावून देईन. हे ज्ञानबळावर स्वर्ग निर्माण करणाऱ्या वसिष्ठा, विज्ञानबळावर, सर्व विश्वाचा स्वर्ग बनवण्यास सिद्ध झालेल्या या क्षत्रियश्रेष्ठ विश्वामित्राचं हे आव्हान स्वीकार ! ( हसतो, मोठ्याने हसतो. )

( त्रिशूळातून अस्त्र फेकतो; वसिष्ठाच्या आश्रमाच्या दिशेने— अंधार होतो— उजेड होतो— आतून किंकाळ्या, आगी लागलेल्या. पाणी, वाऱ्याचा आवाज ऐकू येत असताना विश्वामित्र प्रवेश केलेल्या ज्ञानाला विचारतो— )

काय म्हणतो तुझ्या गुरूचा आश्रम ? आहे कोणी आत जिवंत ?

**ज्ञान :** मी अजून आहे ! पण मला आश्रमात जाण्याची अनुमती नाही ! अविद्येच्या बळावर मृत्यू पार करून जाण्यापेक्षा, विद्येच्या बळावर पृथ्वीवर अमृत शोधणं अधिक महत्त्वाचं, हे जोवर मला पटत नाही, तोवर मला गुरुजींची आत यायला अनुज्ञा नाही.

**विश्वामित्र :** कोण तुझा तो क्षुद्र गुरुजी ? तू माझ्याबरोबर रहा. मी तुला सर्व अस्त्र, शस्त्र, यानं यांची माहिती देतो. तू ज्ञानी आहेस. माझ्याबरोबर रहा.

**ज्ञान :** मी ज्ञानी आहे ? आजपासून तुम्हीच मला ब्रह्मर्षी— !

( पाय धरतो. )

**विश्वामित्र :** ऊठ ! अवकाशात झेप घेणाऱ्या सर्व यानांची माहिती करून घे.

**ज्ञान :** आज्ञा !

**विश्वामित्र :** आधी तुझ्या त्या गुरूच्या आश्रमात घडलेल्या हाहाःकाराची मला माहिती सांग !

**ज्ञान :** मी विज्ञानाला विचारतो. त्याला आत जायला अनुमती आहे.

**विश्वामित्र :** असं ? म्हणजे माझा शरीरसंरक्षक त्याचा शिष्य झाला काय ?

**ज्ञान :** त्याला विचारून सांगतो.

**विश्वामित्र :** काय ?

**ज्ञान** : आश्रमात काय झालं ते !

[ विज्ञान आतून बाहेर येतो. ]

काय झालं रे ? आश्रमात काय काय झालं ?

**विज्ञान** : कुठं काय झालंय ?

**ज्ञान** : काही झालं नाही ! अरे तुझ्या स्वामींनी अग्नेय-अस्त्र, पर्जन्यास्त्र, वायव्यास्त्र टाकली. आश्रमाला काही झालं नाही !

**विज्ञान** : काय व्हायचंय ? तो स्वर्ग आहे. निर्जीव होतं ते ते थोडं काही जळून गेलं. काही थोडं वाहून गेलं. उरलेलं ते उडून गेलं. जीवन सगळं जिवंत आहे.

**ज्ञान** : आत कुणी मेलं नाही ?

**विज्ञान** : मरेल कसं कुणी बाबा ? तिथं तर स्वर्ग आहे ! मूढा !

**ज्ञान** : एवढंच संस्कृत शिकलास काय ?

**विश्वामित्र** : असं असेल तर त्याला माझा संदेश दे ! माझी सगळी अस्त्रं शस्त्रं पराभूत झाली असतील, सर्व ब्रह्मांडाचा विध्वंस करणारं हे ब्रह्मास्त्र सोडण्यासाठी हा क्षत्रिय आता सिद्ध झाला आहे. आव्हान देऊनच युद्धाला सामोरं जाणं हा धर्म क्षत्रियाचा म्हणूनच मी ही वार्ता तुझ्या कानापर्यंत पोचवीत आहे. एरवी यापूर्वीच...

**वसिष्ठ** : ( विरुद्ध दिशेने वसिष्ठ प्रवेशतात. हाती ब्रह्मदंड. ज्ञान–विज्ञान घाबरून आत पळतात. ) ( प्रवेशून ) मी ही वार्ता तुमच्या, नव्हे, हे ज्ञानी वसिष्ठा, तुझ्या कानी घातली असती, असंच आपल्याला म्हणायचं ना ?

**विश्वामित्र** : आपल्याला नव्हे तुला—

**वसिष्ठ** : एकेरी उच्चारानं अवमान करणं हे आमच्या शब्दांत बसत नाही. तरी पण म्हणायचंच असेल तर, मी असं म्हणू शकतो की हे मुला, तू अजून अज्ञ आहेस ! विध्वंस करण्यासाठी ज्या क्षणी तू ब्रह्मांडाचा वापर करशील, त्या क्षणी ब्रह्माला दंड देण्याचा अधिकार असलेला हा दर्भांचा कूर्च ब्रह्मदंड म्हणून जर मी अभिमंत्रित केला तर होणाऱ्या अवस्थेला मला हिशेबी धरू नकोस.

**विश्वामित्र** : हंऽऽ ! या अशा खोट्या दहशतीनं मी भय घेईन—

**वसिष्ठ** : थांब जरा ! खोटा हा शब्द वापरू नकोस— तो शब्द आमच्या

धर्मात बसत नाही ! ब्रह्माला केवळ सत्य ठावं असतं !

**विश्वामित्र** : हे तुझं ब्रह्म ठेव बाजूला ! आणि या मला भगवान शिवशंकरांकडून मिळालेल्या ब्रह्म-अस्त्राला सामोरा हो !

" ॐ नमः शिवाय !
ॐ भुर्भुवः स्वः तस्य वितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि।
ॐ धियोयोनः प्रचोदयात् ।'
" ॐ ॐ ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं ।
उर्वारुकमिव बंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात् । "

[ हाती त्रिशूल घेतलेला विश्वामित्र व ब्रह्मदंड हाती घेतलेला वसिष्ठ, दोघे समोरासमोर उभे ठाकतात. अस्त्रयुद्ध सुरू होतं. आकाशात प्रचंड गडगडाट होतो. प्रकाशझोतांचं युद्ध वाटावं अशी प्रकाशयोजना, युद्धसंगीत चालू असताना ब्रह्मदेव प्रकटतात. ]

**ब्रह्मदेव** : ब्रह्मदंड मागं घ्या वसिष्ठमुने– ब्रह्मदंड मागं घ्या. संहारापासून विश्व वाचावं म्हणून आपणच एका काळी विश्वामित्राला युद्धापासून परावृत्त केलंत– आज जर ब्रह्मास्त्राचा आणि ब्रह्मदंडाचा संघर्ष झाला तर विश्वासकट स्वर्गही जळून राख होऊन जाईल ! हा विध्वंस आपण करू इच्छिता काय? सर्व देवांच्या वतीनं– मी आपणाला विनंती करण्यासाठी आलो आहे.

**वसिष्ठ** : पण तात ! हे ज्ञानविज्ञान भोळ्या शंकरानं त्याला का दिलं ?

**ब्रह्मदेव** : त्यानं सद्हेतुनं दिलं. याला तो हेतू समजला नव्हता; असं आपण समजू या. तरी पण याला अभय द्या. त्याच्या वतीनं आम्हाला अभय द्या ! ब्रह्मदंड आवरा ! अथवा ब्रह्मांडाचा विस्फोट होईल !

**वसिष्ठ** : आपली आज्ञा मी ऐकली, ब्रह्मदेवा ! पण या वेड्या शस्त्रधाऱ्याला कोण अडवणार ?

**ब्रह्मदेव** : मी सांगतो. ऐक ! हे विश्वामित्रा, ब्रह्मदंडापुढं ब्रह्मास्त्रासहित तुझी सर्व अस्त्रं पराभूत आहेत. मी ब्रह्मदेव हे मान्य करतो ! तुझ्या कुठल्याही शस्त्राचा प्रभाव इथं पडणार नाही. तू पराभूत आहेस. शस्त्र मागं घे ! शस्त्र मागं घे !

( पराभूत विश्वामित्र खचल्यासारखा होतो. हातातील त्रिशूल खाली टाकतो, वळतो. इतक्यात नंदिनी येते. एक वाक्य बोलून, वसिष्ठाला पाहून निघून जाते. )

**नंदिनी :** तरी पूर्वी सांगत होते भलतं साहस क ... संबंध
वनराजाच्या आयाळीला जावळ सम

( वसिष्ठ विश्वामित्राजवळ जाऊन खांद्यावर
सुरात. )

**वसिष्ठ :** पराभवाचा खेद करू नका राजन्, मनातला
अजून माझी विनंती ऐका. शस्त्रं टाकून द्या. आपण दोघं एका विचाराचे
तर धरतीवर शांतता नांदेल. शस्त्रंच संपली की शत्रू ओघानंच संपतो. सगळे मानव एक होतील.

**विश्वामित्र :** तुम्हाला उपदेश करण्याचा हा अधिकार मी मिळवीन, तेव्हाच पुन्हा भेटेन. तुमचे माझे मार्ग भिन्न आहेत.

**वसिष्ठ :** शुभास्ते पंथानः सन्तु !

[ विश्वामित्र जातो. त्याच्या पाठोपाठ जलकुंभ तिथंच ठेवून त्रिशूल उचलून ज्ञान जातो. ]

ज्ञान आमच्यावर रुसून गेला. शस्त्र हाती घेऊन गेला ! विज्ञाना, आता विकासाचं काम आम्ही तुम्हाला शिकवतो. संहार त्यांना करू दे. आपण सिंचनाचं काम करू या. ( विज्ञान त्याच्या मागं जातो. )

[ अंधार ]

## प्रवेश ४ था

[ त्याच जागी सुरू होतो. विश्वामित्राच्या विज्ञानशालेभोवतीची जागा. ज्ञान त्रिशंकूला पुढं ढकलून त्याच्या पाठोपाठ, त्याच्यावर ओरडत प्रवेशतो. त्रिशंकू धडपडत येऊन मध्यावर पडलेला आहे. ]

**ज्ञान :** बोल ! अंगाला अशी दुर्गंधी येणारा, माणूस असून पशूसारखी शिंगं वाळगणारा, सगळ्या जगाचं तोंड चुकवून, वनावनांतून चोरासारखा फिरणारा तू आहेस कोण ? आणि या आमच्या विज्ञानशाळेभोवती का फिरत होतास ?

**विश्वामित्र :** कोण आहेस तू ?

**त्रिशंकू :** क्षमा करा महाराज ! शापित आहे म्हणून हे रूप आहे. हे

दाखवण्यासारखं नाही, म्हणून चोरासारखा फिरतो. आपल्या विज्ञानशाले-भोवती आलो तो आपल्यालाच भेटण्यासाठी. आपली क्षमा मागण्यासाठी !

**विश्वामित्र** : माझी क्षमा ?

**त्रिशंकू** : होय.

**विश्वामित्र** : कशासाठी ?

( विश्वामित्र ज्ञानाला खूण करतो, ज्ञान आत जातो. )

**त्रिशंकू** : मागं इथं दुष्काळ पडला असताना, मातोश्रींना गोमांस खावं लागलं होतं.

**विश्वामित्र** : गोमांस ?

**त्रिशंकू** : हो, ती चूक माझी आहे, त्याची क्षमा मागण्यासाठी... !

**विश्वामित्र** : दुष्काळ ? गोमांस ? म्हणजे तू आहेस तरी कोण ?

**त्रिशंकू** : मी, मी त्रिशंकू !

**विश्वामित्र** : त्रिशंकू ? म्हणजे आमचा उपकारकर्ता, अरे ऊठ, ऊठ. माधवीनं तुझी कथा मला सांगितली आहे. ऊठ.

**त्रिशंकू** : नको, नको. माझ्या सर्वांगाला येणारी दुर्गंधी आपल्याला सहन होणार नाही.

**विश्वामित्र** : अरे वेड्या, सद्‌भावाला दुर्गंध कधीच येत नसतो. ऊठ, बैस इथं.

( त्रिशंकूला उठवतो आणि वर बसवतो. )

**विश्वामित्र** : ( त्याला संपूर्ण न्याहाळत काळजीनं ) काय रे तुझी ही अवस्था ?

**त्रिशंकू** : मातोश्रींच्या उपदेशाप्रमाणं कल्याणी भगवतीदेवीच्या नवाक्षर मंत्राचा जप केल्यामुळं माझं पिशाचरूप गेलं होतं. माझा कायाकल्प झाला होता. पुन्हा आपली चूक समजल्यामुळं म्हणा, किंवा देवदयेनं म्हणा, माझ्या वडिलांनी मला पुन्हा परत बोलावून घेतलं आणि मला राज्यावर बसवून ते वानप्रस्थाला गेले होते !

**रेणुका** : मग पुन्हा ही तुझी अशी अवस्था का झाली ?

**त्रिशंकू** : पुन्हा एकदा ब्रह्मर्षी वसिष्ठांची कृपा— ! त्यांच्या कृपादृष्टी-मुळंच....

**विश्वामित्र** : थांब जरा ! थांब, थांब, थांब. यात इथं वसिष्ठाचा संबंध कुठं येतो ?

**त्रिशंकू** : ते आमचे राजपुरोहित ! पुन्हा मिळालेलं राजवैभव, काया-कल्पामुळं नव्यानं आलेलं तारुण्य. यामुळंच की काय माझ्या मनामध्ये सदेह स्वर्गलोकी जाऊन गंधर्वांचं गायन ऐकावं, अप्सरांचं नर्तन पाहावं, नंदनवनातून विहार करावा, अशी इच्छा उत्पन्न झाली.

**विश्वामित्र** : सदेह स्वर्गलोकी जाऊन ?

**त्रिशंकू** : होय. आणि यज्ञ केला असता ते साध्य आहे हे मला ठाऊक होतं.

**विश्वामित्र** : बरं, पुढं ?

**त्रिशंकू** : त्यासाठी यज्ञ कराल का ? असं मी त्यांच्या वसिष्ठशालेत जाऊन राजपुरोहितांना विचारलं !

**विश्वामित्र** : मग ?

**त्रिशंकू** : अशक्य ! इतकंच नव्हे तर, मूढ कल्पना सोडून द्या असं त्यांनी मला सांगितलं !

**विश्वामित्र** : मूढ कल्पना ?

**त्रिशंकू** : होय !

**विश्वामित्र** : पण यज्ञ केल्यानं ते साध्य होतं ना ?

**त्रिशंकू** : तेही मी त्यांना विचारलं ! आपल्याला शक्य होत नसेल तर दुसरा पुरोहित मी पाहतो.

**विश्वामित्र** : मग ? सांग ना काय झालं ?

**त्रिशंकू** : इतकं मी बोललो मात्र, ते– त्यांचे शंभर पुत्र माझ्यावर क्रुद्ध झाले. तू चांडाळ होण्याच्याच योग्यतेचा आहेस– तू चांडाळ हो ! तुझ्या सर्वांगाला दुर्गंधी येईल, मेल्यानंतरही तुला स्वर्ग प्राप्त होणार नाही, तुझ्या डोक्यावर तीन शिंगं पुन्हा उगवतील– सत्यव्रत हे नाव संपून तू त्रिशंकू होशील !– आणि त्या शापवाणीबरोबर माझी ही अवस्था झाली !

**विश्वामित्र** : अरे, अरे ! ( पाठीवरून हात फिरवतो. )

**त्रिशंकू** : माझ्याबरोबर आश्रमात आलेल्या; बरोबरच्या सर्व मंत्रीगण आणि सेवकांनी माझं ते स्वरूप बघून, मला न विचारता, माझ्याकडे न बघता

ते सर्व राज्याकडं निघून गेले. मी एकटा राहिलो एकटा! माझ्या मुलानं, राजा हरिश्चंद्रानं मला पुन्हा सन्मानानं परत बोलावलं. पण आता काय उपयोग होता? राज्य त्याच्या स्वाधीन करून मी अजूनही असाच किळसवाणी अवस्था नि केविलवाणं तोंड घेऊन फिरतोच आहे; फिरतोच आहे...(जायला निघतो.)

**विश्वामित्र :** थांब, मुला! तुझ्या दुःखामुळं मी पाषाणहृदयी– मीसुद्धा व्यथित झालो आहे. वसिष्ठांमुळंच तुझ्यावर अन्याय झाला आहे.

**त्रिशंकू :** नाही, माझ्याही काही चुका असतील...(त्याला थांबवतो.)

**विश्वामित्र :** तुला सदेह स्वर्गप्रवेश नाही, असंच त्यांचं म्हणणं आहे ना!

**त्रिशंकू :** हो!

**विश्वामित्र :** चिंता करू नकोस! मी तुझ्या पाठीशी आहे. काही झालं तरी आमचा उपकारकर्ताच आहेस. शिवाय ब्रह्मर्षिपदाचा हा टेंभा मलाही केव्हा तरी विझवायचाच आहे! चिंता करू नकोस. मी तुला सदेह स्वर्ग प्राप्त करून देतो. भगवान् शंकरांकडून मला मिळालेल्या वरदानांपैकी विज्ञानाचं सामर्थ्य अजून माझ्याजवळ अवशिष्ट आहे. त्या बळावर मी तुझं ईप्सित पूर्ण करीन!

**विश्वामित्र :** ज्ञाना– (हाक मारतो. ज्ञान प्रवेश करतो.) स्वर्गप्रवेशापर्यंत वेगानं प्रवास करणारं कोणतं यान सध्या सिद्ध आहे?

**ज्ञान :** आपण द्याल ते त्याचं नाव असेल.

**विश्वामित्र :** त्रिशंकू!

**ज्ञान :** त्रिशंकू?

**विश्वामित्र :** जा त्रिशंकू याच्या मागोमाग (नमस्कार करून त्रिशंकू ज्ञानाबरोबर जातो.)

[विश्वामित्र पद्मासन घालून, डोळे मिटून ॐ भूर्भुवः स्वः आदी मंत्र म्हणू लागतो. अंधार. मागच्या बाजूच्या आकाशात एक प्रकाशाचा गोलक वर जाताना दिसतो, अचानक तो स्थिर होतो.]

आ. वा. : थांब, विश्वामित्रा, मी सूर्यलोकीचा राजा इंद्र तुला आज्ञा करीत आहे. एक ब्रह्मर्षी आणि काही अपवाद सोडून कोणत्याही जीवित देहाला स्वर्गात प्रवेश नाही. याला परत पृथ्वीवर घेऊन जा! हा स्वर्गात येऊ शकत नाही.)

**नंदिनी :** (नाचत नाचत म्हणत येते–) इकडं नाही, तिकडं नाही. त्यानं

जावं कुठं ग बाई ? हाच त्याला प्रश्न पडला. पुन्हा पराभव का हो झाला ?

**विश्वामित्र** : कुणाचा पराभव ? चिंता करू नकोस. सन्मित्रा, इंद्रानं तुला स्वर्गात प्रवेश दिला नाही. या ब्रह्मर्षींचा पराभव करण्यासाठी मी आकाशात प्रतिसृष्टी निर्माण करीन. हे त्रिशंकू, अमर हो ! माझं तपश्चर्येचं सर्व सामर्थ्य तुझ्या पाठीशी घालून, मी तारांगण तयार करून तिथंच तुला स्थिर ठेवतो. ब्रह्मर्षिपदासाठी पुन्हा तपश्चर्या करावी लागली तरी ती मी करीन ! पण तुझ्या-साठी निमिषार्धात हा पाहा— हा विश्वामित्र— सर्व विश्वाला साक्षी ठेवून, एक नवीन सृष्टी, नवीन चंद्र, नवीन सूर्य निर्माण करतो आहे ! स्थिर रहा, स्थिर रहा !

( आकाशात चंद्र, तारे, चांदण्या, चमचमताना दिसतात. प्रतिसृष्टीची निर्मिती होते. )

**नंदिनी** : त्रिशंकू हा तारा झाला. विश्वाला हा बोध केला ।
प्रतिसृष्टीचा नवाच विक्रम, विश्वामित्रांनी केला ।।
चंद्र मिळाला, चंद्र मिळाला— सूर्याची त्या काय कथा ?
त्या सूर्याला कुठून ऊर्जा मिळेल त्याची काय व्यथा ?

**विश्वामित्र** : तुझ्याच भाषेत तुला सांगतो, हे कामधेनूच्या मुली, चंद्राचं मी चक्र केलं सागर लोटरसरसं !

**नंदिनी** : म्हणजे ?

**विश्वामित्र** : चंद्राच्या चाकाचा समुद्राचा लाटांशी संघर्ष करून मी माझ्या प्रतिसृष्टीत माझ्या सूर्याला उष्णता दिली.

**नंदिनी** : कशावरून ?

**विश्वामित्र** : कुठल्याही समुद्राच्या वाळूत जाऊन पहा. तिथं तुम्हाला चंद्र सागर-संघर्षाची साक्ष म्हणून पडलेला चांदीचा वा चंद्राचाच चुरा बघायला मिळेल.

( धन्य धन्य असं म्हणत वसिष्ठ प्रवेश करतात.)

**वसिष्ठ** : धन्य धन्य विश्वामित्र !

**विश्वामित्र** : का हो ब्रह्मर्षी वसिष्ठ ?

**वसिष्ठ** : बोला !

**विश्वामित्र** : ब्रह्मदेवानं सृष्टी निर्माण केली, म्हणून तो ब्रह्मदेव झाला. मी

प्रतिसृष्टी निर्माण केली. तरीही मी ब्रह्मर्षी नाही? (नंदिनी जाते.)

**वसिष्ठ :** नाही, ब्रह्मर्षी नाही. त्रिवार नाही. काही तरी उणीव आहे.

**विश्वामित्र :** कोणती?

**वसिष्ठ :** तुमची तुम्हालाच कळेल. त्या वेळी तुम्ही त्या पदाला पोचलेले असाल. या! इकडे आश्रमात या. आपल्या हातांनी तो मित्र-वृक्ष लावलाय त्याला पाणी द्या.

**विश्वामित्र :** मित्रवृक्ष वाटेल तेव्हा न सांगताच घालू?

**वसिष्ठ :** पुन्हा आपलं दर्शन?

**विश्वामित्र :** आपल्या योग्यतेला पोचेन तेव्हाच!

**वसिष्ठ :** पुन्हा भेट होईल तेव्हा मात्र – हेच वाक्य पुन्हा उच्चारू नका!

(विश्वामित्र संतापानं निघून जातो.)

**वसिष्ठ :** वेडा मुलगा! या विश्वामित्राला विश्वमित्र केला पाहिजे. मधला काना खोडला पाहिजे. अहंकार आडवा केल्याशिवाय ब्रह्मर्षिपद मिळत नसतं. यानं ब्रह्मर्षी झालंच पाहिजे. हे विज्ञान माणसांत आल्याशिवाय पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होणार नाही. ये अरुंधती, विश्वामित्रानं निर्माण केलेलं चांदणं बघायला आलीस? ये.

(तिच्या दृष्टीनं तो खाली उतरत असताना पडदा पडतो.)

## अंक दुसरा समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २०७९२ नों. दि. १८।११८५
ग्रं. नाटक क्र.

# अंक तिसरा

## प्रवेश १ ला

[ वसिष्ठांचा आश्रय आणि विश्वामित्राची विज्ञानशाला यांच्या मध्येच असलेले, नेमका नामनिर्देश न करता येणारे एक ठिकाण. ज्ञान – विज्ञान मंत्रपठण करीत करीत फेऱ्या घालीत आहेत. एकमेकांच्या अंगावर मोठ्यानं ओरडत पठण चालू आहे. ]

**विज्ञान :** ॐ त्र्यंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिवबंधनात् मृत्योर्मुक्षीय मामृतात् ।

**ज्ञान :** ( धनुष्यबाणांनी सज्ज ) ॐ भूर्भुवः स्वः तत्स वितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियोयोनः प्रचोदयात ॥...

**विज्ञान :** अहाऽऽहा ! काय आनंद आणि शांतता आहे या कालव्यथात् ! सुगंधिं पुष्टिवर्धनम् ! काल आयुष्याचा असा शांततेत घालवावा ! व्यर्थ त्या शास्त्रांच्या आणि अस्त्रांच्या खणाखणी ! पण आमच्या पूर्वीच्या स्वामींना पटेल तेव्हा खरं !

**ज्ञान :** त्याचं काय आहे, दोन मित्र होते. एकाचं नाव होतं ज्ञान; दुसऱ्याचं होतं विज्ञान. ते गेले एकदा एका रस्त्यानं. ज्ञानाच्या हाती होते दाणे– विज्ञानाच्या हातात होते खडे ! समोरून आली एक भुकेली खारोटी, ज्ञानानं टाकले तिच्यापुढं चार दाणे, तिनं लपालपा ओठ करून ते आनंदानं खाल्ले विज्ञानानं तिच्यावर मारलेन् धरून नेम चार खडे ! तिथून ती बिचारी प्राण-भयाने भिऊन पळाली !– त्या दोघांच्या दोन वृत्ती झाल्या– त्याला काही इलाज नाही !

**विज्ञान :** फार विद्वानासारखा बोललास !

**ज्ञान :** हे पटतंय कुठं गुरुजींना ?

**विज्ञान :** बरोबर आहे. तुझ्याबद्दल काय बोलतात, ठाऊक आहे तुला ?

**ज्ञान :** काय म्हणतात ?

**विज्ञान :** ते म्हणतात, याला गती आहे पण मती नाही !

**ज्ञान :** कुणाला मती नाही ? तुझ्या पूर्वीच्या स्वामींना विचार ! सगळ्या तंत्रज्ञानात प्रवीण झालोय मी ! त्रिशंकूला यानात बसवून आकाशात पाठवला कुणी ? मीच ! आता जग म्हणणार विश्वामित्रांनी त्रिशंकूला प्रतिसृष्टी निर्माण करून दिली. म्हणजे सगळं केलं मी आणि नाव विश्वामित्राचं, असं आहे. असू दे; आपलं ठरलेलं आहे ना ? आपण महानांनी स्वतःकडे लहानपणा घेऊन या लहानांना महान करायचं – तुझ्याबद्दल ते काय म्हणतात, ठाऊक आहे ?

**विज्ञान :** काय म्हणतात ?

**ज्ञान :** ते म्हणतात त्याला मती आहे, पण गती नाही ! म्हणजे बघ ! आणि तू म्हणत बस स्वामी स्वामी !

**विज्ञान :** जाऊ दे रे !

**ज्ञान :** तसं नाही ! – आपल्याला जसं त्यांच्याबद्दल वाटतं ना– तसं त्यांना आपल्याबद्दल नसतं वाटत !

**विज्ञान :** जाऊदे रे. पण तू आलास कसा स्वामीजींची पर्णकुटी सोडून ? ते तपश्चर्येला बसले आहेत ना ?

**ज्ञान :** हॉः !

**विज्ञान :** म्हणजे ?

**ज्ञान :** अरे कसली तपश्चर्या घेऊन बसलास ? घरच्या बायकांना फसवण्यासाठी हे सगळे सार्वजनिक उपास ! ते तिथं उपास सोडून बसलेत ! पर्णकुटीत !!

**विज्ञान :** म्हणजे ? ब्रह्मर्षिपदासाठी तपश्चर्या नाही करत ?

**ज्ञान :** कशाला ते ब्रह्मर्षिपद ? – स्वर्गाच्या प्राप्तीसाठीच ना ?

**विज्ञान :** हो !

**ज्ञान :** स्वर्गच इथं येतो म्हटल्यावर तपश्चर्या कशाला अन् ते ब्रह्मर्षिपद कशाला ?

**विज्ञान :** स्वर्गच इथं येतो म्हणजे ?

**ज्ञान :** स्वर्गातली !

**विज्ञान :** कोण ?

**ज्ञान :** अप्सरा !

**विज्ञान :** ए, सरळ सांग बाबा !

**ज्ञान** : आता सरळ काय सांगू ? सगळंच वेडंवाकडं झालेलं आहे. तपश्चर्या करताहेत म्हणे !

**विज्ञान** : कसलं ? अरे यांचं तिकडं वेगळंच प्रकरण चाललंय !

**विज्ञान** : कसलं ?

**ज्ञान** : कसलं काय ? वेगळंच आहे. अरे, इंद्राची ती स्वर्गातली अप्सरा, ती मेनका ! ती स्वर्गातनं आली.

**विज्ञान** : कशाला ?

**ज्ञान** : इंद्राचं आसन स्थिर करण्यासाठी ! यांचा तपोभंग करण्यासाठी ! अशा बायका पाठवायची पद्धत आहे ! ती आली खाली ! तिच्या पायातले पैंजण छुन्नुक छुन्नुक वाजले. या बुवांनी डोळे उघडले. अरे उघडले ते उघडले ते– उघडलेच. पुन्हा मिटलेच नाहीत ! आता तपश्चर्येच्या वेळेला डोळे उघडायचे ते कशाला ?– पण त्यांना बोलायचं कुणी ? पण ब्रह्मर्षिपद मिळवायचं म्हणजे कसं मन दृढ पाहिजे !–

**विज्ञान** : माझ्यासारखं.

**ज्ञान** : ते ढेपाळले, तुझ्यासारखे. अरे, फार पुढं गेलंय प्रकरण ! अरे,– मुलगीसुद्धा झालीय एक ! हं, आता तसं काही झालेलं नाही असं आम्हाला दाखविण्यासाठी पूजा वगैरे करतात– पण ते म्हणजे फुलं वगैरे वेळेवर आणली नाही तर आमच्यावर खेकसण्यासाठी. होऽऽ या पूजेला वेळ झाला तर त्या पूजेला उशीर होतो ना ?

**विज्ञान** : त्या पूजेला म्हणजे ?

**ज्ञान** : वाबळट आहेस ! अरे त्या पूजेला म्हणजे मेनकेच्या !

**विज्ञान** : ( केस मागं करून चेहरा ठाकठीक करीत ) कशी आहे रे दिसायला ?

**ज्ञान** : का ? लग्न करतोस ?

**विज्ञान** : शान्तं पापं ! सहज रे, कुतूहल म्हणून विचारतोय !

**ज्ञान** : चित्र आहे. अरे स्वर्गातल्या राजा इंद्राची ती अप्सरा-तिच्या सौंदर्याचं वर्णन काय विचारतोस ? स्वर्गीय आहे !

**विज्ञान** : स्वर्गीय आहे, चित्र आहे, चला...नाही म्हणजे स्वर्गासाठी धडपडत होते, स्वर्गच इथं आला !

**ज्ञान** : कसला स्वर्ग येतोय ? कडाक्याची भांडणं चालली आहेत !

**विज्ञान** : कुणाची ?

**ज्ञान** : दुसरं कोण ? ती आणि ते !

**विज्ञान** : का ?

**ज्ञान** : त्यांचं म्हणणं ही मुलगी माझी नव्हेच !

**विज्ञान** : पण आहे त्यांचीच ना ?

**ज्ञान** : इकडे ये ( जवळ बोलावून कानात—पण—मोठ्यानं सांगतो. ) हे मोठ्या लोकांचं असंच असतं बाबा ! करून सवरून— ऊऽहूंऽऽ !

**विज्ञान** : पण त्यांचं काय म्हणणं आहे ?

( नुसता आवाज ‘ नाही मेनके, ही कन्या माझी नाही ! ’ )

( ज्ञान—विज्ञान आत पळतात, आणि कानावर हात ठेवल्यासारखा विश्वामित्र प्रवेश करतो. )

**विश्वामित्र** : नाही मेनके, ही कन्या माझी नाही !— हा देवेंद्रानं केलेला भ्रष्टाचार आहे;— माझा तपोभंग करून— स्वतःचं आसन स्थिर राखण्यासाठी !— म्हणूनच तू— मला मोह पाडू शकलीस ! लग्नबंधनात मला जखडू शकलीस ! त्या मायावी मोहातून जन्म घेतलेली ती कन्या— माझी नाही ! इंद्राची ! तू इथून परत स्वर्गात जा ! ( मागच्या बाजूनं नंदिनी येऊन मागंच बसते ). केवळ तू अपराधी नाहीस म्हणून तू सुखरूप जाते आहेस !— एरवी शाप देऊन तुला मी भस्मसातच केली असती ! ( मुलगी रडल्याचा आवाज )— त्या मुलीची चिंता तुला नसेलच— बोलून चालून तू अप्सराच ! पण मी तिचं रक्षण करीन. तिचं सूर्यापासून संरक्षण करण्यासाठी ज्या शकुन पक्षांनी तिच्यावर छाया धरलेली आहे— त्यांच्याच ‘ शकुंतला ’ या नावानं ती या पृथ्वीवर वाढेल— थांब शकुंतले, तुझं रुदन थांबव. ( रडणं थांबतं )— तिच्या पोटी येणाऱ्या पुत्राचं नाव भरत असेल;— ज्याच्या नावानं या नवखंड पृथ्वीवर एक खंडप्राय देश निर्माण होईल; ज्याचं नाव भारत असेल ! तू इथून. स्वर्गात परत निघून जा— आणि त्या देवेन्द्राला सांग, रंभा म्हण, मेनका म्हण, पण पुन्हा या अस्त्रांचा माझ्यावर वापर करून माझा तपोभंग करण्याचा प्रयत्न करू नकोस. आता मी ढळणार नाही ! क्षमस्व परमेश्वर. आता पुन्हा तपश्चर्या !

**नंदिनी** : असं कसं झालं हो ? असं कसं झालं ? तप केलं होतं. सारं, सारं

वाया गेलं ! स्त्री जातीचा काय भरोसा, आली कोण, गेली कोण ? तपस्व्याचं तप नेलं, ती होती तरी कोण ? मनात होती एक आणि जनात मात्र दोन— त्या नात्याच्या उच्चाराचा उरला एक त्रिकोण !

लेक लाडकी एक राहिली—पृथ्वीवर खाली—
होच तपाची काय फलश्रुती, महामुने झाली !

**विश्वामित्र** : तू का माझ्या मनाभोवती अशी कारण नसताना रेंगाळते आहेस ?—जा इथून— !

**नंदिनी** : मेनकेला स्वर्ग दिला. मी कुठं जाऊ ? तुम्हीच सांगा—माझं भलं मी नको पाहू ? हूं ऽ ऽ तुम्ही बरे— माझं बरं—हेच एक वरं— घरी जाऊन सांगू का तुमच्या ? सगळं खरं खरं— ?

**विश्वामित्र** : काय जाऊन सांगणार आहेस ?

**नंदिनी** : हेच, की मेनकेचं तुमचं काही नातं गोतं होतं—

**विश्वामित्र** : काय ?

**नंदिनी** : मेनकेचं तुमचं काही नातं गोतं होतं। नातं होतं गोतं होतं.
येतं जातं होतं येतं जातं। नातंसुद्धा संपून गेलं होतं !

**विश्वामित्र** : हो खरंच; सगळीच नाती आता संपून गेली आहेत. हाच आयुष्यातला शेवटचा पराभव. नंदिनी, सखी ( हात धरतो. )

**नंदिनी** : मोहात पडू नका ! ( ती हात सोडवून घेते. )

**विश्वामित्र** : मुली— भगिनी, आई ! ( असं म्हणताना प्रथम डोक्यावर खांद्यावर हात ठेवतो अन् शेवटी पायाला स्पर्श करून ‘ आई ’ म्हणतो. )

**नंदिनी** : आता थोडे वळणावर आलात !
वाममार्गी जाता जाता मध्येच उभे झालात.
उभे व्हा उभे व्हा, सर्व काही छान होईल.
तुझ्या तपाला विश्वामित्रा पूर्ण यश येईल !
मी नंदिनी आनंदिनी ! तुझ्या यशाच्या पूर्तीसाठी
सदैव यश चिंतीत जाईन !—
मित्र व्हा, मित्र व्हा— मि—त्र मित्रा—मीत्रा, त्रा
म्हणजे टाका. मी—त्रा, मीपणा टाका.
हा मेळ मोडू नका, भरला खेळ सोडू नका—

ब्रह्मर्षीच्या पदासाठी ब्रह्मनिष्ठा सोडू नका !–
कराल तर घात होईल, हातुन निघून जाईल !

**नंदिनी :** टाळीच तर वाजली नाही जर आवाज तरी होईल कसा ? आवाज जर झाला नाही तर देव जागा होईल कसा ? म्हणून म्हणते, हात आपुले जगन्नाथ समजू नका ! तुमचं भलं, आमचं भलं, हा नियम सोडू नका. ब्रह्मर्षीच्या श्रेष्ठ पदाची आस कधीही सोडू नका ! येत जाईन, येत जाईन, जात कधीच जाणार नाही, जाण्याच्याही येण्यासाठी, जाणं म्हणून येत जाईन ! जप करा, तप करा,......

( निघून जाते. )

**विश्वा० :** ही आदिमाया– ही मला आशीर्वाद देऊन गेली ! आई– मी तुला ओळखलं. आज मला ओंकाराचं दर्शन झालं. आज मी तृप्त झालो.

[ अंधार. ]

## प्रवेश २ रा

( झोपडीबाहेर बायकोच्या मांडीवर पहुडलेला विश्वामित्र ! ती कथा सांगण्यापूर्वी– )

दीर्घ तपस्या पूर्ण जाहली
सरले कष्ट मुनींचे
थोर महर्षीपद मेळविले
ब्रह्मदेव हातीचे.
खंत मनी राही– अजूनी मी ब्रह्मर्षी नाही ऽऽऽ !

**विश्वा० :** काय सांगू तुला माधवी, इतके भयानक्त आणि इतके सुखाचे क्षण पाहिले मी या तपश्चर्येच्या काळात की ते शब्दांनी वर्णन करणंच अशक्य !

**माधवी :** तिथल्या आपल्या सर्व अनुभूती आम्हाला इथंच घरबसल्या कळत होत्या !

**विश्वा० :** कुणाकडून ?

**माधवी : :** नंदिनी– ती कामधेनूची कन्या ! जिच्या पालनाच्या अधिकारासाठी आपण ब्रह्मर्षिपदाचा ध्यास घेतलात ती !

**विश्वा०** : थांब माधवी, तुझ्या मनात काही विकल्प असेल तर तो सोडून दे! नंदिनी हा एक दैवी अनुभव होता! मेनकेविषयी घडलेली सर्व हकीगत, मी स्वतः तुला सांगितली आहेच. त्याअर्थी तुझ्यापासून काही गुपित ठेवण्याचा प्रश्नच उरत नाही! अजून मला ती नंदिनीची शेवटची भेट आठवते! मनावर कोरून ठेवण्यासारख्या काही आठवणी चिरंजीव असतात! तो शकुंतलेचा जन्म! ती कन्याच माझी! माझ्या तपश्चर्येच्या बळावर पुढचा काळसुद्धा मी पाहू शकतो. ती पहा, सासरी निघालेली शकुंतला मला दिसते आहे. तिला सासरी पाठवताना कण्वमुनींच्या डोळ्यांतले अश्रू. हे कदाचित पुढं–कवींच्या कौतुकाचेही विषय होतील, पण जे अश्रू या क्षणी या विश्वामित्राच्या डोळ्यांत असतील ते मात्र कुणालाच दिसणार नाहीत! ती पाहा, शकुंतला पालखीत बसून दुष्यंताकडे जाताना मला दिसतेय. अज्ञाताच्या खांद्यावर बसून.

( आतून गाणे सुरू असते, आणि– )

( विश्वामित्र–माधवी या दोघांच्या विरुद्ध बाजूला एका प्रकाशझोतात, दोन ऋषिकुमारांसमवेत सासरी निघालेली शकुंतला दिसते. गाणं सुरू होतं.)

निघाली शकुंतला सासरी,
कण्वमुनींच्या जमल्या नयनी दुःखाश्रूंच्या सरी ।। निघाली०
( विश्वामित्राच्या डोळ्यांत पाणी दिसते.)
बागडती मृग बालक नाचती – शोकावेगे लता डोलती,
मुनिजन, गुरुजन जमले सगळे, कालिंदीच्या तिरी ।। निघाली०

( साश्रू नयनांनी कण्वमुनी तिला निरोप देतात. गाणं संपल्यावर ज्या दिशेला ती निघून जाते, त्या दिशेला पाहात पाहात विश्वामित्र म्हणतो– )

हे काय, हिचा चेहरा तिच्यासारखाच कसा दिसतो ?

**माधवी** : कुणाचा चेहरा ?

**विश्वा०** : शकुन्तलेचा !

**माधवी** : मुलीचा चेहरा आईसारखाच दिसायचा !

**विश्वा०** : आईसारखा ? मेनकेसारखा नव्हे माधवी – नंदिनीसारखा !

**माधवी** : मनात असतं ते स्वप्नात दिसतं असं तर नसेल ?

**विश्वा०** : काय म्हणालीस ?

**माधवी** : खरं सांगू का ?

**विश्वा०** : हां !

**माधवी** : तपश्चर्येच्या बळावर तुम्ही पुढच्या भविष्यातलं जे काही दृश्य पाहिलंत ना—

**विश्वा०** : हा ? —

**माधवी** : त्यातलं मला काहीही दिसलेलं नाही. ( उठते. ) ( विश्वामित्र डोळे पुसतो. ) थांबा, आपण बसा, मी आपल्या आहारासाठी फळं घेऊन येते. काही म्हणा, आपण हा प्रतिचंद्र निर्माण केलात ना, तेव्हापासून फुलांना आणि फळांना एक वेगळाच गौरव आलेला आहे ! प्रतिचंद्र म्हणूनच तो प्रतिपदेचा चंद्र नसेल ना ?

**विश्वा०** : प्रतिचंद्र म्हणूनच प्रतिपदेचा चंद्र ! वा ऽ माधवी ! ! ( माधवी लज्जित होऊन आत जाते ) तरीही ब्रह्मर्षी नाही. तो दुष्ट वसिष्ठ मला ब्रह्मर्षी होऊ देणार नाही.

( आतून एक मुलगा धावत येऊन त्याच्या पायावर कोसळतो. )

**मुलगा** : प्रभो, मला जीवदान द्या — प्रभो !

**विश्वा०** : थांब—थांब. मुला, तुझा थरकाप आवर ! कोण आहेस तू ? काय नाव तुझं ?

**शून** : ( हुंदके देत ) शुनःशेप ! नरबळी म्हणून राजाच्या सभेत आज माझा वध होणार आहे !

**विश्वा०** : तुझा वध— नरबळी म्हणून— राजाच्या सभेत ? कोण हा राजा ?

**शून** : राजा हरिश्चंद्र !

**विश्वा०** : म्हणजे त्रिशंकूचा मुलगा ! ज्याच्यासाठी मी प्रतिसृष्टी निर्माण केली ! त्याला आकाशात स्थान मिळवून दिलं— तो त्रिशंकू ! त्याचा मुलगा हरिश्चंद्र ! चिंता करू नकोस मुला ! शान्त रहा ! तुझी चिंता मी दूर करतो. आता सांग— हा तुझा बळी कशासाठी ?

**शून** : राजर्षी, वसिष्ठांच्या सांगण्यावरून, पुत्रप्राप्तीसाठी वरुणाचा यज्ञ केला. वरुण प्रसन्न झाला. मुलगा होईल. तू निपुत्रिक मरून नरकात जाणार नाहीस. पण तो मुलगा यजन म्हणून यज्ञात बळी द्यावा लागेल, अशी अट घातली.

**विश्वा०** : बरं पुढं ?

**शून** : मुलगा झाल्यानंतर— मुलाच्या प्रेमानं राजा वरुणाला टाळू लागला.

वचनभंगाचं पातक नको म्हणून ब्रह्मर्षी वसिष्ठांनी ही युक्ती सांगितली.

**विश्वा०** : कोणती ?

**शून** : स्वतःचाच मुलगा बळी द्यायला हवा असं नाही ! दुसरा कुणी तुझ्यासाठी स्वतःचा मुलगा द्यायला तयार असेल तरी तो वरुणाला स्वीकारावा लागेल, असा शास्त्रार्थ सांगितला.

**विश्वा०** : वसिष्ठानं ? बरं पुढं ?

**शून** : माझे वडील— कसले— मला नाहीत, मला कोणीच नाही. मी मधला. थोरला कर्ता म्हणून बापाला हवा. धाकटा लाडका म्हणून आईला हवा ! मधला मी— कुणालाही नको. घरातले अठरा विश्वे दारिद्र्य दूर करण्याच्या बुद्धीनं, राजनिष्ठेचं सोंग करून शंभर गाईंच्या लोभानं मला राजाला दान दिला. माझा जीव वाचवा, देवा ! तुमच्याशिवाय या जगात मला कुणाचाही आधार नाही. ( माधवी येते; हातांत फळांची करंडी आहे. ) आई, मला माझ्या प्राणांची भीक घाला !

**विश्वा०** : थांब मुला, माधवी, त्यांतली दोन फळं त्याला खायला दे. उपाशी दिसतोय.

( माधवी त्याला करंडीतील एक काकडी खायला देते. शुनःशेप एकदाच काकडी चावतो अन् थू थू करून टाकून देतो. )

**विश्वा०** : का रे ? काय झालं ?

**शून** : मला भूक नाही !

( माधवी तीच काकडी खाऊन पाहते ).

**माधवी** : स्वामी, ही काकडी कडू आहे.

( विश्वामित्र विचारमग्न होऊन उभा राहतो. )

**विश्वा०** : चिंता करू नकोस शुनःशेपा. मला सांग, हा विधी आहे कधीं ?

**शून** : आजपासून नऊ दिवसांनी.

**विश्वा०** : वरुणाचा यज्ञ केला का ?

**शून** : हो !

**विश्वा०** : माधवी, तो वरुण माझ्यासमोर उभा राहू शकेल का ? ऊठ शुनःशेपा ! मी सांगतो तो मंत्र पाठ कर. तुला ज्या वेळी वधस्तंभाजवळ नेतील तेव्हा तो मंत्र म्हण. आणि त्याहूनही काही अघटित घडलं तर

मला हाक मार—

**शून** : बाबा ! (पाय धरतो.) असे वडील मला का मिळाले नाहीत ?

**विश्वा०** : (माधवी शुनःशेपाला घेऊन आत जाते.) ब्रह्मर्षीसारखा ब्रह्मर्षी एका अजाण अर्भकाचा बळी देण्याचा आदेश कसा देऊ शकतो ?

**नंदिनी** : संहाराच्या डोळ्यांना हे— आज अश्रू कसे आले ?

अनाथाच्या हत्येचे आज दुःख कसे झाले ?

हळूहळू जवळ येतो, ब्रह्मर्षींचं पद घेतो.

हिंसेच्याही निर्मात्याला, माणुसकीचा डंख होतो.

जिथं माणूस माणूस होतो, तिथं त्याच्या रक्ताचाही

कोणाच्याही हत्येपायी डोळ्यांमध्ये थेंब होतो !

रक्ताचंही पाणी होतं, तिथं नातं जुळून जातं.

मानवाचं मानवाशी असं गोत्र घडून जातं.

ब्रह्मर्षींच्या पदासाठी क्षत्रियानं तप केलं

हळूहळू भाग्य त्याचं— ज्याचं त्याच्या गाठी आलं !

**विश्वा०** : का दर्शन दिलंस ?

**नंदिनी** : भल्यासाठी, भल्यासाठी । मी तुझ्या भल्यासाठी ।

तूं त्याच्या भल्यासाठी सारे सारे जन्म घेतो ।

देणाऱ्याच्या भल्यासाठी भले करा भले करा ।

ज्याचे त्याचे भले करा— बुरे करता, बुरे करा ।

करणारा मी कोणी नाही, हा भाव मनी धरा ।

ब्रह्मर्षींच्या पदासाठी कोणाचेही पाय धरा ॥

**विश्वा०** : कोण कुणाचे पाय धरणार ?

**नंदिनी** : धरू नका, धरू नका. सांगितलेलं भुलू नका.

जात जाईन, येत जाईन, पाया पडून घेण्यासाठी ।

पुन्हा एकदां येऊन जाईन ॥ (जाते.)

[ अंधार ]

## प्रवेश तिसरा

[ पुन्हा उजेड होतो. कुठं तरी आडबाजूला असलेलं एक वरुणाचं मंदिर ! मागं वरुणाची मूर्ती दिसते. बळी देण्याच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या श्लोकांचा मंत्राचा घोष चालू आहे. एका कोपऱ्यात एक म्हातारा ब्राह्मण शुनःशेपाला धरून उभा आहे. वसिष्ठ प्रवेशतात. पाठोपाठ हाती पूजासाहित्याचं तबक घेतलेला विज्ञान. राजा हरिश्चंद्र प्रवेश करतो. वसिष्ठांनी सूचित केल्याप्रमाणं प्रथम बलिदेवीची, वरुण-प्रतिमेची पूजा करतो. शुनःशेपाच्या भाळी कुंकुमतिलक लावतो. ज्ञान येऊन उभा राहिलाय. हरिश्चंद्र हातानं इशारा करताच दोन मांग, खांद्यावर शस्त्र घेऊन प्रवेश करतात. शुनःशेपाला त्याच्या बापाच्या हातून खेचून बलीवर बसवतात, आणि त्याच्यावर घाव घालणार—इतक्यात...)

**शून :** ( मांग जवळ येताना बघून ) ॐ भूर्भुवः स्वः ( हा मंत्र म्हणतो. )

**मांग एक :** महाराज, याचा वध आमच्या हातून होणार नाही. ( शस्त्रं हरिश्चंद्राच्या पायाशी ठेवतात. )

**मांग दुसरा :** हा निष्पाप आहे, याचा वध आमच्या हातून होणार नाही. आम्हाला क्षमा असावी.

( दोघे निघून जातात. )

**ज्ञान :** आता याचा बळी कोण घेणार ?

**विज्ञान :** वरुणाला बळी कसा मिळणार ? ( ज्ञान-विज्ञान आत जातात. )

**हरि० :** मला वचनभंग करावा लागणार का, ब्रह्मर्षी ?

**वसिष्ठ :** याचं उत्तर काय ते काळच देऊ शकेल !

**ब्राह्मण :** महाराज, मला एक सहस्र गाई अधिक देता ?

**हरि० :** काय म्हणालास ?

**ब्राह्मण :** मी याचा वध करतो.

**हरि० :** एक सहस्र गाईंसाठी स्वतःच्या मुलाचा वध ?

**ब्राह्मण :** दारिद्र्य कठीण आहे, हे श्रीमंत राजा !

**हरि० :** लोभ कठीण आहे, हे दरिद्री ब्राह्मणा !

**ब्राह्मण :** खरंच ते, कुणाला सहस्र गाईंचा, कुणाला स्वतःच्या मुलाचा...

**हरि० :** काय म्हणालास ? पुन्हा एकदा बोल !

**ब्राह्मण :** महाराज, स्वतःच्या मुलाचा बळी वाचविण्यासाठी आपण ज्या मुलाला नियुक्त केलं आहात त्याचा मी जन्मदाता केवळ आहे. हे वधकरी त्याचा वध करायला असमर्थ ठरले आहेत. आपण जर एक सहस्र गाई अधिक देऊ शकत असाल तर मी त्याचा वध करीन ! या मांगांचं काम करायला हा ब्राह्मण सिद्ध आहे.

**हरि० :** तू ब्राह्मण. हा मांग !

**ब्राह्मण :** इथं वर्ण्य—चातुर्वर्ण्य हा भेदच उरत नाही. इथं उरते ती केवळ भूक ! बोला, काय करू, बोला !

( हरिश्चंद्र सहेतुक वसिष्ठांकडे पाहतो. वसिष्ठ मान हालवून संमती देतात. )

**हरि० :** एक सहस्र गाई तुला दान दिल्या !

( बांधलेल्या मुलाकडं कुऱ्हाड घेऊन बाप येतो आहे. )

**शून :** ( कळवळून ) बाबा, मी लहान असताना तुम्ही माझे किती कळवळून लाड केले होतेत, आता तुम्हाला दैन्याचे चटके बसले म्हणून मला विझवून टाकता आहात ?

**ब्राह्मण :** थांब, बोलू नकोस. माझी एकतानता भंग पावते आहे ! आक्रोशासाठीसुद्धा मान पुढंमागं हालवू नकोस. आज एक माणूस भुकेसाठी पशू झाला आहे. चल, मान ताठ ठेव !— मान ताठ ठेव !

**शून :** बाबाऽऽऽ ! ( असं तो मुलगा ओरडतो आणि विश्वामित्र प्रवेश करतो. )

**विश्वा० :** थांबा ! ( म्हातारा शस्त्र खाली टाकतो. )

**हरि० :** या— या— या. यावं महर्षी !

**विश्वा० :** म्हणजे ब्रह्मर्षी नाही ! ( वसिष्ठाकडं बघून ) हा तर जागेवरूनही उठला नाही.

**हरि० :** आज आपण इथं कसे ? अचानक कसे ?

**विश्वा० :** या मुलानं हाक दिली— आलो ! राजा, मी विश्वामित्र ! तुझ्या पित्याचा माझा संबंध !...

**हरि० :** मला ज्ञात आहे. आपण वंदनीय आहात !

**विश्वा० :** तुझ्या सर्व राज्याचं— एकवचनी असल्यानं— मागं स्वप्नात तू मला दान दिलं होतंस; आठवतं ?

हरि० : होय ते या क्षणी मी आपणाला...

**विश्वा०** : थांब जरा ! दान केलेल्या राज्यासाठी वारस हवा म्हणून तू यज्ञ केलास तो का ? आणि वरुणाला प्रसन्न करण्यासाठी या अश्राप मुलाचा बळी देतोस ते का ? याचं उत्तर मला दे,– नाही तर...( शाप देण्यासाठी हात उंचावतो, इतक्यात... )

**वसिष्ठ** : थांबा. महर्षी, वारस हवा म्हणून नव्हे तर निपुत्रिकाला स्वर्ग मिळत नाही म्हणून हा यज्ञ त्यांनी केला होता.

**विश्वा०** : मी आपल्याला विचारलं नाही.

**वसिष्ठ** : राजपुरोहित म्हणून– राजापुढं हितासाठी फिरणारा म्हणून, मलाच उत्तर द्यावं लागणार.

**विश्वा०** : पण म्हणून याचा बळी कशासाठी ?

**वसिष्ठ** : तो शास्त्रार्थ आहे, आणि राजहितासाठी मीच तो काढलेला आहे !

**विश्वा०** : म्हणजे तुम्ही याचा बळी घेणार ?

**वसिष्ठ** : आम्ही नव्हे. वरुण ! बळी क्षत्रिय घेतात. ब्राह्मण नव्हे !

**विश्वा०** : पण देता तुम्ही !

**वसिष्ठ** : घेणारा तोच !

**विश्वा०** : तो घेऊ शकणार नाही !

**वसिष्ठ** : असं होईल त्या दिवशी ब्रह्मदिन येईल !

**विश्वा०** : मग द्या तर पित्याला पुत्रवधाची आज्ञा! [ बापाकडे बघून मुलाकडे जाताना ]– त्या वरुणासाठीच ही हत्या होणार ना ? उठ,– शुनःशेपा, वरुणाला आवाहन कर. तो इथं प्रगट होईल. माझ्या आशीर्वादानं तो मंत्र तुझ्या मनात तयार होईल. माझ्यासमोर हा बळी तो कसा घेतो तेच मी पाहतो. ( असं म्हणून विश्वामित्र शुनःशेपाच्या डोक्यावर आपले दोन्ही हात ठेवतो. वरुण-आवाहनाचा मंत्र ऐकू येतो, विजांचा चमचमाट व ढगांचा गडगडाट होतो. वरुण प्रकट होतो आणि समोर विश्वामित्राला पाहून दचकतो, घाबरतो, आणि...)

**वरुण** : अरे प्रत्यक्ष महर्षी विश्वामित्र इथं ? राजा हरिश्चंद्रा, मी तुला वचनमुक्त केलं आहे ! राज्यातून पळून वनात गेलेल्या तुझ्या मुलाला परत बोलावून घे. मी तुला वचनमुक्त केलेलं आहे. त्याचा वध करू नकोस !

महर्षींच्या पुढं कोण बोलणार ?

**हरिश्चंद्र :** अहो, पण...

**वरुण :** मला काही विचारू नकोस......( अदृश्य होतो. )

**वसिष्ठ :** अरे ! यानं माझ्याकडे लक्षही दिलेलं नाही !

**विश्वा० :** प्रत्येकाच्या आयुष्यात ज्याचे त्याचे क्षण असतात !

**वसिष्ठ :** आपल्या आयुष्यातला तो क्षण येऊ दे. तोच वाट पाहतो आहे मी !

**शून: :** महाराज ! माझं काय ? मी कुठं जाऊ ?

**हरि० :** तू आपल्या वडिलांबरोबर घरी जा—

**शून: :** कोण माझे वडील ?

**हरि० :** म्हणजे ?

**शून: :** माझा बळी देण्यासाठी शस्त्र उचलू शकणाराला मी माझा पिता म्हणू ? तुम्ही तर माझे वडील नाहीतच ! ज्याच्यासाठी माझा बळी होणार होता तो तुमचा मुलगा होता ! पण माझे वडील कोण ? मी कुठं जाऊ ?

**विश्वा० :** त्यांना विचार ना ? ते महाज्ञानी, ब्रह्मर्षी, राजर्षी, राजपुरोहित वसिष्ठ यांना विचार ना— तुझे वडील कोण ?

**वसिष्ठ :** आपणच महर्षी विश्वामित्र ! आपणच त्याचं पितृत्व स्वीकारलेलं आहात.

**विश्वा :** मी ? कधी ?

**वसिष्ठ :** बाबा म्हणून त्यानं साद घातली त्या वेळी आपण प्रकट झालात तेव्हाच ! त्याचं संरक्षण करून आता त्याचा स्वीकार करून, अनाथाचे नाथ व्हा ! ( विश्वामित्र रागानं त्याला आत ओढत नेतो ! )

[ अंधार ]

## प्रवेश ४ था

[ उजेड होतो. रोपट्याचा विशाल वृक्ष झालेला दिसतोय. मागील आकाशात पूर्णचंद्र दिसतो. ज्ञान-विज्ञान प्रवेशतात. ]

**ज्ञान :** माझी चूक मला समजली विज्ञाना. माझ्या गुरूंचं ज्ञान आणि

श्रेष्ठत्व आज माझ्या ध्यानात आलं. स्वतःच्या विरोधकाचं मोठेपण जगाला कळावं म्हणूनच त्यांनी हे शुनःशेपाचं प्रकरण उभं केलं. विश्वामित्रांशिवाय त्याला वाचवणारा कोणीही या जगात नाही, याची त्यांना निश्चिती होती. झालंही तसंच. तो शेवटी गेला विश्वामित्रांकडे, विश्वामित्रांनीच त्याचे प्राण वाचवले. पण असं असूनसुद्धा, अविद्येच्या बळावर मृत्यू पार करूनसुद्धा, विश्वामित्र शेवटी पराभूतच ठरले. गुरुजी म्हणत होते तेच खरं. अविद्येच्या बळावर मृत्यू पार करून जाण्यापेक्षा विद्येच्या बळावर पृथ्वीवर अमृत शोधणं हे अधिक महत्त्वाचं ! थोर पुरुष ! अरे, सगळ्या पृथ्वीचं सामर्थ्य एकत्रित केलेला ब्रह्मदंड ज्याच्या हाती, स्वर्ग वाचावा म्हणून ज्याची प्रार्थना करण्यासाठी प्रत्यक्ष ब्रह्मदेव येतो, त्याच्या मनात संहाराचा विचारही कधी येत नाही ! सगळा जन्म, पृथ्वीवर अमृत कसं शोधायचं याच्या मागं ! वा ! खरी सौजन्यमूर्ती ! माझ्या गुरूचं सामर्थ्य मला समजलं, माझी चूक मला समजली विज्ञाना—गुरूला माउली का म्हणतात ते मला आज समजलं !

**विज्ञान :** मग आश्रमात गुरुजींकडे येतोस ?

**ज्ञान :** चल जाऊ.

( दोघे जायला निघतात, इतक्यात ज्ञानाचं लक्ष मागं जातं. )

**ज्ञान :** अरे ते बघ तुझे स्वामी. डोक्यावर मला मोठा पाषाण घेऊन, उग्र मुद्रा करून लपत छपत याच दिशेनं येतातसं दिसतं. चल चल.

( दोघेही घाबरून आत जातात. विरुद्ध दिशेनं विश्वामित्र डोक्यावर मोठा थोरला पाषाण घेऊन दबकत दबकत प्रवेश करतो. इतक्यात मागून — "स्वामी ऽऽऽऽ" अशी आर्त हाक ऐकू येते. विश्वामित्र पाषाण खाली ठेवतो, इतक्यात माधवी प्रवेशते.)

**माधवी :** स्वामी, कसला अविचार मनात घेऊन आपण या रात्रीच्या वेळी घरातून बाहेर पडलात ?

**विश्वा० :** मला काहीएक विचारू नकोस.

**माधवी :** शुनःशेपाला वाचवून आपण आपली योग्यता सिद्ध केलीत, तरी आपल्याला समाधान का नाही ?

**विश्वा० :** समाधान ? ब्रह्मर्षिपद मिळाल्याशिवाय तो शब्दही माझ्या आसपास येऊ शकत नाही.

**माधवी :** पण कशासाठी एवढा अट्टाहास ?

**विश्वा :** पुरुषांचे मानापमान स्त्रियांना कळणार नाहीत माधवी ! प्रत्येक बाबतीत श्रेष्ठ ठरूनही योग्य स्थान न मिळता फक्त अपमानच सहन करावा लागणार असेल तर सन्मार्गानं न मिळणारं ते ब्रह्मर्षिपद मला आता घातकी मार्गानंच मिळवावं लागेल. वसिष्ठाइतका तोडीस तोड माझ्याशिवाय या जगात दुसरा कोणीही नाही. या दोघांच्यातला एक जगातून गेल्याशिवाय दुसरा ब्रह्मर्षी होणार नाही.

**माधवी :** कसलाही आततायी विचार मनात आणू नका, स्वामी, स्वामी जरा आठवण करा—

**विश्वा० :** कसली ?

**माधवी :** शुनःशेपाला आपण प्रेमानं दिलेली काकडी कडू होती.

**विश्वा० :** बरं मग ?

**माधवी :** असूयेतून जन्माला आलेली प्रतिसृष्टीतील फळंसुद्धा कडू निघाली, स्वामी !

**विश्वा० :** ब्रह्मर्षिपद मिळाल्याशिवाय ती गोड होणार नाहीत !

**माधवी :** स्वामी ऽ ऽ

**विश्वा० :** कुणाचाही कसलाही उपदेश ऐकण्याच्या मनःस्थितीत मी नाही.

**माधवी :** स्वामी ऽ ऽ

**विश्वा० :** तुझा स्वामी मेला, संपला, जगातून नाहीसा झाला ! आता उरलंय ते फक्त पावलोपावली अपमानित होणारं विश्वामित्राचं भूत ! जा, जा, माझ्या प्रतिसृष्टीतून जन्माला येणारी फळं गोड होण्याची वाट बघत बैस, जा. मला माझ्या मार्गानं जाऊ दे, तू तुझ्या मार्गानं जा ! जा, जा ऽ; जा ऽ ऽ ऽ ( ओरडतो.)

**माधवी :** स्वामी ऽ ऽ ऽ ( असाहाय्य होऊन आत निघून जाते. )

**विश्वा० :** वसिष्ठाला जगातून नाहीसा करण्यावाचून मला आता गत्यंतर नाही......माझं ज्ञान-विज्ञान मी सिद्ध केलेलं आहे. क्षत्रिय म्हणून पराक्रमात माझा हात धरू शकणारा कोणीही नाही या जगात ! तरीही मी ब्रह्मर्षी नाही... रोज याच ठिकाणी मीच निर्माण केलेल्या चांदण्यात बसण्यासाठी हा वसिष्ठ या वृक्षाखाली येत असतो. आज हा पाषाण त्याच्या मस्तकात घालून

त्यालाच जगातून नाहीसा करतो. मग आहे कोण दुसरा ब्रह्मर्षी माझ्याशिवाय या जगात ? ( असं म्हणून मोठ्यानं हसतो. इतक्यात आतून वसिष्ठ बोलत बोलत प्रवेश करताहेत असं दिसताच झाडामागं लपतो. )

**वसिष्ठ** : चुकीची उपमा दिली अरुंधतीनं ! पिठासारखं चांदणं पडलंय असं म्हणायला नको होतं अरुंधतीनं ! विश्वामित्राच्या तपश्चर्येसारखं, नाही, विश्वामित्राच्या तपःश्चर्येमुळं हे चांदणं पृथ्वीवर पडलं आहे असं तिनं म्हणायला हवं होतं ! धन्य ती तपस्या ! बुद्धिमत्ता आणि सामर्थ्याच्या बळावर देवांनाही आव्हान देऊन विज्ञानाच्या शक्तीनं त्रिशंकूसाठी प्रतिसृष्टी निर्माण करणारा विश्वामित्र खरोखरीच धन्य ! उद्याच्या भविष्यात कदाचित जगात अधिकाधिक विद्वान माणसं जन्माला येतील. विज्ञानाच्या बळावर आकाशात ग्रह उपग्रह बसवू शकतील, पण त्या वेळी त्यांच्या मस्तकावर पडत असलेलं चांदणं, ही या भूमीवर जन्माला आलेल्या विश्वामित्राची कृपा आहे, हे त्यांना कधीही विसरून चालणार नाही. विध्वंसापेक्षा विज्ञानाचा उपयोग अशा विधायक कार्यासाठी केला...

( दपकन धोंडा पडतो. वसिष्ठ दचकून मागं वळतो.)

**विश्वा०** : ( पुढे येऊन ) मला क्षमा करा, ब्रह्मर्षी, मला क्षमा करा ! आपल्या मनात माझ्याबद्दल असलेल्या प्रेमादराची मला कल्पना नव्हती. मला क्षमा करा ! ( असं म्हणत वसिष्ठाच्या पायाशी भूमीवर मस्तक टेकतो. )

**वसिष्ठ** : उठा, उठा, ब्रह्मर्षी विश्वामित्र ! आता मी तुम्हाला ब्रह्मर्षी म्हणतो ! ( आलिंगन देतो. ) येवढी एकच गोष्ट तुमच्याजवळ कमी होती !

**विश्वा०** : कोणती ?

**वसिष्ठ** : नम्रता ! आज एक क्षत्रिय भूमीवर प्रेम करू लागला. पृथ्वी पाया-खाली तुडवत जाणाऱ्या क्षत्रियाचं मस्तक आज भूमीला लागलं. आज एक क्षत्रिय नम्र झाला, ब्रह्मर्षी झाला ! नुसती आक्रमणं करून ब्रह्मर्षिपद मिळत नसतं राजन् ! खडतर तपःश्चर्येसाठी तुम्ही इंद्रियं जिंकून जितेन्द्रिय झालात. पण, स्वतःचं मन जिंकणं हे अधिक अवघड असतं ! अहंकार जाणं अवघड असतं ! आज तुमचा अहंकार गेला ! हा विश्वामित्र आज विश्वमित्र झाला ! माझा तुमच्यावर कधीच राग नव्हता महात्मन् ! क्रोधाच्या अतिशयानं माझा वध करण्याचा हेतू मनात धरून ज्या वेळी तुम्ही या वृक्षाआड बसलेले होतात, त्याच वेळी माझं मन मात्र

तुमच्याविषयीच्या कौतुकानं भरून गेलेलं होतं! हा मन आणि तन जिंकण्यातला फरक! कष्ट केल्यावर धर्म बदलून माणूस याच जन्मी ब्रह्मर्षी धर्म घेऊ शकतो. शेवटी धर्म जन्मावर नसतो, कर्मावर असतो, हे सिद्ध केलंत! धन्य ब्रह्मर्षी विश्वामित्र!

**विश्वा०** : खरंच माझं चुकत होतं!

[ तो वाकतो. इतक्यात आतून आलेली नंदिनी त्याच्यासमोर उभी राहते, नकळत तिला नमस्कार घडतो. ]

**नंदिनी** : अरे अरे! माझे पाय कशाला धरता? उगीच मला मान कशाला देता? कोण कुणाचे पाय धरतो? असं म्हणून गेलात, आज का हो एकाएकी इथं असे नम्र झालात?

**वसिष्ठ** : नाही नंदिनी, आज विश्वामित्र, विश्वमित्र झाले! ब्रह्मर्षी झाले!! उठा, महर्षी विश्वामित्र, उठा.

( आतून ज्ञान—विज्ञान येतात. )

**ज्ञान** : मी आपली क्षमा मागण्याठी आलो आहे. आपण म्हणत होता तेच खरं. अविद्येच्या बळावर, विज्ञानाच्या बळावर आकाशात स्वर्ग शोधण्यापेक्षा, विद्येच्या बळावर पृथ्वीवर अमृत शोधणं हे अधिक महत्त्वाचं, हे आज मला समजलं. पृथ्वीचं सामर्थ्य आज माझ्या ध्यानी आलं. संपूर्ण तेजानं, आकाशातून खाली कोसळणारी वीजसुद्धा, आत्मसात करून घेणाऱ्या पृथ्वीमातेचं सामर्थ्य आज माझ्या ध्यानी आलं. माझी चूक मला समजली. मला क्षमा करा!

**वसिष्ठ** : आज तुम्ही खऱ्या अर्थानं ज्ञानी झालात.

**ज्ञान** : आश्रमात जाऊ?

**वसिष्ठ** : कशासाठी?

**विज्ञान** : त्याला अजून आश्रमातल्या स्वर्गाचं आकर्षण आहे.

**वसिष्ठ** : मग त्यासाठी आता आश्रमात जायची आवश्यकता नाही.

**विज्ञान** : म्हणजे?

**वसिष्ठ** : क्षत्रियानं शस्त्र टाकून दिलं, आज एक क्षत्रिय नम्र झाला, ब्रह्मर्षी झाला. आता या विश्वामित्रासाठी, नाही, या विश्वमित्रासाठी पृथ्वीवरच्या स्वर्गाचंच दार उघडलेलं आहे!

**नंदिनी** : आनंदाचा क्षण असा आनंदानं नाचत आला—

चला चला विश्वमित्रा, मित्र-वृक्षा पाणी घाला—

( त्याच्या हाती जलकुंभ देते. )

संकोचाचं कारण नाही योग्यतेचा प्रश्न नाही–
संग्रामीचा धनी आज शान्ततेचा दूत झाला–
आचाही विजय आज भूमातेच्या पायी आला–
क्षत्रियाचा जन्म आज– सार्थ सार्थ होऊन गेला– !

[ विश्वामित्र खाली बसून मित्रवृक्षाला पाणी घालत असताना, “ धन्य धन्य ब्रह्मर्षी विश्वामित्र.” असा देवांचा जयघोष होतो, आणि पुष्पवृष्टी होत असताना पडदा पडतो. ]

## तिसरा अंक समाप्त

IRBK-0120712

IRBK-0120712

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र...20792 नों. दि ...............
वि. ......नाटक... क्र. ...१०।१।५...